
ऑक्टोबर, २०२५

# आपलं मंत्रालय

एक सुसंवाद



# दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ – सन्मान, संरक्षण आणि न्यायाची दिशा

दिव्यांग व्यक्तींचे हक्क अबाधित राहावेत, त्यांना समान संधी, सन्मान आणि न्याय मिळावा, यासाठी भारत सरकारने दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अमलात आणला आहे. या अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी आणि दिव्यांगांच्या तक्रारींवर प्रभावी कारवाई व्हावी, यासाठी शासनाने राज्य आयुक्त, दिव्यांग कल्याण यांची नियुक्ती केली आहे. राज्य आयुक्तांना या कायद्यानुसार दिवाणी न्यायालयाचे अधिकार देण्यात आले असून, ते स्वतःहून अथवा प्राप्त झालेल्या तक्रारींवर कार्यवाही करून दिव्यांगांच्या हक्कांचे रक्षण करतात. हा कायदा दिव्यांग व्यक्तींसाठी न्याय, संरक्षण आणि समानतेचा मजबूत पाया निर्माण करणारा ठरतो.



### १) राज्य आयुक्तांची नियुक्ती

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६च्या कलम ७९ नुसार शासनाने राज्य आयुक्त, दिव्यांग कल्याण यांना अधिसूचित केले आहे.

### २) राज्य आयुक्तांचे अधिकार

कलम ८० नुसार राज्य आयुक्तांना स्वतःहून (Suo Moto) अथवा प्राप्त झालेल्या तक्रारींवर कार्यवाही करण्याचा अधिकार आहे.

### ३) दिवाणी न्यायालयाचे अधिकार

कलम ८२ नुसार राज्य आयुक्तांना दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ नुसार खालील अधिकार प्राप्त आहेत :–

- साक्षीदारांना समन्स पाठविणे
- कागदपत्रे सादर करण्यास सांगणे.
- सार्वजनिक दस्तावेज मागविणे.
- शपथपत्रावर पुरावे स्वीकारणे.
- तपासणीसाठी आयोग नेमणे.

### ४) न्यायिक कार्यवाहीचे स्वरूप

भारतीय दंड संहिता १८६०च्या कलम १९३ आणि २२८ नुसार राज्य आयुक्तांसमोरील प्रत्येक कार्यवाही ही न्यायिक स्वरूपाची असेल.

### ५) तक्रार नोंदणी प्रक्रिया

तक्रार दिव्यांग व्यक्ती, त्यांचे पालक किंवा कायदेशीर प्रतिनिधी देऊ शकतात.

- तक्रारीत खालील माहिती आवश्यक
- तक्रारदाराचे नाव व पत्ता
- प्रतिवादीचे नाव व पत्ता
- तक्रारीचे स्वरूप
- पुरावे (दस्तऐवज, फोटो, व्हिडिओ इ.)
- तक्रारदाराने मागितलेली मदत.

- तक्रार प्राप्त झाल्यानंतर, राज्य आयुक्त प्रतिवादीला उत्तर सादर करण्यासाठी तक्रारीची प्रत नोटीसद्वारे पाठवतील.
- प्रतिवादीने नोटीस मिळाल्यानंतर १५ दिवसांत लेखी उत्तर सादर करावे. त्यानंतर ३० दिवसांत सुनावणी पूर्ण केली जाईल.
- निश्चित तारखेला तक्रारदार व प्रतिवादी किंवा त्यांचे प्रतिनिधी राज्य आयुक्तांसमोर हजर राहतील.
- दोन्ही पक्षांना सुनावणीसाठी पूर्वसूचना (नोटीस) देण्यात येईल. अनुपस्थित असल्यास अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतात.
- तक्रारदार विनाकारण अनुपस्थित राहिल्यास, राज्य आयुक्त तक्रार फेटाळू शकतात किंवा निर्णय देऊ शकतात.
- प्रतिवादी अनुपस्थित राहिल्यास, कलम ८२ नुसार त्याला समन्स जारी केला जाईल.
- नोटीस / समन्स असूनही प्रतिवादी गैरहजर राहिल्यास, एकतर्फी निर्णय (Ex-parte Decision) दिला जाईल.
- योग्य कारणास्तव राज्य आयुक्त सुनावणी स्थगित करू शकतात.
- सुनावणी पूर्ण झाल्यानंतर १५ दिवसांत निर्णय देऊन संबंधित पक्षांना कळविला जाईल.
- Suo Moto किंवा प्राप्त तक्रारींवरील सर्व प्रक्रिया ६० दिवसांत पूर्ण केल्या जातील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेला आहे.

## ६ माईंड २.० : द इनर रिव्हॉल्युशन

आजचा काळ हा वेग, माहिती आणि स्पर्धेचा संगम आहे. जग एका क्लिकवर बदलतंय. बातम्या, ट्रेंड्स आणि विचार वाऱ्याच्या वेगाने फिरत आहेत. तंत्रज्ञानाने आपल्याला जोडले आहे; पण कधी-कधी याच जोडण्याने आपला अंतर्मनाशी असलेला संवाद तोडला आहे. आपण connected आहोत; पण centered नाही. आपण 'online' जास्त; पण स्वतःशी 'offline' झालो आहोत.

## २२ हा छंद जीवाला लावी पिसे...

जगावे म्हणता जरा बैजवार, पुन्हा सोमवार आला देवा या वैभव जोशी यांच्या कवितेत म्हणल्याप्रमाणे आपल्या रोजच्या कामाच्या धावपळीत आणि घड्याळाच्या काट्यावर धावणाऱ्या आपल्या आयुष्याला थोडा 'ब्रेक' नेहमीच हवाहवासा वाटतो. जगण्याच्या रोजच्या धबाडग्यात दोन क्षणांची हिरवळी पाऊलवाट होतो...तो म्हणजे आपला 'छंद'!

## ३१ अमरावतीची अभिजात भाषा परिषद एक समृद्ध करणारा अनुभव

महाराष्ट्रातील सर्व विभागांनी १०० दिवसांचा कृती कार्यक्रम राबवला, त्याला मराठी भाषा विभागही अपवाद नव्हता. त्यांनी भाषाप्रेमींना विविध विषयांवर कल्पना मांडण्याची संधी दिली. नंतरच्या दिनक्रमात पुन्हा कामात गढून गेले असताना मराठी भाषा विभागाने भारतीय अभिजात भाषांची परिषद आयोजित केली.

## १४ झेंडुच्या फुलांचा शतकमहोत्सवी सुगंध!

आचार्य अत्रे यांनी केशवकुमार या टोपण नावाने लिहिलेल्या झेंडूची फुले या विडबंन काव्य संग्रहातील ही कविता. अलीकडेच या काव्यसंग्रहाने शतकोत्तरी प्रवास पूर्ण केला आहे. शतकापूर्वीचे काव्य जर आजही इतके टवटवीत राहत असेल, तर या झेंडूच्या फुलांचा मोह कुणाला सोडवेल? तरी आपल्या समर्पणात कवी या झेंडूच्या फुलांची भूमिका कशी मांडतात पाहा.

## २५ मराठी वाचन संस्कृतीचा उत्सव

मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण लक्षात घेऊन या वर्षी वाचन प्रेरणा दिनाची मध्यवर्ती संकल्पना घेऊ या एकच वसा, मराठीला करू ज्ञानभाषा अशी निश्चित करण्यात आली आहे. या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन विभाग, अधिनस्थ संस्था, मंडळे, सार्वजनिक उपक्रम तसेच सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांकडून वेगवेगळे उपक्रम आयोजित केले जात आहेत.

## ३८ म्हणजे काय?

समितीने भाषेची प्राचीनता, भौतिकता आणि सलगता, भाषिक आणि वाङ्मयीन परंपरेचे स्वयंभूषण इ. निकष विचारात घेऊन तयार केलेल्या मराठी भाषा अहवालाची महाराष्ट्र शासनातर्फे केंद्र शासनाकडे शिफारस करण्यात आली. त्या अनुषंगाने केंद्रीय मंत्रिमंडळाच्या ०३ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय झाला आहे.


माईंड २.० : द इनर रिव्हॉल्युशन ६
सॉक्रेटिसचा एकाक्षरी प्रश्न ८
तडजोड शिक्षण/व्यवहार ९
अक्षरांची गोडी १०
अंतर्मन उजळून काढणारे धुके १२
ये दोस्ती १३
झेंडुच्या फुलांचा शतकमहोत्सवी सुगंध! १४
जगभरातील सर्व आदिवासी व पर्यावरणप्रेमींना अभिवादन १६
केळ एक गुणकारी फळ १७
देवनागरी सुलेखन भाग-५ १७
वेगळ्या वाटा १८
पु.लं.चे 'आनंदी' विनोद १९
हा छंद जीवाला लावी पिसे... २२
सांस्कृतिक वैभव २३
वाचन प्रेरणा दिन २४
मराठी वाचन संस्कृतीचा उत्सव २५
पुस्तकांचा बगिचा २६
कृष्णविवर २७
सुशासनाच्या नव्या पर्वाकडे वाटचाल २८
द फोक आख्यान ३०
अमरावतीची अभिजात भाषा परिषद
एक समृद्ध करणारा अनुभव ३१
टपाल! ३३
बोल अनघाताईंचे ३४
नाट्यप्रेम / मराठी मजकूर छपाईची मुहूर्तमेढ ३५
मराठी मनाचा ठाव घेणाऱ्या कवयित्री बहिणाबाई चौधरी ३६
सांस्कृतिक ठेवा.../ज्ञानेश्वरी/संस्कृत सुभाषित ३७
म्हणजे काय? ३८

वर्ष ३ रे । अंक ७ । ऑक्टोबर २०२५

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन**

**आपलं मंत्रालय**

**संपादन**

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संकल्पना, मुखपृष्ठ — अजय भोसले
- व्यवस्थापकीय संपादक — किशोर गांगुर्डे
- संपादक — गोविंद अहंकारी
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर

**पत्ता**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.
Email : aaplemantralay@gmail.com

फॉलो करा...www.twitter.com&MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com&dgipr

**प्रतिक्रियांचे स्वागत**

आपलं मंत्रालय या नियतकालिकाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आणि सूचनांचे स्वागत आहे.

**'आपलं मंत्रालय' नियतकालिक ही गृहपत्रिका असून या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.**

# आदि कर्मयोगी अभियान

'आदि कर्मयोगी' अभियानात गडचिरोली जिल्ह्याला राष्ट्रपतींकडून सर्वोत्तम कामगिरीचा पुरस्कार...

राष्ट्राच्या सर्वांगीण विकासात आदिवासी समाजाच्या सक्रिय सहभागाचे महत्त्व अधोरेखित करणारा आणि लोकसहभागावर आधारित शासनव्यवस्थेचा आदर्श प्रस्थापित करणारा 'आदि कर्मयोगी अभियान' सध्या देशभर गाजत आहे. या अभियानाच्या राष्ट्रीय परिषदेचा भव्य सोहळा नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात पार पडला.

या परिषदेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 'धरती आबा जनभागीदारी अभियान' अंतर्गत महाराष्ट्र राज्याला सर्वोत्कृष्ट राज्याचा सन्मान प्राप्त झाला. तसेच गडचिरोली जिल्ह्याने आदि कर्मयोगी अभियानात उल्लेखनीय कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर आपले वेगळेपण सिद्ध केले असून, त्याला सर्वोत्तम जिल्ह्याचा पुरस्कार प्राप्त झाला.

महाराष्ट्र राज्याचा पुरस्कार आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यांनी स्वीकारला, तर गडचिरोली जिल्ह्याचा पुरस्कार जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी स्वीकारला.

या प्रसंगी राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या की, आदि कर्मयोगी अभियान हे शासनाला खऱ्या अर्थाने सहभागी, सर्वसमावेशक आणि लोकसहभागावर आधारित करण्याच्या राष्ट्रीय संकल्पाचे प्रतीक आहे. या अभियानाचा मुख्य हेतू प्रत्येक आदिवासी गावाला स्वावलंबी आणि अभिमानास्पद बनवणे; तसेच आदिवासी समाजाचा विकास प्रवासात सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे हा आहे. ग्रामसभा आणि समुदाय नेतृत्वाखालील संस्था सक्षम केल्याने स्थानिक लोकांचा विकासप्रक्रियेत थेट सहभाग वाढतो. या माध्यमातून शासनाच्या योजना अधिक प्रभावी ठरतात आणि आदिवासी समाजाच्या अपेक्षांशी सुसंगत धोरणे आकार घेतात.

राष्ट्रपतींनी आदिवासी समाजाच्या सामाजिक-सांस्कृतिक योगदानाचा गौरव करताना सांगितले की, आदिवासी परंपरा निसर्गाशी सुसंवाद साधणाऱ्या विकासाच्या संकल्पना जपतात. केंद्र शासनाने गेल्या काही वर्षांत आदिवासी क्षेत्रांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षण, आरोग्य, रोजगार, कौशल्य विकास आणि शासनातील समान सहभाग या क्षेत्रांत अनेक ठोस पावले उचलली आहेत.

सरकारने पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार करून आदिवासी युवकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला आहे. निवासी शाळा, शिष्यवृत्ती योजना, कौशल्यविकास व स्वयंरोजगार कार्यक्रमांच्या माध्यमातून केवळ उपजीविकेच्या संधी निर्माण झाल्या नाहीत, तर आदिवासी युवकांमध्ये आत्मविश्वास, स्वावलंबन आणि अभिमानाची भावना दृढ झाली आहे. शेवटी, राष्ट्रपती मुर्मू यांनी सर्व समाजघटकांच्या समावेशक प्रगतीवर भर देण्याचे आवाहन केले. राष्ट्राचा खरा विकास हा सर्व समाजघटकांच्या सर्वांगीण प्रगतीत आहे. प्रत्येक नागरिकाला समान संधी देणारा आणि लोकसहभागावर आधारित समाज निर्माण करणे हीच खरी कर्मयोगाची दिशा आहे, असे त्या म्हणाल्या.

गडचिरोली जिल्ह्याचा हा राष्ट्रीय सन्मान केवळ जिल्ह्याचा नव्हे, तर महाराष्ट्राच्या विकासदृष्टीचा सन्मान आहे. लोकसहभाग, आत्मनिर्भरता आणि आदिवासी विकासाच्या संकल्पना यशस्वीपणे रुजविणारे गडचिरोली आज आदर्श ठरत आहे..

# विचारांची शब्दयात्रा

मनुष्याच्या प्रवासात दोन वाटा असतात, एक बाहेर जाणारी आणि एक आत वळणारी. बाहेर जाणाऱ्या वाटेवर शहरे, तंत्रज्ञान, व्यवहार आणि शिक्षणाचे विस्तार दिसतात; पण आत वळणाऱ्या वाटेवर विचार, शब्द, संवेदना आणि सुगंध असतात. ही आतली वाट म्हणजे मनापासून मनाकडे जाणारी यात्रा.

अशाच एका प्रवासाची झलक या 'आपलं मंत्रालय'च्या अंकातून दिसते. Mind to Point Zero - The Inner Revolution हे नाव घेताच जणू अंतर्मनात एक हलकी हालचाल होते. बाह्य जग जिंकण्याआधी स्वतःला शोधण्याची, स्वतःला समजून घेण्याची क्रांती हीच खरी क्रांती आहे, असे या विषयाने आपल्याला सांगितले.

अशा विचारांच्या वाटेवरच सॉक्रेटिस उभा दिसतो शांत, प्रश्न विचारणारा. त्याचा एक प्रश्न, तू कोण आहेस? इतका साधा, पण किती गहन! हाच प्रश्न आजच्या प्रत्येक शिक्षकाने, प्रत्येक विद्यार्थ्याने, प्रत्येक संवेदनशील माणसाने स्वतःला विचारायचा आहे. कारण खरी शिक्षणक्रांती प्रश्न विचारण्यातूनच जन्म घेते, उत्तर शोधण्यातून नव्हे.

आणि त्या उत्तरांच्या शोधात आपण व्यवहारात उतरतो. शिक्षण, समाज, संस्कृती या सगळ्याच क्षेत्रात काही तडजोडी येतात; पण त्या तडजोडी कमकुवतपणाच्या नव्हेत; त्या समजुतीच्या आहेत. त्याच आपल्याला जगाशी संवाद साधायला शिकवतात, पुढे जायला शिकवतात.

अशा या जगण्यातही काही क्षण झेंडूच्या फुलांसारखे उमलतात. साधे, प्रसन्न, मातीच्या सुगंधात न्हालेले ते फूल न गाजावाजा, न दिखावा, तरीही जिथे असते, तिथे वातावरण उजळून टाकते. झेंडूचे फूल हे आपल्या संस्कृतीचे प्रतीकच जणू श्रमशीलतेचे, सातत्याचे आणि न थकता सुगंध देण्याचे. ज्या पावलाखाली माती आहे, त्याच मातीला आदराने सुवास देत राहणे, ही त्याची ओळख.

सुगंधाला दीर्घायुष्य देण्याचे काम काही मोजक्या शब्दशिल्पकारांनी केले. त्यांनी अक्षरांना आकार दिला, भावनांना दिशा दिली आणि विचारांना चिरंतन सुगंध दिला. त्यांचे शब्द जणू फुलांच्या पाकळ्यांवर दवबिंदूप्रमाणे थांबलेले हलके; पण हृदयाला ओलावा देणारे आहेत असे वाटते.

मग शेवटी येते ते वाचन, जे या सगळ्या प्रवासाला अर्थ देते. वाचन म्हणजे फक्त अक्षरांची ओळख नव्हे, ती म्हणजे विचारांच्या माळेतील नवी कळी. वाचन प्रेरणा दिन असो वा मराठी वाचन संस्कृतीचा उत्सव, हे दोन्ही सण म्हणजे आत्म्याचा उत्सव आहेत मनाच्या शेतात नव्या विचारांची बीजे पेरणारे.

या अंकातील प्रत्येक पान जणू एका विचारफुलाचे उमलणे आहे. कुठे सुगंध, कुठे प्रश्न, कुठे विनोद, कुठे संवेदना; पण या सगळ्याचं मूळ एकच माणसाचा अंतर्मनाशी झालेला संवाद.

आपण बाहेरचं जग सुंदर करतो; पण खरा प्रकाश तेव्हाच उजळतो, जेव्हा आपण आतल्या अंधाराकडे पाहतो आणि त्या प्रवासात शब्द, विचार, फुले, विनोद आणि वाचन हेच आपले दीप बनतात.

हा अंक त्या प्रत्येक शब्दातील प्रकाशाचा एक छोटासा किरण ठरो, हीच शुभेच्छा.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

# माईंड २.० : द इनर रिव्हॉल्युशन

**डॉ. राजन वेळूकर**

आजचा काळ हा वेग, माहिती आणि स्पर्धेचा संगम आहे. जग एका क्लिकवर बदलतंय. बातम्या, ट्रेंड्स आणि विचार वाऱ्याच्या वेगाने फिरत आहेत. तंत्रज्ञानाने आपल्याला जोडले आहे; पण कधी–कधी याच जोडण्याने आपला अंतर्मनाशी असलेला संवाद तोडला आहे. आपण connected आहोत; पण centered नाही. आपण 'online' जास्त; पण स्वतःशी 'offline' झालो आहोत.

या युगात माणूस जणू स्वतःच्याच सावलीला गाठण्याचा प्रयत्न करतोय. किती कमावलं? किती प्रसिद्ध झालो? किती लोक आपल्याला फॉलो करतात? हे प्रश्न जीवनाचे केंद्र झाले आहेत; पण त्या सगळ्या चमकत्या उत्तरांच्या गर्दीत एक प्रश्न हरवला आहे, मी कोण?

आजचा तरुण माहितीने परिपूर्ण आहे; पण शहाणपणाने काहीसा रिकामा आहे. त्याच्याकडे साधने आहेत; पण साधना नाही. त्याच्याकडे फॉलोअर्स आहेत; पण जवळीक नाही, स्वातंत्र्य आहे; पण शांती नाही. बाहेरचं जग झपाट्याने बदलतंय; पण आतलं मन गोंधळलेलं आहे. विचारांची गर्दी आहे, पण स्थैर्याचा अभाव.

मन म्हणजे operating system. कधी–कधी ते मंदावतं, कधी ओव्हरलोड होतं आणि कधी स्वतःवरच क्रॅश होतं. तेव्हा आपल्याला त्याचं Reset बटण दाबावं लागतं म्हणजेच Mind १.० वरून Mind २.० कडे जाणं.



Mind १.० म्हणजे प्रतिक्रियावादी, भीतीने चालवलेला आणि बाह्य जगावर अवलंबून असलेला मनुष्य.

Mind २.० म्हणजे सजग, केंद्रित आणि आत्मजागरूक व्यक्तिमत्त्व जिथे स्पर्धेपेक्षा समरसता आणि ताणाऐवजी तन्मयता असते.

या रूपांतराचा पाया समर्थ रामदास स्वामी, विवेकानंद, विनोबा भावे, महात्मा गांधी आणि ओशो यांच्या शिकवणीत आहे.

त्यांच्या विचारांतून उगवतात सात जीवनमूल्ये – सात दीपशिखा, जी आपल्याला बाह्य यशाकडून आंतर समाधानाकडे नेतात :–

(१) मनाचे नियंत्रण, (२) सत्य आणि प्रामाणिकता, (३) धैर्य आणि संयम, (४) प्रयत्न आणि निश्चय, (५) सेवा आणि साधना, (६) निर्भय श्रद्धा, (७) आत्म जागरूकता.

**पहिली पायरी :** मनाचे नियंत्रण (Self-Mastery)

समर्थ रामदास स्वामी म्हणतात, माणसाने जग जिंकण्याआधी स्वतःचे मन जिंकले पाहिजे. आजच्या युगात हेच सर्वात मोठं आव्हान आहे. बाहेरचं जग नियंत्रित करणं सोपं झालं आहे – मोबाईल, यंत्र, डेटा, अर्थव्यवस्था, बाजार – सगळं आपल्या नियंत्रणात आहे; पण मन मात्र नेहमी भटकतं. एका क्षणी आनंद, दुसऱ्या क्षणी चिंता; एका क्षणी आत्मविश्वास, तर पुढच्याच क्षणी भीती.

विनोबा भावे म्हणतात, स्वराज्य म्हणजे बाहेरचं राजकारण नव्हे, तर अंतःकरणातील स्वसंयम.

विवेकानंद सांगतात, जो स्वतःच्या मनावर राज्य करू शकतो, तोच खरा राजा.

ओशो म्हणतात, मनावर विजय मिळवायचा नाही, तर त्याला शांत निरीक्षक बनून पाहा.

आज मनाचे नियंत्रण म्हणजे डिजिटल आत्मसंयम (Digital Self-Discipline).

आपण फोन उचलताना विचार करतो का की – मी हे का उचलतोय? आपण सोशल मीडियावर प्रतिक्रिया देताना जाणतो का की मी आत्ता रागावलेलो आहे का? ही जागरूकता म्हणजेच मनाचं स्वराज्य. मनावर नियंत्रण म्हणजे फोनपेक्षा स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवणं. जपानमधील Kazuhiro -raki नावाचा युवक दररोज १२ तास काम करत असे. एके दिवशी तो थकून कोसळला – Burnout. डॉक्टरांनी सांगितलं, शरीराला नाही, मनाला विश्रांती दे. त्याने ध्यान सुरू केलं, आणि एका वर्षात 'Zen Balance' नावाचा स्वतःचा स्टार्टअप उभा केला – जो तरुणांना digital detox आणि mental reset शिकवतो. मनाचं नियंत्रण म्हणजे याच अंतर्बलाचं प्रतिक आहे.

**दुसरी पायरी :** सत्य आणि प्रामाणिकता (Integrity)

सत्यास ठावे सदा मान, प्रामाणिकतेतच देवाचे स्थान. ही ओळ आजच्या प्रत्येक सरकार, व्यवसाय, विद्यार्थी आणि नागरिकासाठी दिशादर्शक आहे.

आजच्या स्पर्धेच्या जगात खोटं बोलणं, दिखावा करणं, आणि इमेज बिल्डिंग हे यशाचं साधन मानलं जातं; पण समर्थ रामदास सांगतात, सत्याशी निष्ठा आणि आचरणातील पारदर्शकता हेच खरे सामर्थ्य आहे.

महात्मा गांधी म्हणतात, सत्यावर प्रयोग करणे म्हणजे जीवनाला अर्थ देणे.

विनोबा भावे म्हणतात, सत्य म्हणजे कर्तव्य आणि कर्तव्य म्हणजे प्रेम.

Integrity म्हणजे आत काय विचार करतो आणि बाहेर काय करतो यातील एकसंधता. आपला चेहरा आणि अंतःकरण यांच्यातील अंतर जितकं कमी, तितकी व्यक्ती मोठी. भारताची आरती प्रभाकर, अमेरिकेच्या व्हाईट हाऊसमधील Chief Scientific Advisor, यांनी AI नैतिकतेबद्दल उघडपणे सांगितलं, Technology powerful आहे; पण ती humane बनवणं हे आपलं नैतिक कर्तव्य आहे.

हीच आजच्या काळातील सत्याची व्याख्या – Be real in an

unreal world.

**तिसरी पायरी :** धैर्य आणि संयम (Resilience)

समर्थ म्हणतात, न सोडीं धैर्य संकटे जे आवती.

जीवनात संकटं येणारच; पण त्यात शांत संयमाने राहणं म्हणजेच खरा बळकटपणा. आज प्रत्येक तरुणाच्या आयुष्यात दबाव आहे. करिअरचा, नात्यांचा, आर्थिक अस्थिरतेचा, आणि अपेक्षांचा; पण Resilience म्हणजे त्या सगळ्यांच्या पलीकडे स्वतःला पुन्हा उभं करणं.

विवेकानंद म्हणतात, उठा, जागे व्हा आणि ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका.

ओशो म्हणतात, धैर्य म्हणजे भीती असतानाही पुढे जाणे.

पाकिस्तानातील Malala Yousafzai हिने शिक्षणासाठी आवाज उठवला आणि गोळी झेलली, पण तिचं धैर्य आजही लाखो मुलींना शिकायला प्रेरणा देतं. तिचं उदाहरण सांगतं. संयम म्हणजे मौन नव्हे, तर योग्य वेळी न थांबणारा विश्वास.

**चौथी पायरी :** प्रयत्न आणि निश्चय (Determination)

करावे प्रयत्न मनोभावे, परी भाग्य तेथे साहाय्य करील. आज भाग्यावर दोष देणे सोपे आहे; पण समर्थ सांगतात – प्रयत्नाशिवाय भाग्यही मदत करत नाही. आजचा तरुण instant success शोधतो, पण निश्चय आणि सातत्य यांची कमतरता दिसते. प्रयत्न म्हणजे रोज थोडं थोडं सुधारत जाणं.

ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी सांगितलं – Dream is not what you see in sleep, dream is what doesn't let you sleep.

विनोबा भावे म्हणतात, कर्तव्य करत राहा, फळाची आसक्ती ठेवू नका.

Elon Musk च्या तीन अपयशी SpaceX launches नंतर सर्व काही संपल्यासारखं वाटत होतं. पण चौथ्या प्रयत्नात त्याने इतिहास घडवला. त्याचा एकच मंत्र – Never quit on a meaningful dream. प्रयत्न म्हणजे भाग्य निर्माण करण्याचं साधन आहे.

**पाचवी पायरी :** सेवा आणि साधना (Selfless Action)

समर्थ म्हणतात, सेवा म्हणजे केवळ दान नव्हे, ती जीवनशैली आहे.

आजचा माणूस मी आणि माझं या वर्तुळात अडकला आहे; पण विनोबा भावे यांनी भूदान चळवळीत दाखवून दिलं की दान म्हणजे जमिनीचं नव्हे, तर मनाचं वाटप आहे.

ओशो म्हणतात, सेवा केली आणि अहंकार निर्माण झाला, तर ती साधना नाही.

विवेकानंद म्हणतात, ज्याने गरिबात देव पाहिला, त्यानेच साधना केली.

लेहच्या Sonam Wangchuk यांनी 'Ice Stupa' आणि Himalayan Institute of -lternatives सुरू करून दाखवलं की, शिक्षण हे जीवनाशी जोडलेलं असावं.

तो म्हणतो, मी शिकवतो, पण ते परीक्षेसाठी नाही, जीवनासाठी. हीच सेवा आणि साधनेची खरी व्याख्या आहे.

**सहावी पायरी :** निर्भय श्रद्धा (Fearless Faith)

भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे. श्रद्धा म्हणजे भीतीचा अभाव. आज लोकांचे श्रद्धास्थानं बदलली आहेत – देव, गुरु, तत्त्वज्ञान यापेक्षा followers आणि likes यांवर अवलंबून राहणं वाढलं आहे; पण खरी श्रद्धा म्हणजे स्वतःच्या मार्गावर विश्वास ठेवणं, अंधारातही प्रकाशावर भरोसा ठेवणं.

गांधीजी म्हणतात, श्रद्धा म्हणजे अंधारातही प्रकाशावर विश्वास ठेवणं.

विनोबा म्हणतात, श्रद्धा ही विचारांची नव्हे, तर अनुभवाची गोष्ट आहे.

ओशो म्हणतात, Faith म्हणजे surrender जिथे शंका संपते आणि अनुभव सुरू होतो.

निखिल कामथ, Zerodha चे संस्थापक, यांनी २० वर्षांच्या वयात नोकरी सोडून स्वतःचा मार्ग निवडला. ते म्हणतात, Risk घ्या, पण भीतीशिवाय. हीच निर्भय श्रद्धेची आधुनिक रूपं आहेत.

**सातवी पायरी :** आत्म जागरूकता (Self Awareness)

आपण ठायीं जरी पाहिलें. देव, आनंद, आणि शांतता हे बाहेर नाहीत, ते आपल्या आत आहेत; पण आजचा माणूस बाहेर validation शोधतो – लोक काय म्हणतील? या भीतीने जगतो.

आत्मजागरूकता म्हणजे स्वतःशी प्रामाणिक संवाद. Meditation, journaling, silence – ही त्याची साधनं आहेत.

ओशो म्हणतात, तू कोण आहेस हे समजलं, तर सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळाली.

विनोबा भावे म्हणतात, आत्मपरीक्षण म्हणजे खरी प्रार्थना.

Nick Vujicic, हात-पाय नसलेला ऑस्ट्रेलियन प्रेरक वक्ता, म्हणतो – मी शरीराने अपूर्ण आहे; पण आत्म्याने पूर्ण आहे. त्या जीवन म्हणजे आत्मजागरूकतेचं जिवंत उदाहरण आहे.

Mind २.०: आधुनिक काळातील साधना

Mind २.० म्हणजे फक्त तंत्रज्ञानाचं नव्हे, तर चेतनेचं अद्यतन आहे.

ते म्हणजे ज्ञान असणं आणि त्याचा अहंकार न होणं, संपत्ती असणं आणि करुणा टिकवणं, वेग असणं आणि स्थैर्य राखणं.

समर्थ रामदास स्वामींच्या शिकवणीचा गाभा – स्वसंयम, श्रद्धा आणि सत्कर्म आजच्या युगात तितकाच लागू आहे, कदाचित अधिक.

विनोबांचा नि:स्वार्थ विचार, विवेकानंदांचा ध्येयवाद, ओशोचा साक्षीभाव आणि गांधींचे सत्य हे सर्व मिळून आधुनिक समाजासाठी एक नवं धर्मसूत्र तयार करतात.

आजच्या तरुणासाठी मनावर स्वराज्य, जीवनात प्रामाणिकता, संकटात धैर्य, प्रयत्नात सातत्य, कृतीत सेवा, अंतःकरणात श्रद्धा, आणि आत्म्यात जागरूकता – हीच सात सूत्रं आहेत. जर प्रत्येक तरुणाने ही सात दीपशिखा आपल्या अंतर्मनात पेटवली, तर तो फक्त यशस्वी नव्हे, तर सजग, संवेदनशील आणि सन्मार्गी नागरिक बनेल.

म्हणूनच फोन रिसेट करण्याआधी मन रिसेट करा.

माहितीपेक्षा प्रज्ञा, वेगापेक्षा मूल्य, आणि यशापेक्षा अर्थ निवडा.


Mind २.० ही ॲप नाही – ती एक आंतरिक क्रांती आहे.

आणि ही क्रांती सुरू करण्यासाठी योग्य वेळ आहे – आत्ताच, इथेच, स्वतःपासून.

**Youtube Channel :-** @WaylookerInnovationfoundat-m8

**(कुलगुरू,** Atlas SkillTech University **आणि माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.)**

# सॉक्रेटिसचा एकाक्षरी प्रश्न



**किरण कुलकर्णी**

सॉक्रेटिसची गोष्ट आपल्या सगळ्यांना माहिती आहे. स्वतःला वाटतंय ते स्पष्टपणे सांगत राहिल्याने अखेर त्याला विषाचा प्याला जवळ करावा लागला. त्याच्या आयुष्यातली आणखी एक गोष्ट मला महत्त्वाची वाटते. तो म्हणायचा, प्रत्येक गोष्टीला 'का' असा प्रश्न आपण विचारला पाहिजे. या एकाक्षरी प्रश्नातूनच पुढच्या ज्ञानाचे, प्रगतीचे दरवाजे खुलत असतात.

सुरुवातीलाच सॉक्रेटिसचा उल्लेख करण्याचं कारण म्हणजे त्या पार्श्वभूमीवर आजचे महाविद्यालयीन विद्यार्थी काय करत आहेत, हे पाहणे उद्बोधक ठरेल, असे वाटते. कुठला कोण हजारो वर्षांपूर्वी होऊन गेलेला कुठल्या तरी लांबच्या ग्रीस देशातला सॉक्रेटिस आणि आजचे आजूबाजूला दिसत असलेले महाविद्यालयीन युवक-युवती यांची सांगड घालण्याचा हा वेडा प्रयत्न कशाला? त्याचे उत्तर कदाचित तुम्हा वाचकांना या लेखाच्या शेवटी मिळेल. स्वतःला जे वाटते, ते वेळ आल्यावर स्पष्टपणे सांगण्याचे मनोधैर्य आत्तापर्यंतच्या शिक्षणाने विद्यार्थ्याला दिलेले असते काय? स्वतःचे विचार स्पष्टपणे सांगण्याचा अधिकार गमावण्याऐवजी सॉक्रेटिसने प्राण दिला. महाविद्यालयास विद्यार्थ्यांकडून इतकी टोकाची अपेक्षा मुळीच नाही; पण विद्यार्थ्यांना नक्की काय हवे आहे, हे ते स्पष्ट करू न शकल्यामुळे समाजाला, प्राध्यापकांना, शिक्षणसंस्थांना आणि पालकांनासुद्धा त्याच्या अपेक्षा समजू शकलेल्या नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. विद्यार्थ्यांच्या अपेक्षा या सर्व घटकापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी वैयक्तिकरीत्या विद्यार्थ्यांची तर आहेच; पण सामूहिकरीत्या विद्यार्थी संघटना आणि विद्यार्थ्यांची नियतकालिके यांची आहे.

दुसरी गोष्ट 'का' या एकाक्षरी प्रश्नाबाबतची... विद्यार्थी आपल्या शिक्षणाकडे, वागण्याकडे, उपक्रमांकडे 'का' या प्रश्नाच्या दृष्टिकोनातून बघायला लागले, तर अधिक प्रगती करू शकतील, मात्र त्यासाठी तेवढी चौकस आणि चिकित्सक बुद्धी मात्र राखायला हवी. आपण आता जे करतो आहोत, वागतो आहोत ते का करतो आहोत? त्यातून नक्की काय मिळणार आहे? जे मिळणार आहे, ते तात्कालिक आहे की, दीर्घकाल टिकणारे आहे? हे न केल्यास काय-काय होऊ शकेल? आपला वेळ आणि आपली शक्ती घालवण्याइतपत हे महत्त्वाचे आहे का?

ही सगळी प्रश्नमालिका 'का' पासून सुरू होते. आपल्या कृतीकडे व्यवहारी बघण्याचे निमित्त असे प्रश्न देतात. यातून आपल्या कृतीची योग्ययोग्यता बुद्धीने ठरते. अयोग्य ते टाकून दिले जाते आणि योग्य राखून ठेवण्याची इच्छा जागृत राहते. यालाच प्रगती म्हणतात.

**(सचिव, मराठी भाषा विभाग.)**

**शेखर गायकवाड**

वा! वा वा!! काय आयडिया, राव तुमची! मला वाटलं एकच जमीन तुम्ही तिघांना दाखवली म्हटल्यावर, तुम्ही अडचणीत येणार ! सगळ्यांचा ईसार घेऊन बसलात म्हणजे व्यवहार कुणाबरोबर करायचा?




काय? त्यापैकी एकाबरोबर साठेखतसुद्धा केलं आणि दोन लाख रुपये उचलले? मग काय? काही होणार नाही म्हणता? मी नुस्ती गंमत बघत राहू?

उद्या दुसऱ्याचं खरेदीखतसुद्धा ठरलंय? त्याने किती दिले? चार लाख दिले त्याने? पण ही फसवणूक नाही का हो? काय म्हणालात? जगच असं आहे! जेवढा माणूस चलाख, बेरकी व भानगडीखोर तेवढा त्याचा व्यवहारात फायदा! आणि जमीन घेणाऱ्यांनी कोर्टात दावा लावला तर?

निम्मे-सिम्मे पैसे रखडून-रखडून परत द्यायचे! शिवाय तडजोडीला तयार पण व्हायचं; पण लवकर तडजोडच करायची नाही! कोणतं शिक्षण म्हणायचं हे!

जीवन-शिक्षण! गुंठेवारी

पाव्हनं, कसं काय चाललंय? औदा रानात काय पिके आहेत?

काय म्हणालात? रानात मजा नाही! मग? चावडीवर मजा जास्त! कसं काय? बघू! अरे व्वा! नावाखाली तरी चक्क गुंठेवारीचा व्यवसाय असं लिहिलंय! हा कोणता नवीन व्यवसाय? कसं तयार करता? कुठं आहे ही फॅक्टरी?

फॅक्टरी नाही? मग-अच्छा अच्छा!! म्हणजे जमिनीचे व्यवहार जमून द्यायचे. यालाच ७/१२ चा धंदा म्हणतात ना?

एकविसाव्या शतकात असे अनेक नवीन व्यवसाय उदयाला येणार म्हणे?

चला, मानलं बर का तुम्हाला! आमच्या वेळी हे शिक्षण का नसावं हो?

## बेवारस जमीन

बेगवडे गावातली एक सायंकाळ. दोन हजार लोकवस्तीच्या या आडगावात चार-पाच वर्षांनी मामलेदार स्वतः येणार असल्यामुळे दुपारपासूनच माणसं वाडी-वस्तीवरून चावडीसमोर येऊन बसली होती. तलाठी भाऊसाहेबांनी आपलं दप्तर निटनेटक करण्याची लगबग चालू होती. कोतवाल चहापाण्याची पूर्वतयारी करण्यासाठी हेलपाटे मारीत होता. सर्वांना बसण्याची घोंगड्या टाकून सोय केली होती.

थोड्या वेळाने सरपंच आणि पाटील चावडीवर आले. सर्वांना रामराम केला अन् तलाठी भाऊसाहेबांना साहेबांबद्दल माहिती विचारायला सुरुवात केली. थोड्या वेळात मामलेदार रावसाहेबांची जीप धूळ उडवत आली. तरुण, तरणाबांड पंचविशीतला मुलगा पहिल्यांदाच तालुका मामलेदार म्हणून आला होता. लोकांनाही आश्चर्य वाटले. सगळे त्यांच्याकडे कुतूहलाने पाहू लागले. चावडीच्या बाहेरच सरपंचांनी हार घालून त्यांचे स्वागत केलं. पोलीस पाटील, ग्रामसेवक, हेडमास्तर यांची ओळख तलाठी भाऊसाहेबांनी करून दिली.

मामलेदार बसल्याबरोबर त्यांनी सर्वांना समोर येऊन बसण्याची विनंती केली. सगळे खातेदार उठले अन् हळूहळू समोर जाऊन बसले. बायकापण मध्ये बसल्या. पदर घेतलेल्या म्हाताऱ्या बायका कुजबुजू लागल्या. बहुधा केवढा तरुण साहेब झालाय, अन् मराठी चांगला बोलतोय, कोणत्या भागातला असावा! अशी चर्चा सुरू.

गावकऱ्यांशी दोन-तीन मिनिटे बोलून आपण का आलोय, ते त्यांनी सांगितलं. गावातले सगळे खातेदार आले आहेत का? अशी विचारणा केली. नंतर लगेचच त्यांनी तलाठ्यास ८-अ वाचन करण्यास सांगितले. ७-अ म्हणजे खातेउतारा. एखाद्या शेतकऱ्याच्या नावावर एकूण जेवढे गट नंबर असतील, ते सर्व गट नंबर ८-अ वर लिहिलेले असतात.

# तडजोड शिक्षण/व्यवहार

तलाठ्याने एक-एक नाव वाचायला सुरुवात केली. हजर असलेला खातेदार नाही, तर त्याच्या घरातला कुणीतरी हात वर करायचा. मग सगळ्या गटांची माहिती घेऊन ती बरोबर असल्याची खात्री झाल्यावर दुसरे गाव वाचायचे असा क्रम सुरू होता. थोड्यावेळाने हौसाबाई गंगाधर चरके असं भाऊसाहेबांनी नाव पुकारलं. पुढील दोन मिनिटं शांतता पसरली, आपापसातील कुजबूज बंद झाली. काहींच्या चेहऱ्यावर स्मितहास्य तर काहीच्या शंकेचे भाव दिसू लागले. पुढे बसलेला दादू म्हणाला, साहेब ही जमीन मी कसतोय! तिला माझं नाव लागायला पाहिजे.

यानंतर २-३ मिनिटं कुणीही बोलत नाही. तहसीलदार साहेब पुढे सरसावून व पाटलांकडे पाहत म्हणाले, 'ही बाई कोण'? पाटील म्हणाले 'साहेब, ही बाई कोण आहे, कुठं आहे हे गावात कुणालाच माहीत नाही. ३० वर्षे झाली दादूच ही जमीन कसतोया. ही बाई एकटीच होती. बेळगावात राहायला होती. आता बहुतेक ती जिवंत नसावी. तिचा बरेच महिने शोध घेतला; पण ती काय आढळून येत नाही.

तेवढ्यात दुसऱ्या कोपऱ्यातून तिशीचा एक तरुण उभा राहिला. साऱ्यांचा नजरा त्यांच्याकडे लागल्या होत्या. तो भिंतीला धरून उभा राहिला अन् तहसीलदार रावसाहेबांना म्हणाला, साहेब हे खोटं बोलतायेत. त्या बाईचा पत्ता माझ्याकडे आहे. हा घ्या पत्ता अन् बाईपण ठणठणीत आहेत; पण त्यांनी मला साठेखत करून दिलंय.


**(निवृत्त आयएएस अधिकारी.)**

# अक्षरांची गोडी

**प्रशांत साजणीकर**

बारामतीला होणाऱ्या अक्षर संमेलनाचे अध्यक्षस्थान आपण भूषवावे अशी आमची इच्छा आहे, अशी विचारणा झाल्यावर मनापासून आनंद वाटला. गेली तीनेक वर्षे पंढरपूर आणि कोल्हापूर येथे संपन्न होणाऱ्या या अक्षर संमेलनाबद्दल मला कुतूहल होतेच आणि त्याला उपस्थित राहण्याची माझी मनापासून इच्छा होती; पण योग जुळून येत नव्हता. यावेळी थेट अध्यक्षस्थान भूषवण्याची संधी मिळत होती.

सोलापूर जिल्ह्यातल्या एका प्राथमिक शाळेत शिकवणारे अमित भोरकडे अक्षरमित्र या नावाने सुपरिचित आहेत. अक्षरांनी झपाटलेला हा माणूस आहे. आपल्या सुंदर अक्षरांच्या मदतीने शाळतले फळे आणि संस्कारक्षम मुलांच्या मनात रंग भरणारे हे शिक्षक अक्षरांवर मनापासून प्रेम करतात. अक्षरांच्या माध्यमातून त्यांनी एक चळवळच उभी केली आहे. अनेक अक्षरप्रेमी आणि त्यातही जिल्हा परिषदेतच्या प्राथमिक शाळेत शिकवणारे अनेक शिक्षक त्यांनी एकत्र आणले आहेत. दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत ही सगळी मंडळी तीन दिवस एकत्र जमतात आणि अक्षरानंद अनुभवतात. अमित भोरकडे आणि



त्यांचे सहकारी अक्षर संमेलन भरवतात. पंढरपुर येथे दोन अक्षर संमेलने यशस्वी झाल्यानंतर तिसरे अक्षर संमेलन कोल्हापूर येथे पार पडले आणि यंदा २०२५ साली चौथे अक्षर संमेलन बारामती येथे भरणार होते. या अक्षर संमेलनाच्या अध्यक्षपदापर्यंतचा माझा प्रवासही गंमतशीर आहे.

माझ्या हस्ताक्षरांना काही वळण नव्हते. एखादी म्हैस शांतपणे रानात चरत फिरावी, तशी माझी अक्षरे अस्ताव्यस्त कागदावर फिरत असत. ती कधी सरळ तर कधी तिरकी चालत. अक्षरांवर कधी रेषा मारली जात असे; पण बरेचदा माझी अक्षरे कागदावर अधांतरीच लटकत असत. आपण लिहिलेले समोरच्याला वाचता येते ना तर झाले असे मला नेहमी वाटत असे.

लहानपणी सुंदर अक्षर असणारे माझे काही मित्र होते. पाटीवर



किंवा वहीत उमटणारी त्यांची सुंदर अक्षरे लक्ष वेधून घेत असत. माझे हस्ताक्षर खराब नसले तरी सुंदरही नव्हते. मला माझ्या अक्षराबद्दल अभिमान वाटावा अशी परिस्थिती नव्हती; पण त्यामुळे माझे काही अडले नाही. परीक्षेत लिहिलेले परीक्षकांना नीट वाचता येत होते. पत्रे लिहिण्याचा नाद होता. भरपूर पत्रं लिहायचो. नंतर नोकरी लागली. तिथेही कामाचे स्वरूप असे होते की लिहावे लागे. पण माझे छान चालले होते.

काही वर्षांपूर्वी मात्र फाऊंटन पेनचा छंद लागला. अनेक वर्षे वापरात असलेली सगळी बॉलपेन्स मी फेकून दिली आणि केवळ शाईच्या पेनाने लिहायला लागलो. शाईचे नीब कागदावर टेकवून त्यातून अक्षर उमटण्याची प्रक्रिया अतिशय ऑर्गेनिक आहे. पेनाचा स्पर्श, शाई आणि कागदाचा गंध आणि नीब जेव्हा कागदावर अलगद आपला ठसा उमटवत जाते तो सगळा अनुभव सुंदर असतो.

शाईचे पेन कागदावर फार जबाबदारीने आणि जपून वापरावे लागते. शाईचे पेन हातात आल्यावर आपोआपच माझीच अक्षरे माझ्याशी नव्याने बोलू लागली. शाईचे पेन वापरणाऱ्या माझ्या काही मित्रांचे अक्षर अतिशय सुंदर होते. काहीजण कॅलिग्राफी पण शिकत होते. आपलेही अक्षर चांगले यायला हवे, असे मला वाटू लागले होते.

तशातच सोलापूर जिल्ह्यातले एक तरुण शिक्षक सुंदर हस्ताक्षराचे ऑनलाइन क्लासेस घेतात, असे मला कळले होते. काही मित्रांनी जोरदार शिफारस केल्यामुळे मी तो क्लास लावला. साधारण महिनाभर दररोज रात्री ९ ते १० असे एक तास वर्ग चालणार होते त्यामुळे काम उरकून ही वेळ अगदीच सोयीची होती.

अमित भोरकडे असे या हरहुन्नरी शिक्षकाचे नाव होते. ते घेत असलेल्या ऑनलाइन वर्गात इयत्ता पाचवी ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातल्या विद्यार्थांचा समावेश होता. त्यांच्या पहिल्याच वर्गात लक्षात आले की, या माणसाला अक्षरांबद्दल खरोखर प्रेम आहे आणि शिकविण्याची तळमळदेखील आहे. डाव्या हातात मोबाइल धरून उजव्या हाताने अक्षरांची वळणे ते शिकवीत असत. त्यांची शिकवण्याची पद्धत आणि हातोटी अशी की, एकही दिवस न चुकवता सलग पूर्ण केलेली ही माझी पहिलीच शिकवणी होती. सुंदर अक्षर म्हणजे काय, त्यातले बारकावे, अक्षरांची गोलाई, सरळ रेषांचे महत्त्व, अक्षरांमधले अंतर अशा बारीकसारीक गोष्टी त्यांनी इतक्या छान समजावून सांगितल्या की, विद्यार्थ्यांना अक्षरांची गोडी नाही लागली तरच नवल.

हा क्लास सुरू असताना महिनाभर सराव करून क्लास पूर्ण झाल्यावर माझ्याच अक्षरांमध्ये झालेला फरक मला जाणवू लागला होता. थोडा प्रयत्न केला की, आपण चांगले अक्षर काढू शकतो हा आत्मविश्वास आता आला होता. मी कागदावर लिहिलेली अक्षरे आता लक्ष वेधून घेत होती. अधूनमधून तुमचे हस्ताक्षर छान आहे, असे कोणी म्हटले की अजूनच हुरूप येई. आता माझ्या अक्षरांनादेखील वळण लागले होते. या निमित्ताने अमित भोरकडे





यांचा जवळून परिचय झाला. त्यांना अत्यंत समरसून काम करताना पाहिलं.

मे महिन्यात बारामतीमध्ये भरलेल्या या संमेलनाला अध्यक्ष म्हणून उपस्थित राहण्याचा योग आला. 'अक्षरांची गोडी माणसे जोडी' असे अतिशय समर्पक असे या संमेलनाचे ब्रीदवाक्य. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून या संमेलनासाठी आलेल्या जवळ–जवळ ४०० अक्षरप्रेमी मंडळींची अमित भोरकडे सर आणि त्यांच्या टिमने अत्यंत चोख व्यवस्था केली होती. प्रख्यात सुलेखनकार अच्युत पालव यांची उपस्थिती हे या संमेलनाचे खास वैशिष्ट्य होते.

तीन दिवस चालणाऱ्या संमेलनात भरगच्च कार्यक्रमांची रेलचेल असते. सुंदर हस्ताक्षर, कॅलिग्राफी, रांगोळी, छत्र्या रंगवणे, फळा लेखन, चित्रकला अशा अनेक विषयांवर कलाकारांकडून येथे प्रात्यक्षिके सादर केली जातात. कोणी पिंपळपानावर चित्रे कोरत असतो, तर कोणी साध्या डोळ्यांनी वाचता येणार नाही, इतक्या लहान अक्षरांत लिहून दाखवतो, तर कोणी दोन्ही हातांनी एकाच वेळी वेगवेगळे लिहून दाखवायची किमया करून दाखवतो. रांगोळीतून सादर केलेल्या अफलातून कलाकृती येथे पाहायला मिळतात.

अमित भोर सरांसारखे अक्षरप्रेमी शिक्षक मुलांना लाभले तर अगदी लहानपणापासून मुलांना अक्षरांची गोडी लागल्याशिवाय राहणार नाही. वयाची पन्नाशी उलटल्यावरही मी माझे अक्षर प्रयत्नपूर्वक सुधारू शकलो. कोणताही मोठा प्रायोजक पाठीशी नसताना केवळ कलेच्या हौसेपोटी आणि अक्षरांच्या प्रेमापोटी ही सारी मंडळी गेली चार वर्षे हे संमेलन भरवत आहेत. सध्याच्या डिजिटल युगात जिथे लिहिणेच हरवत चालले आहे, अशा काळात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून केवळ अक्षरांच्या ओढीने अनेक अक्षरप्रेमी दरवर्षी एकत्र येतात ही फार मोलाची गोष्ट आहे. अक्षरांच्या माध्यमातून मराठी भाषेसाठीदेखील फार मोठे कार्य ही मंडळी नकळत करत आहेत. त्यांना उत्तरोत्तर अधिक बळ मिळो!

**(सहसचिव व सहव्यवस्थापकीय संचालक, फिल्मसिटी, मुंबई.)**

# अंतर्मन उजळून काढणारे धुके

**प्रल्हाद जाधव**

आजवरच्या भ्रमंतीत धुके कुठे-कुठे आढळले, याचा विचार करत होतो. एकेक ठिकाण उलट-सुलट क्रमाने आठवत गेले आणि तसतसा त्या आठवणींत गुरफटत गेलो.

'धुक्यात हरवली वाट' असे शं. ना. नवरे यांचे नाटक आहे; पण धुक्यात वाट हरवत नाही, तर ती अंतर्मन उजळून काढते असा माझा अनुभव.



मुंबईहून नाशिकला जाताना इगतपुरीजवळ एक-दोन ठिकाणे अशी लागतात की, धुक्याच्या जंगलातून चाललो आहोत असे वाटते. तो डोंगरमाथा पार झाला की पुढे सपाटीचा, दुतर्फा भातशेती असणारा रस्ता लागतो. पावसाळ्यात तेथे फक्त पाणी आणि धुके दिसते. दोन्ही कडांना क्षितिजापाशी आकाश पाण्यावर टेकल्याचा भास होतो. अशा वेळी पाऊस पडत असेल, तर आपण एखाद्या महासागरातून जात आहोत असा भास होतो. आकाश आणि धरणी एकच होऊन गेलेले असते. धुक्याचे ते गारुड कायम मानेवर बसले आहे. इतकी वर्षे गेली तरी ते धुके त्याच ठिकाणी तसेच आढळून येते.

महामार्गावर जशी टोलनाक्याची ठिकाणे ठरलेली असतात तशीच धुक्याची ठिकाणेही ठरलेली असतात. टोल नाक्यावर आपण टोल देतो आणि पुढे जातो. धुक्याच्या 'नाक्या'वर एनर्जी घेतो आणि ताजेतवाने होऊन पुढे निघतो. मात्र ही विनामूल्य एनर्जी कितीजण घेतात हा वेगळा विषय!

भीमाशंकर अभयारण्यात अगदी मध्यभागी असणाऱ्या रेस्ट हाऊसवर एकदा मुक्कामी राहिलो होतो. सकाळी उठून बाहेर आलो तर आजूबाजूच्या वृक्षराजीतून प्रकाशाचे असंख्य कवडसे धुक्याचा पडदा भेदून जमिनीवर जागोजागी उतरलेले दिसले. कोवळ्या प्रकाशाचे धागे धुक्याच्या तलम वस्त्रातून नजाकतीने ओवले गेले होते त्या नेपथ्यातून लहान मुलासारखा हुंदडलो. ते कवडसे अंगाखांद्यावर घेतले. हे महावस्त्र कोण विणत असेल असा प्रश्न पडला. 'कुणा न दिसले त्रिखंडात त्या हात विणकऱ्याचे' असे सुंदर उत्तर गदिमांनी देऊन ठेवलेले आहेच.

दोनेक वर्षांपूर्वी सिंहगडावर गेलो होतो. पायथ्यापासूनच पाऊस लागला. जस-जसे वर गेलो तस-तसे धुक्याने कवेत घ्यायला सुरुवात केली. माथ्यावर पोहोचलो, तेव्हा जेमतेम चार-पाच फुटांपर्यंतचे दिसत होते. चहुअंगाने दाट धुके! आकाशात तरंगत आहोत असा भास होत होता. वारा इतका बेफाम की रेनकोट किंवा छत्रीचा उपयोग नव्हता. रस्ता सापडेना. कोठून कोठे जायचे कळेना. मग त्या वातावरणाला शरण जात, त्याच्या इच्छेप्रमाणे भरकटणे एवढेच आमच्या हाती राहिले! शरणागती हा पराभव नव्हे, तर जगणे समजून घेण्याचा नवा श्रीगणेशा होता. वाटा उजळायच्या असतील तर अंधार हवाच!

एकदा कासपठारावर गेलो होतो. क्षितिजापर्यंत पसरलेली माळराने त्यावरील रंगीबेरंगी फुलांची आच्छादने, त्यावर दाटलेले आणि पळापळ सुरू असलेले धुके! मधूनच येणारा पाऊस आणि ऊन. या अनुभवाने केवळ तोच दिवस नव्हे, तर सारे आयुष्य चिंबदार करून टाकले. वाऱ्या पावसाने होणारी फजिती आणि ती विसरायला लावणारे अद्‌भूत सौंदर्य एकत्र नांदत होते!

आकाशाच्या पार्श्वभूमीवर धुक्याचे एकाखाली एक असे तीन-चार पदर लहरताना दिसले ते रणथंबोरच्या जंगलात. एका तलावाच्या काठी वाघ दिसेल या आशेने थांबलो होतो. मागे वळून पाहिले तर एकापाठोपाठ एक झाडांच्या रांगा आणि त्यात गुंतलेले धुके दिसले. निसर्ग आमच्यावर प्रसन्न होता आणि त्याने आमच्यासाठी तो नेपथ्य-बदलाचा चमत्कार केला होता.

एकावर एक धुक्याचे पदर आणि वर निळे आकाश. या दृश्याला एक खोली होती, त्या त्रिमित चित्रातून, फांद्या पानातून, धुक्यातून प्रकाश सर्वत्र बागडत होता. वाऱ्यामुळे ढगांचे बिऱ्हाड हलायचे, तेव्हा शब्द सुचायचे नाहीत. 'काजव्यांची पालखी' जशी अख्खीच्या अख्खी मागे पुढे होते, तसे ढगांचे खंड अख्खेच्या अख्खे मागे-पुढे सरकत. आकाशाच्या निळ्या कॅनव्हासवर पांढऱ्या रंगात चितारलेले ते ओले ताजे चित्र कायम मनासमोर आहे. काळाच्या कॅनव्हासवर निसर्ग अशी अनेक चित्रे चितारतो आणि त्याची वाच्यता न करता ती पुसून पुन्हा नव्या कामाला लागतो.

निसर्ग नुसताच चित्रकार नाही, तर तो एक संगीतकार आणि संगीत संयोजकही असतो. मनात आले तर तो स्वतः गातो. नाहीतर इतरांकडून गाऊन, वाजवून घेतो. हवेकडून, पक्षांकडून, नद्यांकडून गाऊन घेतो. वेणू वाजवून घेतो. झाडांच्या डोक्यावर पावसाची बादली रिकामी करून पानांकडून टप-टप आवाज काढून घेतो. वेळ आली तर तो नाचूनही दाखवतो. कधी वावटळीचा बॅले कधी त्सुनामीचे तांडव. हा त्याचा आविष्कार कुणासाठी असतो, तर स्वतःसाठीही नसतो. ते केवळ एक असणे असते. निर्मिती स्थिती आणि लय यांचे निर्विकार चक्र!

हिमालयात भ्रमंती सुरू झाली. मग धुक्याला आणि ढगांना तोटाच उरला नाही! काश्मीर, हिमाचल, लडाख, उत्तराखंड, सिक्कीम दार्जिलिंग, आसाम अरुणाचल मेघालयात ढग आपल्या बाजूबाजूने जणू आपला हात धरून फिरत असतात. बऱ्याचदा आपण वर आणि ढग खाली अशी वेळ येते. बागिनी हिमनदीवरील गिर्यारोहणासाठी जाताना एका शिखर-माथ्यावर एक ढग चक्क आमच्या गाडीच्या बॉनेटवर येऊन बसला आणि तेथेच बरसला. म्हणजे त्या सरीचा प्रारंभ झाला तो आमच्यासमोरच. हाताच्या अंतरावरील पावसाचे ते प्रसवणे पाहून थरारून गेलो.

नुकताच महाबळेश्वरला गेलो होतो. तेथून तापोळ्याला जात असताना वाटेत एका उंच वळणावर गाडी चढू लागली. पलीकडचे काहीही दिसत

नव्हते आणि अचानक तिकडून एक ढग एकदम वर आला आणि समोर उभा राहिला. क्षणभर आमची विचारपूस करत रेंगाळला आणि घाईघाईने दुसऱ्या बाजूला अधिक उंच असणाऱ्या डोंगराकडे निघून गेला. जंगलात प्राणी रस्ता ओलांडतात, त्याला क्रॉसिंग असे म्हणतात. ते पाहणे हा एक आनंद असतो; पण त्या ढगाचे ते क्रॉसिंग कायम लक्षात राहिले.

मनालीला शुरू कॉटेज या हॉटेलच्या टेरेसवर बसून सकाळ संध्याकाळ ढगांचे दोन नाट्यप्रयोग बघितले होते. समोर कोणत्याही मर्यादा नसणारे अद्भुत थेटर आणि प्रेक्षागारात मी एकटा. म्हणजे सहप्रवासी होते; पण त्यांना ढग बघत बसण्याच्या प्रकारात काही रस दिसत नव्हता.

ब्रॉडवेला अशी अद्भुत नेपथ्य साकारणारी नाटके होतात असे ऐकून आहे. हॉलीवुडच्या मोठमोठ्या स्टुडिओमध्ये अशी कृत्रिम रचना करता येते हेही ऐकून आहे; पण याची तुलना तेथे होऊ शकत नाही. माणूस निसर्गाच्या पासंगाला पुरणार नाही हेच खरे. त्याने कितीही प्रत्ययकारी स्थापत्यशास्त्र विकसित केले तरी जंगले नद्या आकाश पर्वतरांगा असे नेपथ्य माणसाला निर्माण करता येईल का कधी? कोवळ्या सूर्यकिरणांनी सुशोभित केलेला सोन्याचा गोळा अर्थात कैलास पर्वत कोणत्या आर्किटेकला तयार करता येईल?

ढगांचे विविध आकार हा एक मस्त विषय. एव्हरीथिंग चेंजेस नथिंग ईज परमनंट हे आध्यात्म तेथे शिकावे. ढगांच्या बदलणाऱ्या आकारावर अरुण कोलटकर यांची एक कविता आहे. मलाही त्याच धर्तीवर काही गोष्टी सुचल्या. धुके आणि ढग एकमेकांच्या हातात हात घालून शाळेला जाताना दिसतात. ढगाची आई धुक्याच्या मुलीचे केस विंचरते. धुक्याचे मांजर ढगाच्या उंदराला पकडते धुक्याचे कुत्रे पळून पळून कंटाळले किंवा स्वतः भोवती रिंगण घालून थकले तर त्याचे ढगात रूपांतर होते आणि थंडीने गारठले की मग ते पायावर मान ठेवून एखाद्या शिल्पासारखे झोपी जाते.

विमानातून प्रवास करताना ढगातून आणि ढगांच्यावरून जाणे होते. खाली पाहावे तर ताकावर लोणी यावे तसे ढग तरंगत असतात. कधी-कधी ते इतके दाट आणि घट्ट असतात की त्यावर उडी मारली तर ते आपल्याला झेलून घेतील आणि जोजवणे सुरू करतील असे वाटते! ते दृश्य पाहिले की, लहानपणीचा उडणारा गालिचा आणि तत्सम कथांची आठवण होते. ते दृश्य पाहताना देहभान हरपून जाते. असे वाटते अलगद हात फिरवून ते सर्व लोणी काढून घ्यावे. काळाची आजी ते सारे लोणी एखाद्या खूप मोठ्या भांड्यात साठवून विड्याचे पान टाकून कढवत असेल आणि तूप एका बरणीत नीट काढून घेऊन खाली उरलेली मकडी विड्याच्या कुरकुरीत पानासहित काळाच्या छोट्या-छोट्या तुकड्यांना अर्थात आपल्या नातवंडांना खायला देत असेल!

**(लेखक, नाटककार,कवी आणि निवृत्त माहिती संचालक.)**

# ये दोस्ती

**सुभाष नागप**

आपले आयुष्य जसे-जसे पुढे-पुढे सरकत जाते, तशी-तशी आपल्या आयुष्यात वेगवेगळ्या टप्प्यावर वेगवेगळी माणसे भेटतात.

शाळेत असताना, शाळेत जाताना-येताना जो मुलगा (मुलींसाठी येथे मुलगी असे वाचावे, पुढे-पुढेही जेथे-जेथे मित्र असा उल्लेख असेल तेथे स्त्रियांनी मैत्रीण असे समजावे) आपल्याबरोबर असायचा. तसेच जो मुलगा आपल्या अभ्यासात मदत करायचा, शाळेतल्या मुलांच्या भांडणात आपली बाजू घ्यायचा किंवा आपण गैरहजर असताना आपल्या मागे जो मुलगा स्वतःहून शिक्षकांना सांगायचा, त्याची आज तब्बेत बरी नाही सर/मॅडम, तो मुलगा आपल्या जवळचा असायचा, सुट्ट्यांच्या वेळीही त्याला भेटावेसे वाटायचे, त्याचे व आपले एक नाते निर्माण व्हायचे, त्याला आपण मैत्री म्हणायचो. पुढे शाळा संपली, पुढचे जीवन सुरू झाले. प्रत्येकजण आपापल्या पुढच्या वाटेने निघाला. त्या वाटेवर ज्यांच्याशी आपले जमले व ज्यांचे असणे, भेटणे आतून काही तरी चांगल्या भावना निर्माण झाल्या ते आपले मित्र वाटू लागले.

पुढे-पुढे प्रत्येकजण आपापल्या भाकरीच्या शोधात निघाला. त्या प्रवासातही असेच कोणी ना कोणी भेटले. त्यांनीही आपल्या आयुष्यात त्या काळात चांगला आनंद व मैत्रीची भावना निर्माण केली.

आयुष्याच्या प्रवासातील प्रत्येक टप्प्यावर अशीच माणसे भेटत जातात. जुन्यांची जागा नवीन घेतात आणि आपल्या आयुष्यात आनंदाचे रंग भरतात. प्रत्येक टप्प्यावर आलेली ही माणसे आपण केव्हाच विसरत नसतो. अगदी शाळेतले मित्रसुद्धा.

माणूस हा समाजिक प्राणी आहे हे खरे; पण माझे म्हणणे आहे की, तो एक सहवासप्रिय प्राणी आहे. त्याला माणसांचा सहवास हवा असतो आणि जेथे कोठे जाईल, तेथे त्याच्या स्वभावाला अनुकूल अशी काही माणसे भेटतातच व ज्या व्यक्ती सहवासाचा आनंद निर्माण करतात त्यांच्याशी मैत्रीचे नाते निर्माण होते. आयुष्याच्या त्या-त्या टप्प्यावर असे मित्र भेटत असतात, जे आपल्या आयुष्याचा काळ पुढे नेत असतात. काहीजण काळाप्रमाणे थोडे दूर गेलेले असतात काही काळाप्रमाणे आपल्याबरोबर असतात; पण प्रत्येकजण असतो आपल्याबरोबर, कोणी आठवणीत असतो, कोणी आताबरोबर असतो. केव्हा-केव्हा आपल्याला वाटते तो आता बदलला, आत्ता माझा पहिल्यासारखा मित्र राहिला नाही. काहीही असले तरी आपण या सर्वांचे आपल्या हृदयापासून कायम आभारी असले पाहिजे. कारण या सर्वांनी त्या-त्या काळात आपले आयुष्य जगणे सुकर केलेले असते. आता आपल्या सगळ्यांकडे मोबाइल आहेत. आपल्या आयुष्यातल्या अशा मित्रांना केव्हा तरी फोन करून विचारपूस केल्यास त्या-त्या काळातील आठवणींचे आयुष्य पुन्हा जगता येते. माणसे या जगातून निघून गेल्यावर कितीही बोलावेसे वाटले तरी बोलता येत नाही. एखाद्या मित्राचा काही रुसवा-फुगवा झाला असेल, तरीही विसरून आवश्य बोलावे.

तर मित्रांनो, सांगायचा मुद्दा हा की, माणूस हा सहवासप्रिय प्राणी आहे आणि आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर ज्यांनी-ज्यांनी आपल्याला आनंदाच्या भावना दिल्या, ते सर्वच आपल्या आयुष्यात असतात. कोणी प्रत्यक्षात तर कोणी आठवणींत. म्हणूनच ये दोस्ती तुझे सलाम...

**(माजी उपसंचालक (लेखा) तथा मोटिवेशनल स्पिकर आणि लाईफ कोच.)**

# झेंडूच्या फुलांचा शतकमहोत्सवी सुगंध!

**लीना संखे**

भावनांना हळुवार हात घालणारी कविता, यमकांच्या योजनेतून ओठांवर रुळत राहणारी कविता, कथो सालंकृत, नटून थटून भाषेचा साज चढवत समोर येणारी कविता, फार–फार तर सरळ समजायला कठीण म्हणून जिला कविता म्हणायचं ती कविता असे कवितांचे मोजके प्रकार ओळखून महाविद्यालयीन जगात वावरणारे विज्ञान शाखेचे विद्यार्थी आम्ही; पण बारावीच्या अभ्यासक्रमातल्याच एका कवितेने मात्र आम्हाला पुरतं चकित करून काव्य प्रकाराला शरण यायला भाग पाडल इतके की, महाविद्यालयीन शिक्षण संपवून २५ वर्षांहून अधिक वर्षांचा काळ लोटूनही त्या कवितेने आमची पाठ अद्याप सोडलेली नाही, आजही जी मुखोद्‌गत आहे. अशी आचार्य अत्रेंची प्रेमाचा गुलकंद हो कविता :–

*बागेतुनि वा बाजारातुनि कुठुनि तरी त्याने*
*गुलाबपुष्पे आणून द्यावित तिज'ला नियमाने!*
*कशास सांगू प्रेम तयाचे तिजवरती होते?*
*तुम्हीच उकला बिंग यातले काय असावे ते!*

असे म्हणत तरुण वयातला गुलाब देऊन आपल्या प्रेमाचा प्रस्ताव मांडणारा प्रेमी, काहीही न बोलता त्यांच्या गुलांबाचा स्वीकार करणारी मुग्ध नायिका, त्यामुळे त्याचा सुटत चाललेला धीर आणि शेवटी सगळे धाडस एकवटून त्याने तिला विचारणा करणे.


*बोधित आलो पुजा तुज मी आजवरी रोज!*
*तरि न उमगशी अजुनि कसे तूं भक्ताचे काज?*
*गेंद गुलाबी मुसमुसणारे तुला अर्पिलेले*
*तोच ओरडून त्यास म्हणे ती आळ वृथा हा की!*
*सांग तरी सुंदरी, फुकट का ते सगळे गेले? एकही न पाकळी दवडली तुम्ही दिल्यापैकी क्षणात घेऊनि ये बाहेरी कसलीशी बरणी!*
*असे बोलूनी त्याच पावली आत जाय रमणी*
*म्हणे पाहा – मी यात टाकले ते तुमचे गेंद*
*आणि बनवला तुमच्यासाठी इतुका गुलकंद!*

....सगळंच अद्‌भुत. शेवटी वास्तवाचे चटके सोसून तिने दिलेली बरणी खांद्यावर घेऊन येणाऱ्या प्रेमिकाची मनोवस्था कशी व्यक्त झाली आहे पाहा.

*क्षणैक दिसले तारांगण त्या–परी शांत झाला!*
*तसाच बरणी आणि घेउनी खांद्यावरि आला ! !*
*प्रेमापायीं भरला बोलो, भुर्दंड न थोडा !*
*प्रेमलाभ नच गुलकंद तरी कशास हा दवडा?*

याच औषधावरी पुढे तो कसा तरी जगला, हृदय थांबुनी कधीच ना तरि तो असता खपला! तोंड आंबले असेल ज्यांचे प्रेमनिराशेने प्रेमाचा गुलकंद तयांनी चाटुनि हा बघणे!


दिवाळीत जशी लवंगी फटाक्याची माळ एकामागोमाग एक फुटत वाजत जाते, तशी बहार आणत गमतीदार व मनोरंजक वळणे घेत, या कवितेची आतषबाजी अनुभवायला मिळते. आचार्य अत्रे यांनी केशवकुमार या टोपण नावाने लिहिलेल्या झेंडूची फुले या विडबंन काव्य संग्रहातील ही कविता. अलीकडेच या काव्यसंग्रहाने शतकोत्तरी प्रवास पूर्ण केला आहे. शतकापूर्वीचे काव्य जर आजही इतके टवटवीत राहत असेल, तर या झेंडूच्या फुलांचा मोह कुणाला सोडवेल? तरी आपल्या समर्पणात कवी या झेंडूच्या फुलांची भूमिका कशी मांडतात पाहा.




बोलून चालून झेंडूची फुले! यांना वास तरी कसला आणि रंग तरी कसला? मोहक फुलांच्या सुवासासाठी हपापलेली रसिकता या बिनवासाच्या आणि भडक रंगाच्या दरिद्री आहेराचा कसा स्वीकार करणार? उलट तिच्या भावनेची कोमलता दुखवल्याचा उद्धटपणा केल्याचे पाप मात्र पदरी यावयाचे तरीपण वाङ्‌मयाच्या वरातीत कोतवाली घोड्याप्रमाणे पुढे–पुढे नाचणाऱ्या घोडकवींच्या गळ्यांत सणांसुदीचे दिवशी माळा करून घालावयाला जरी ही झेंडूची फुले उपयोगी पडली तरी लेखकाला आपल्या श्रमाचे सार्थक झाल्यासारखे वाटेल!

या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत मी विडंबनकार कसा झालो हे सांगताना आचार्य अत्रे म्हणतात, मला आठवते तेव्हापासून मी लिहितो अन् कविता करतो. बालकवींना माझ्या काव्य लेखनाचे मी गुरू केले. गडकऱ्यांच्या कविताही मला अतिशय आवडत. त्या साऱ्या मला तोंडपाठ होत्या. मी लागलो तो नवकवितेच्या वैभवाचा काळ होता. केशवसुतांच्या तुतारीच्या ललकाऱ्या वातावरणात उचंबळत होत्या. बालकवींच्या प्रतिभेचा अरुण महाराष्ट्राच्या क्षितिजावर नुकताच उगवला होता. गोविंदाग्रज, कवी बी, कविवर्य भा.रा. तांबे यांच्या माध्यमातून नवकवितेची एक विलक्षण धुंदी आमच्या डोळ्यावर चढली होती. डोक्यात एकप्रकारची मस्ती भरून राहिली होती. या धुंदीतून सन १९२०–२१ साली आम्हाला जागे केले. ही मंडळी दर रविवारी एकत्र जमत. त्यात माधव जुलियन हे रवीकिरण मंडळाचे खरे रवी होते. बाकी निदान त्यावेळी तरी किरणे होती. या मंडळावर माधव जुलियनांमुळे फारशी भाषेचा आणि फारशी कवितेचा विलक्षण पगडा होता. त्या फारशी व संस्कृतप्रचुर काव्याला व माधवरावांचे अनुकरण करणाऱ्या कवी मंडळींना त्यांच्या काव्यातले दोष सांगताना विडंबन काव्य मी बडबडू लागलो आणि काही विनोदी कविताही मी त्या

ओघात लिहून टाकल्या. १९२२ च्या मे महिन्यात मी झेंडूची फुले लिहिली खरी; पण त्याचे हस्तलिखित ४ वर्ष तसेच पडून होते. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात शारदोपासक संमेलन भरले होते. त्यात एका संध्याकाळी झेंडूच्या फुलांचा जाहीर वाचन करण्याचा योग आला आणि सर्वांच्या हसता हसता मुरकुंड्या वळल्या. झेंडूच्या फुलांच्या लोकप्रियतेचे एक वैशिष्ट्य असे की, वाङ्मयाशी ज्यांचा सुतरामही संबंध नाही, अशा वाचकांनाही ते आवडले. झेंडूच्या फुलांना महाराष्ट्रात जेवढी लोकप्रियता मिळाली तेवढी दुसऱ्या कुठल्याच काव्यप्रकाराला मिळाली नाही, हे अगदी सत्य आहे; पण हे सांगतानाच विडंबन काव्याठायी कोणते गुण असणे अत्यावश्यक आहे, याचीही वाच्यता आचार्य अत्रे खालीलप्रमाणे करतात.




विडंबन करून जो हंशा पिकवतो, त्याचे एकच कारण म्हणजे तो स्वतः पट्टीचा घोडेस्वार असतो. स्वतः निर्दोष काव्य जो लिहू शकतो तोच दुसऱ्यांच्या काव्यामधल्या दोषांचे विडंबन करू शकेल किंवा त्यालाच तसे विडंबन करण्याचा अधिकार पोहोचतो. तथापि बिडंबनकराच्या अंगांत एवढाच गुण असून भागत नाही. त्यांच्या अंगात तल्लख विनोदबुद्धी असेल, तरच त्याला प्रभावी विडंबने लिहिता येतील.

झेंडूची फुले निर्माण होण्यास जी परिस्थिती कारण झाली ती लक्षात घेतल्यावाचून विडंबन काव्याच्या खऱ्या स्वरूपाचे आकलन होणार नाही. विडंबन काव्य हा एक वाङ्मयीन टीकेचा अत्यंत सुसंस्कृत आणि प्रभावी प्रकार आहे. विडंबनाचे हत्यार फार कौशल्याने आणि कोमलतेने वापरावयाला हवे. विडंबनकाराची वाङ्मयीन अभिरुची फारच उच्च दर्जाची असावयास पाहिजे. सौंदर्य समीक्षणाचे फार सूक्ष्म सामर्थ्य त्याच्या अंगी असावयाला हवे. ध्वनीच्या आणि अर्थाच्या अगदी बारीक-सारीक छटादेखील त्याच्या नजरेमधून सुटता कामा नयेत. ज्या भाषेमधले वाङ्मय अत्यंत प्रगल्भ आणि संपन्न आहे आणि ज्या भाषेच्या लोकांची वाङ्मयीन अभिरुची अत्यंत उच्च दर्जाची आहे. त्याच भाषेत उत्तम गद्य वा पद्य विडंबने निर्माण होण्याची शक्यता जास्त आहे. विडंबन या शब्दाचा अर्थ हास्यास्पद नक्कल करणे किंवा वेडावण्या दाखविणे, असा होत असल्याने आणि विडंबनाचे विटंबनेशी अधिक साम्य असल्यामुळे सदर वाङ्मयप्रकार हा अनिष्ट आहे, असा सामान्य माणसाच्या मनावर एक संस्कार होत असतो. तो मात्र बरोबर नव्हे, असे मला या ठिकाणी आग्रहाने सांगावयाचे आहे. विडंबन ही संभावित साहित्यिकांनी करण्यासारखी गोष्ट नाही, असाही नावावरून एक ध्वनी सूचित होतो. तोही पण भ्रामक आहे. कारण विडंबन हा विरोधी भक्तीचा एक प्रकार आहे. ज्या काव्याचे विडंबन करावयाचे किंवा ज्या कवीचे विडंबन करावयाचे ते काव्य आणि तो कवी लोकप्रिय असावयाला हवा. तरच त्याच्या विडंबनाचा आस्वाद वाचकांना घेता येईल. मूळ काव्य जितके प्रसिद्ध तितकी त्याच्या विडंबनाची गोडी अधिक. लुंग्या-सुंग्या कवीचे किंवा काव्याचे विडंबन मुळी होऊच शकत नाही, झाले तर ते वाचणार कोण आणि समजणार कोणाला? रविकिरण मंडळातले कवी जर फाटके तुटके असते आणि त्यांच्या काव्यांत गुणांचा लवलेश नसता, तर झेंडूच्या फुलांना महाराष्ट्रात जी अपरंपार लोकप्रियता लाभली ती मुळीच लाभली नसती. एखाद्या कवीचे विडंबन करणे म्हणजे त्याबद्दल अप्रत्यक्षपणे आदर व्यक्त करण्यासारखेच आहे. विडंबन काव्याचे हे स्वरूप एकदा लक्षात आले म्हणजे विडंबनकाराबद्दल कोणाचाही गैरसमज होणार नाही. वाचकांचा नाही आणि विडंबितांचा पण नाही. उलट विडंबनकार हा पुष्कळांना आपला उपकारकर्ताच आहे असे वाटेल!

झेंडूची फुले या विडंबन काव्यसंग्रहाच्या पुढील आवृत्तीच्या सुरुवातीस साहित्याचार्य श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे खासगी पत्र छापण्यात आले आहे. त्यात या काव्यसंग्रहातील कवितांविषयी आणि कवितेच्या कर्त्याविषयी लिहिलेला खालील मजकूर पुरेसा बोलका आहे.

या विडंबन काव्यांत आपण ज्या कवींच्या कवितांची थट्टा केली आहे, त्यापैकी बहुतेक माझ्या परिचयाचे असून, त्यातील अनेक माझे स्नेही आहेत. त्यांतील कित्येकांच्या कवित्वशक्तीबद्दल मला आदर वाटतो व कवितांबद्दल प्रेम वाटतं. असे असतानाही मी प्रस्तुत पुस्तकांतील विनोदाचा आस्वाद उत्तम प्रकारे घेऊ शकलो, याचे कारण त्या विनोदाचा अस्सलपणाच होय. वृत्तपत्रांतून प्रथम या काव्यांतील पंक्ती माझ्या अवलोनांत आल्या, तेव्हाच या काव्याचा कर्ता अत्यंत बुद्धिमान असला पाहिजे, असे मी अनुमान काढिले. ते खरे ठरले आहे, हे पाहून समाधान वाटते.

काव्यदोष दाखविणारा टीकाकार स्वतः निर्दोष काव्य लिहिणारा कवी असला तर दुधात साखर पडते. प्रस्तुत काव्याच्याद्वारा कवींच्या दोषांची थट्टा करण्याचा हेतू असला तरी थट्टा करिता-करिताही कवितेची रचना सरस झाली आहे. हे सखे बोल बोल, रस्त्यावर पडलेले विडीचे थोटूक या मथळ्याखाली आलेल्या दोन कविता, व नवरसमंजिरी या कवितांवरून स्पष्ट होते. सुंदर मनुष्याने दुसऱ्यास वेडावण्याकरितां स्वतःचे मुख कितीही विकृत केले तरी ते सुंदरच दिसते.

कवींच्या आत्मप्रौढीवर, अनुकरणप्रियतेवर विनोदी पद्धतीने आचार्य अत्रे यांनी केलेली ही टीका म्हणूनच काव्याचा उत्तम प्रकार म्हणून आपल्यासमोर येते. हा काव्यसंग्रह आवर्जून विकत घेऊन संग्रही ठेवण्यासारखा आहे. तसेच काव्यसंग्रह इंटरनेट अर्काइव्हवर उपलब्ध असून, या कवितासंग्रहाचे शतकमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून डिंपल पब्लिकेशनमार्फत डॉ. महेश केळुसकर यांनी संपादित केलेली झेंडूची फुले-१०० शताब्दीवर्ष आवृत्तीही उपलब्ध आहे. तेव्हा झेंडूच्या फुलांचा आस्वाद नक्की घ्यावा...

**(उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.)**

# जगभरातील सर्व आदिवासी व पर्यावरणप्रेमींना अभिवादन

**डॉ. एच. एम. पाटील**

*'आदिवासी समाज – सल्लामसलतीपासून सहनिर्मितीकडे : अबुधाबी येथील IUCN परिषदेचा स्तुत्य ठरावाच्या निमित्ताने...*

आज आपण एका अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर उभे आहोत. शाश्वत विकास, जैवविविधतेचे रक्षण आणि हवामान बदलाशी सामना करण्याच्या प्रयत्नात एक नवी दृष्टी आकार घेत आहे, ती म्हणजे आदिवासी समाजाचे महत्त्व सल्लामसलतीपुरते नव्हे, तर सहनिर्मितीकरिता आवश्यक ठरणार आहे.



गेल्या काही दशकांमध्ये आपण विकास, संवर्धन आणि समाजातील सहभाग याबद्दल बरंच काही बोललो आणि त्याप्रमाणे चाललो खरं; पण खरं सांगायचं झालं तर, आदिवासी समाजाचा सहभाग आजवर सल्लागार म्हणूनच पाहिला गेला – निर्णयप्रक्रियेतील सहनिर्माता म्हणून नव्हे. आज मात्र परिस्थिती बदलली आहे.

अलीकडे आयोजित केलेल्या World Summit of Indigenous Peoples and Nature या ऐतिहासिक शिखर परिषदेत प्रथमच जगभरातील आदिवासी प्रतिनिधींना धोरणनिर्मितीतील सहनिर्माता म्हणून मान्यता देण्यात आली. हा केवळ एक कार्यक्रम नव्हते, तर विकासाच्या विचारसरणीतील आमूलाग्र परिवर्तनाचे चिन्ह आहे.

या परिषदेत मांडलेली Scaling Deep ही संकल्पनादेखील या नव्या दृष्टीचा केंद्रबिंदू ठरते.

आपण आजवर Scaling Up – म्हणजे प्रकल्पांचा विस्तार आणि निधी वाढ – या दृष्टीने शाश्वततेचा विचार केला; पण Scaling Deep आपल्याला शिकवते की खरा बदल आकड्यांत नाही, तर मानवी मूल्यांत, संस्कृतीत आणि वर्तनात आहे. जेव्हा समाजाच्या मनामध्ये निसर्गाविषयी आदर, संवेदनशीलता आणि सहजीवनाची वृत्ती रुजते – तोच पाया शाश्वत आणि भक्कम होतो. हे ज्ञान, ही जीवनदृष्टी आदिवासी समाजाकडे शतकानुशतके आहे.

आपण जर थोडा विचार केला, तर आदिवासी समाज निसर्गाचा मालक म्हणून नव्हे, तर त्याचा घटक म्हणून स्वतःला पाहतो. झाडे, प्राणी, नद्या, डोंगर या सर्वांशी त्यांचे नाते केवळ उपभोगाचे नाही, तर भावनिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक आहे. हेच ते नाते आपणास अपेक्षित असलेल्या शाश्वततेचे मूळ आहे.

माझ्या सातपुडा पर्वतरांगेतील कार्यानुभवातून मला हे अनेकदा जाणवले आहे. नमामि सातपुडा मिशन आणि जलसाक्षरता समिती अक्राणीच्या यांच्या माध्यमातून आम्ही पाणलोट व्यवस्थापन, पारंपरिक बीज संकलन, वृक्षारोपण, आणि प्लास्टिक निर्मूलनासारख्या उपक्रमांत स्थानिक आदिवासी समाजाचा पूर्ण आणि निरपेक्ष सहभाग पाहिला.

शासन दिशा देते; पण निर्णय आणि अंमलबजावणी ही समाजच करतो – हीच तर खरी सहनिर्मिती आहे.

आज जगभरातील धोरणनिर्माते आणि वैज्ञानिक या अनुभवांकडे लक्ष देत आहेत. कारण केवळ प्रकल्प आणि निधी हे उत्तर नाही. आपल्याला हवा आहे, तर lue Transformation – म्हणजे निसर्गाशी असलेल्या नात्यातील बदल आणि हा बदल घडवण्यासाठी आदिवासी समाज हा केवळ सहभागी नाही, तर मुख्य भागीदार आहे.

IUCN च्या २०२५ अबुधाबी येथील परिषदेत मांडण्यात आलेल्या Nature Positive Future या संकल्पनेतही याच विचाराची पुनर्मांडणी करण्यात आली आहे – There can be no nature – positive world without indigenous peoples at the centre. म्हणूनच आता वेळ आली आहे सल्लामसलतीच्या चौकटीतून बाहेर पडून सहनिर्मितीच्या भूमिकेचं स्वागत करण्याची, त्यासोबत काम करण्याची, यासाठी धोरणकर्त्यांनी, संशोधकांनी आणि स्थानिक समाजांनी एकत्र येणे आवश्यक आहे.

संविधानिक हक्क, स्थानिक स्वराज्य संस्था आणि शैक्षणिक संशोधन यांच्यात समन्वय निर्माण झाला, तर आपण Scaling Deep च्या माध्यमातून समाजाच्या अंतःकरणात शाश्वततेचा दीप लावू शकतो.

माझ्या पीएचडीचे संशोधन हे आदिवासींच्या याच शाश्वत ठेव्यावर (पारंपरिक बियाणे) होते आणि तोच टिकविण्यासाठी त्यांचा स्वयंस्फूर्त सहभाग मिळाला तेव्हाच जलसाक्षरता समिती व नमामि सातपुडा मिशनसारख्या उपक्रमांना कुठल्याही निधी व सरकारी मदती शिवाय लोकचळवळीचे रूप आले.

आदिवासी समाज फक्त निसर्गासोबत जगत नाही, तो निसर्गाला जगवतो. त्याच्या जीवनपद्धतीत, सणांमध्ये, गाण्यांमध्ये आणि कलेत निसर्गाचे श्वास गुंफलेले आहेत. ही संस्कृती जपली, तर विकासाला मानवी चेहरा मिळेल. बाजारीकरण हे त्यासाठी पर्यायी उत्तर नाहीच नाही.

*चला, आपण सगळे मिळून ही दिशा स्वीकारू या –*
*जिथे विकास केवळ आकडे नाही, तर मूल्यं आहेत;*
*जिथे सहभाग नाही, तर सहनिर्मिती आहे;*
*आणि जिथे निसर्ग हा संसाधन नाही, तर सहचर आहे.*

**(प्राचार्य, जी.व्ही. एस. आर्ट्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, जि. नंदुरबार.)**

# केळ एक गुणकारी फळ

**डॉ. प्रकाश कोंडेकर**

काही मुलांना केळं खायला खूप आवडतात. त्यातही वेलची केळं असेल, तर मस्तच.

मोठ्या माणसांनाही, येता-जाताना कधीही केळी खावीशी वाटतात. काही जणांना केळ्याचं शिकरण पोळीबरोबर खायला आवडते, तर काहींना, मिल्क शेक आवडतो. पिकलेली केळी तर सर्वजण खातातच; पण कच्च्या केळांचीही भाजी व भजी बनवायला उपयोग केला जातो. कच्च्या केळांमध्ये भरपूर प्रमाणात पोटॅशिअम असते, ज्याचा उपयोग रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी होतो. तसेच जगामध्ये केळी न खाल्लेला माणूस मिळणं कठीणच. इंग्रजीमध्ये केळासाठी असलेला बनाना शब्द, बानन या अरेबिक शब्दावरून आला. *बाननचा अर्थ बोट.*



१०० ग्रॅम केळामध्ये सर्वसाधारणपणे ७४ ग्रॅम पाणी, १ ग्रॅम प्रथिने, २२ ग्रॅम कार्बोदके, २ ग्रॅम तंतुमय पदार्थ व बरीचशी थायामीन, नियासिनसारखी जीवनसत्वे व लोह, तांबे इ.खनिजे पण असतात. या सर्वांचा रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी उपयोग होतो.

केळामधील मोठ्या प्रमाणात असलेल्या कर्बोदकांमुळे, एक किंवा दोन केळी, न्याहरीची वा संध्याकाळची भूकही भागवू शकतात. स्पर्धेत खेळणाऱ्या खेळाडूंसाठी केळी म्हणजे शरीरातील गेलेली ऊर्जा त्वरित मिळविण्याचे महत्त्वाचे साधन. पिकलेल्या केळामधील २१ टक्के असलेल्या साखरेमुळे व तंतुमय पदार्थामुळे पचनसंस्थेचे पचनाचे कार्य अतिशय चांगल्या प्रमाणात होते.

कच्ची शिजवून खाल्लेली केळाची भाजी म्हणजे बद्धकोष्ठतेवरील रामबाण उपाय. काही चिकित्सकांच्या मते, रोज एक छोटे कच्चे केळे खाल्ल्यामुळे मधुमेह नियंत्रणात आणता येतो.

केळी जसजशी पिकत जातात, तसतसे त्यातील 'क 'जीवनसत्व वाढत जाते. भूक न लागणे, मुला-मुलींमधील वाढ खुंटणे, स्नायूंची कमतरता जाणवणे, पायांमध्ये पेटके येणे, रक्ताल्पता व मज्जासंस्थेच्या अकार्यक्षमतेवर मात करण्यासाठी, मुलांच्या अभ्यासातील एकाग्रता वाढविण्यासाठी, केळामधील पायरिडॉक्सिन (बी-६) या जीवनसत्त्वाचा उपयोग होतो.

केळांमध्ये जीवनसत्त्वे व खनिजे असतात, जी अप्रत्यक्ष स्वरूपात लैंगिक कार्य सुधारू शकतात. मॅग्नेशिअम टेस्टोस्टेरॉनची पातळी वाढविण्यास मदत करते, तर पोटॅशिअम रक्तदाब व रक्तप्रवाह नियंत्रित करण्यास मदत करत. हे दोन घटक पुरुषांच्या लैंगिक आरोग्यासाठी फायदेशीर असतात. अशाप्रकारे निसर्गोपचारामध्ये केळाचा वापर औषधाची करंडी म्हणून होतो.

B.Sc (Hons), LL.B, N.D, AVR, FRSH (London), BTER (UK) IIPA Member.

# देवनागरी सुलेखन भाग-५

**अजय भोसले**

आज आपण त ,ट, ठ , ड, ह या समूहातील अक्षरे घेऊ. देवनागरी सुलेखन सुलभ पद्धतीने समजून घेण्याकरिता त्यातील साम्यस्थळे ओळखू. जर 'त' हे अक्षर डावीकडे अर्धवट सोडले, तर इतर अक्षरे त्यातून कशी निर्माण करता येतील हे पाहू.

बाजूच्या चित्रात अक्षरांचे निरीक्षण करा. विशेषतः जिथे 'त' डावीकडे आपले वळण सोडतो.

अशाप्रकारे अन्य अक्षरांच्या निरीक्षणाने एकाच अक्षरातून इतर अक्षरे कशी निर्माण करता येतील, हे आपण पुढच्या भागात पाहू...




**(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन).**

**आपलं मंत्रालय' या गृहपत्रिकेतील 'वेगळ्या वाटा' या सदरातून शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्यांनी विविध क्षेत्रांत प्राप्त केलेल्या उल्लेखनीय यशाचा आढावा घेतला जात असून, त्यांच्या कार्यातील वेगळेपणा तसेच विशेष कामगिरी अधोरेखित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. श्री. समर मोघे यांनी साहित्य क्षेत्रात केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे. अल्पवयातच त्यांनी कादंबरी, महाकाव्य, नाटक, कविता, विज्ञानकथा इत्यादी विविध साहित्य क्षेत्रात लेखन करून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या विविध पुस्तकांमधून प्रकट होणाऱ्या सर्जनशीलतेद्वारे त्यांनी मराठी साहित्यक्षेत्रात एक वेगळी दिशा दाखवली आहे. साहित्य, इतिहास, अध्यात्म आणि विज्ञान यांचा संगम साधणारे त्यांचे लेखन हे त्यांच्या सखोल अभ्यास, विचारप्रगल्भता आणि प्रतिभेचे द्योतक आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीचा आढावा या लेखातून घेण्यात आला आहे.**

# वेगळ्या वाटा

फक्त २४ वर्षांच्या वयात महाकाव्य, कादंबऱ्या, नाटके, कविता, विज्ञानकथा आणि संशोधनात्मक लेखन एवढं वैविध्यपूर्ण योगदान देणारा तरुण लेखक म्हणजे समर. त्यांची लेखणी परंपरेचा आदर राखत आधुनिकतेशी संवाद साधते. प्रत्येक कृतीत विचारांचा गडद प्रवाह आणि भावनांचा सुगंध जाणवतो.

वयाच्या केवळ सोळाव्या वर्षी ३,५०० ओव्यांचं 'महाकाव्य शिव–प्रताप' लिहून समर यांनी मराठी साहित्यविश्वाचं लक्ष वेधून घेतलं. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित या ग्रंथाला शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांची प्रस्तावना लाभली. हे महाकाव्य १९ काव्यप्रकारांमध्ये रचलेलं असल्याने ते मराठीतील पहिलंच बहुरूपी महाकाव्य ठरलं. नाटकाच्या रंगभूमीवर त्यांनी वयाच्या १७व्या वर्षी 'संगीत चंद्रप्रिया' या ऐतिहासिक संगीत नाटकाद्वारे प्रवेश केला. सम्राट चंद्रगुप्त विक्रमादित्य यांच्या जीवनावर आधारित हे नाटक पुणे, मुंबई, रत्नागिरी आणि नाशिक येथे सादर झाले.




२०१९ मध्ये त्यांनी 'ऊर्मिला – एका अज्ञात एकांताचा मानवी प्रवास' ही कादंबरी लिहिली. लक्ष्मणपत्नी ऊर्मिलेच्या भावविश्वावर आधारित मराठीतील पहिली संपूर्ण कादंबरी म्हणून ती विशेष ठरली. यानंतर 'महाभारतातील १०८ अद्भुत रहस्ये' हे पुस्तक आणि नंतर 'तथागत' ही गौतम बुद्धांच्या जीवनावर आधारित आत्मकथन शैलीतील कादंबरी प्रकाशित झाली.

इतिहास आणि अध्यात्माच्या पलीकडे जाऊन समर यांनी विज्ञानकथांचं विश्वही निर्माण केलं. 'रेवन रॉय अँड द गेम ऑफ पॅरॅलल युनिव्हर्सेस' ही मराठीतील पहिली पॅरॅलल युनिव्हर्स संकल्पनेवरील कादंबरी म्हणून ओळखली जाते. 'महाराजाधिराज' ही सम्राट समुद्रगुप्त यांच्या जीवनावर आधारित कादंबरी त्यांच्या ऐतिहासिक दृष्टीची झलक दाखवते.

'चाहूल' या कवितासंग्रहात त्यांनी यमकबद्ध, मुक्तछंद आणि गझलांसह शंभराहून अधिक कविता मांडल्या आहेत. 'दैनिक महाराष्ट्र टाइम्स'मधील 'कातरवेल' या लेखमालेतून त्यांचा विचारशील लेखक आपल्यासमोर येतो.

'मेनका' मासिकात त्यांच्या 'स्मृतिविप्लव' या विज्ञानकथा मालिकेचे नऊ भाग प्रसिद्ध झाले. शेक्सपियरच्या 'Romeo and Juliet' चे मराठी रूपांतर; तसेच 'संगीत कालिदासवियोग' हे नवं नाटक त्यांनी सादर केलं आहे.

शिक्षणाच्या आघाडीवर त्यांनी मराठी विषयात पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून UGC NET पात्रता मिळवली. वयाच्या १४व्या वर्षीच पं. नेहरू आणि पंचशील या विषयावर पहिलं व्याख्यान देत त्यांनी वक्तृत्वाचा पाया रचला.

त्यांच्या प्रतिभेला अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

अण्णासाहेब किर्लोस्कर पुरस्कार (बालगंधर्व संगीत मंडळ – २०१९)

पं. शंकरराव वैरागकर फाउंडेशन विशेष पुरस्कार

चैत्र गौरव पुरस्कार (चैत्र उद्योग समूह, नाशिक – २०१९)

'दैनिक महाराष्ट्र टाइम्स' साहित्य संमेलनातील विशेष सन्मान

इतिहास, अध्यात्म, विज्ञान आणि साहित्य या सर्व क्षेत्रांमध्ये सामर यांची लेखणी सहजतेने विहरते. त्यांच्या लेखनात विचारांचा ठाव, भाषेचे सौंदर्य आणि आशयाची खोली यांचा अनोखा संगम आहे. मराठी साहित्यविश्वात तेजोमय ठरणारं हे नाव 'समर' तरुणाईसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ ठरत आहे.

**शब्दांकन : अश्विनी पुजारी,** सहायक संचालक (माहिती).

# पु.लं.चे 'आनंदी' विनोद

**मीनल जोगळेकर**

*पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे.. महाराष्ट्राचे लाडके लेखक, नाटककार, नट, कथा व पटकथाकार, दिग्दर्शक, नाटका., गायक, संगीत दिग्दर्शक आणि वक्ते, महाराष्ट्रभूषण पु. ल. वांनी एकपात्री–बहुपात्री नाटक, चित्रपट, नभोवाणी, दूरचित्रवाणी अशा सर्व क्षेत्रांत, त्यांनी आपल्या चतुरस्र व्यक्तिमत्त्वाची छाप सोडली. जगाच्या पाठीवर जिथे जिथे मराठी भाषा पोहोचली असेल, तिथे–तिथे पु.लं. चा प्रसन्न विनोद पोहोचला आहे, एवढे नक्की. पु. लं. च्या काही निवडक कोट्या खास आपलं मंत्रालयाच्या वाचकांसाठी..*

पु.ल. यांच्या ओळखीच्या एका मुलीचे लग्न ठरले. योगायोगाने माहेरचे आणि सासरचे आडनाव एकच होते. हे कळाल्यावर पु.ल. म्हणाले, बाकी काही म्हणा, पण मुलीने घराण्याचे नाम राखले हो.

पु.ल. यांच्या लहानपणीचा एक प्रसंग त्यांची चुणूक दाखवणारा आहे. ते १५ वर्षांचे असताना लोकमान्य सेवा संघात साहित्य सम्राट न. चिं केळकराचं व्याख्यान होतं. व्याख्यानानंतर श्रोत्यांना :

*पुलस्पर्श होताच दुःखे पळाली*
*नवा सूर, आनंद्यात्रा मिळाली*
*निराशेतूनी माणसे मुक्त झाली*
*जगू लागली, हास्यगंगेत न्हाली*
**– मंगेश पाडगावकर**

प्रश्न विचारण्याची मुभा होती. त्या काळी भारतानं फेडरेशन स्वीकारावं की स्वीकारू नये, यावर चर्चा चालू होती. शाळकरी पुरुषोत्तम उभा राहिला आणि त्यानं तात्यासाहेबांना फेडरेशन स्वीकारावं, की स्वीकारू नये, असा प्रश्न धीटपणे विचारला. त्यावर तात्यासाहेबांनी उत्तर दिले. स्वीकारू नये, पण राबवावे, यावर पुरुषोत्तम म्हणाला, मला आपलं उत्तर कळलं नाही. तेव्हा समजावणीच्या सुरात ते म्हणाले, बाळ, आपल्याला कळेल, असाच प्रश्न लहान मुलांनी विचारावा, यावर पुरुषोत्तम लगेच म्हणाला, पुण्याला सध्या अंजिरांचा भाव काय आहे?

तात्यासाहेबांचे काही उत्तर येण्यापूर्वीच सभागृह श्रोत्यांच्या हसण्याने भरून गेलं. एकदा पु.ल. यांना एक क्रोकरी सेट गिफ्ट म्हणून मिळाला. तो सेट सुनीताताई देशपांडे आपल्या भाचीला दाखवत होत्या. सुनीताबाईंचा 'सर्व काही जपून ठेवण्याचा स्वभाव माहीत असल्यामुळे भाची सुनीताबाईंना म्हणाली, अगं, एवढा सुंदर सेट फुटू नये, या भीतीने तू तो कधी वापरणारच नाहीस का? यावर पु.ल. पटकन म्हणाले हो तर!! सुनीता मला कधी ऑमलेटसुद्धा करून देत नाही... अंडी फुटतील म्हणून !!!

एकदा पु.ल. प्रवासात असताना त्यांना कोणीतरी भेटला, तो त्यांचा चाहता होता. तो म्हणाला की, माझी दोन व्यक्तींवर श्रद्धा आहे, एक ज्ञानेश्वर आणि दुसरे तुम्ही. माझ्या खोलीत मी ज्ञानेश्वरांच्या फोटोसमोर तुमचाही फोटो ठेवलाय, तर पु.लं. म्हणाले, अहो असं काही करू नका, नाहीतर लोक विचारतील, ज्ञानेश्वरांनी ज्यांच्याकडून वेद म्हणून घेतले तो रेडा हाच का म्हणून?

एकदा पु.ल. एका खेड्यात उतरले होते. तिकडच्या शाळेत प्रिन्सिपलनी त्यांना शाळेत बोलावून त्यांचा सत्कार केला. पु.ल. यांना दिलेल्या खुर्चीवर बसतच त्या खुर्चीचा हात मोडला, सगळी पोरं खो –खो हसायला लागली. ओशाळलेले प्रिन्सिपल पु.ल. यांना म्हणाले, माफ करा; पण हजार वेळा सांगूनही इकडच्या सुतारांकडून नीट कामच होत नाही. पु.ल. मिश्कीलीत म्हणाले, अहो करवत (:) नसेल. एकदा पु.ल. यांचे पाय खूप सुजले होते. तेव्हा आपल्या सुजलेल्या पायांकडे बघत ते म्हणाले, आता मला कळले, पायांना पाव का म्हणतात ते! एका संगीत समेलनाच्या भाषणात पु.ल. यांनी एक किस्सा सांगितला होता. एकदा एका शेताच्या बांधावरून जात असताना एक शेतकरी शेतात काहीतरी काम करताना दिसला. आम्हा लेखकांना कुठे गप्पा केल्याशिवाय राहवत नाही. त्या स्वभावानुसार मी त्या शेतकऱ्याला विचारलं, काय हो शेतकरी बुवा, या झाडाला कोणते खत घातले, तर त्याला चांगले टॉमेटो येतील? त्यावर तो शेतकरी चटकन म्हणाला, या झाडाला माझ्या हाडांचं खत जरी घातलंत, तरी त्याला टॉमेटो कधीच येणार नाहीत, कारण ते झाड वांग्याचे आहे!

'वाऱ्यावरची वरात'चा रवींद्र नाट्यमंदिरातला रात्रीचा प्रयोग, दुसऱ्या दिवशी बोहल्यावर चढायचे असल्याने लालजी देसाई आपले काम आटपून घाईघाईने निघाले. विंगेत उभे असलेल्या पु.ल. यांनी अंधारातच त्यांचा हात धरला आणि म्हणाले 'प्रयोग संपेपर्यंत थांब!' लालजींना कळेना. प्रयोग संपला; पण पु.ल. यांनी पडदा पुन्हा उघडायला लावला. लालजींचा हात धरून ते त्यांना रंगमंचावर घेऊन आले आणि प्रेक्षकांना म्हणाले, उद्या याची वरात निघणार आहे; पण तो आजच वाऱ्यावर स्वार होऊन आला आहे' आणि प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

एक गाजलेल्या संगीत नाटकात एक सुप्रसिद्ध गायक नट कित्येक वर्ष श्रीकृष्णाची भूमिका करत होता. खरंतर उतारवयामुळं ती भूमिका त्याला शोभत नव्हती, तरीही त्याचं आपलं श्रीकृष्णाची भूमिका करणं सुरूच होतं. प्रश्न होता, त्याला हे सांगायचं कुणी? एका रात्री त्या नाटकाचा प्रयोग होता. प्रयोगापूर्वीची नेहमीची गडबड सुरू होती. तो नट पितांबर नेसून, रत्नजडित अलंकार लेवून आणि डोक्यावर मुकुट चढवून, श्रीकृष्णाच्या संपूर्ण पेहरावात हातावरचा शेला आणि सुटलेलं पोट सावरत रंगपटात उभा होता. तेवढ्यात

एकदा पु.ल. आणि वसंतराव देशपांडे कुठल्याशा राधानगरी अभयारण्यात गेले होते. तिथे त्यांच्या कारसमोर एक महाकाय रानरेडा आला आणि त्यांच्याकडे खुनशीपणे बघू लागला. तेव्हा वसंतराव म्हणाले, भाई, आय थिंक ही ईज गोइंग टु चार्ज. पु.ल. त्यांना म्हणाले, रेड्याला कळू नये, म्हणून इंग्लिशमध्ये बोलतोयस वाटतं? हे ऐकल्यावर त्या भीतिदायक प्रसंगातही जोरदार हशा पिकला.

एकदा पु.ल. पुण्यातील एका मिठाईच्या दुकानातून मिठाई आणायला गेले. त्या मिठाईवाल्यानं कागदात बांधून ती मिठाई दिली. कागदातल्या मिठाईकडे पाहत पु.ल. यांनी 'बॉक्स मिळेल का?' म्हणून विचारलं. हो पण त्या बॉक्सला पैसे पडतील. 'दुकानदारानं टिपिकल पुणेरी पद्धतीनं उत्तर दिलं.' 'अरे वा! म्हणजे मिठाई फुकट, वाटतं? लगेच पु.ल. उद्गारले.

(पु.ल यांच्या नावे सांगितले जाणारे काही विनोद हे त्यांचे नसू शकतात, तरीही 'मुस्कुराने में क्या है..)

**(उपसंचालक मावज व संचालक, पु.लं. देशपांडे, महाराष्ट्र कला अकादमी.)**

## 'ती'च्या कविता...

स्वप्नातली दुनियाच न्यारी
रे घेतली मी कैलास भरारी
जडत्व सोडले, झाले हलकी पिसापरी
ओढ, कुतूहल अनामिक, चालले शिवाघरी

प्रवास बहु सुंदर होता
हिमाच्या राज्यात विहरता
ते गगन अन जमीनही शुभ्र करारी

सोबतीला राजस हंस थवे,
शांत पण त्यांची ऐट भारी
घातली तीर्थफेरी मानसरोवरी

क्षण एक फक्त हे सारे
आता पोहोचेन शिवाच्या द्वारी

कसा असेल? कुठे दिसेल?
गूढ मौनी योगी माझा
लावून भस्म शरीरी, मन विचारी

तोच नजरेसमोर उभा पार्वतीपती एकटा
आली कोण उभारी!
उमा ना दिसे
समजूतदार सखी,
मुद्दाम वाटते राहिली माघारी

क्षण एक पाहिले मी त्याला
मिटलेल्या त्याच्या समुद्रशांत नयनाला
टाकली पिऊन त्याची निद्रिस्त छबी प्यारी.
तोच हेलकावत आले, हलके पिंपळपान
गेले अलगद, त्याच्या चेहऱ्याला स्पर्शून

अन् उमलले ते नयनकमल
त्यातली करुणा न आवरी

अन् कटाक्षात एका
मी वितळले लोण्यापरी
सुटले अवधान तरी क्षण तो साक्षात्कारी

अधर झुकले चरणी त्याच्या
आता इंद्रिये मला ना विचारी
ओघळत्या अश्रूंचा माझ्या अभिषेक त्यावरी
अन् पान्हाही फुटला, वाहते झाले समपर्ण शेवटी
दाटून राहिले होते जे उरी

तो सांबही माझा किती उदार
त्याचा स्निग्ध कर माझ्या माथ्यावर
कसा फक्त स्पर्शान झाला भांग माझा शेंदरी

मागाहून आले त्याच्या उबदार बाहूंचे आमंत्रण गळले,
विरघळले मग मी सोडून दिला,
होता उरला जो प्राण
हे पुष्प माझे उरले आता निर्माल्यापरी

तोच घंटानाद झाला शिवमंदिरी यावे
लागले मंतरलेल्या या स्वप्नाबाहेरी
भेट अपूर्व, भास खरी
पण संतोष केवढा? अद्‌भुत खुमारी

कैलासातला तोच शिव
आता अंशात वसे माझ्या गाभारी
हे जीवन आता शिवार्पणास्तु

– लीना संखे,
उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.

## मी कधी टॉपर होते...

क्षितिजावरून उडणारे पक्ष्यांचे थवे
मी नेहमी पाहायचे,
अन् मी ठरवले...
त्यातले एक न व्हायचे...

मला तर क्षितिजापल्याडचं
खुणावत होतं आकाश...
स्वप्नांनी भारले होते...

माझे छोटेसे अवकाश...

बाबानेच हे स्वप्न दाखवले
मी तर फक्त गुंफले धागे
त्यांनी उठ म्हणता उठले
त्या स्वप्नातच मी रमले...
ते माझंही स्वप्न होतं...
अगदी आतलं, आतूनच आलेलं

तसं तुम्हाला कधी-कधी
कौतुक असायचं...

तोंडी लावण्यापुरतं...
माझं टॉपर असण्याचं...
आणि मग सुरू व्हायची तुमची...
मला कोशात अडकविण्याची पेरणी

तुम्ही हळूच समाज, संस्कार, रीत,
अशी गोंडस आयुधं,
माझ्या उडणाऱ्या पंखावर लादलीत
जी फक्त माझ्यासाठीच होती
मी बळच हरवून बसले पंखातले

मग सुरू झाली नव्याची नवलाई...
ओसरत नाही ती...
तर नऊ महिन्याची घाई

मग मीही संस्काराचा पदर खोचला
अन् बाळाच्या डोळ्यात उभा केला
माझ्या स्वप्नांचा डोलारा...
विसरूनच गेले मी...
की मी कधी टॉपर होते....

आता तुम्ही म्हणाल...
ही जरा जास्तच बोलते
नाही... मला हेही हवं होत;
पण माझंही काही स्वत्व होत
माझं स्वतःचं एक विश्व होतं
सोईस्करपणे दुर्लक्ष केलेत तुम्ही
की मी कधी टॉपर होते...



**– अजय भोसले,**
**अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.**

# 'मी'च्या कविता...

## मी...

त्रिकाल बाधित सत्य म्हणजेच 'मी'
'मी' पणातच खरे सत्य आहे,
'मी' नसेल तर मला किंमत शून्य,
मला, माझे हे सारे नाशिवंत आहे 'मी' सोडून
'मी' असतोच; पण कोणी लक्ष देत नाही.
मलाच सारे विकार जडतात
'मी' मात्र विकारहीनच
'मी' प्रत्येक प्राणीमात्रात आहे,
माझी ओळखच प्राणीजात आहे,
'मी' प्राणीमात्रात असली तरी
पैशांची गरज मानवाशिवाय कोणालाच नाही,
तेही विशिष्ट देशात विशिष्ट करन्सी
अन्य ठिकाणी शून्य
Money is the root of all evil म्हणतात, तेच खरं
सारे धावत असतात, पैशांच्या मागे
अपार कष्ट, शरीराला त्रास आणि
त्या त्रासातून पैसे
पैशामुळे अनेक संकटे, पुन्हा त्या संकटासाठी पैसे
पैसेच संकटात टाकतात, अन्
पैसेच संकटातून बाहेर काढतात
'मी' मात्र सारे त्रयस्थासारखे बघत असतो
'मी' मात्र दिसत नाही.
सारी शक्ती 'मी' पणातच आहे,
मला त्या शक्तीची कल्पनाच नाही.
माझा धंदा केवळ राबण्याचा,
काबाड कष्ट करण्याचा, गाढव ओझे वाहण्याचा
'मी' कसा शांत, निवांत
कशाच्या घेण्यात नाही, तर कशाच्या देण्यात नाही...

**– डॉ. रमेश नारायण,**
**निवृत्त महसूल अधिकारी.**

## सरेन मी..

सरेन मी गं सरेन मी संपुन जाईन कालप्रवाही तुझाच
म्हणुनि उरेन मी.

करेन सारी गुजे मोकळी पुन्हा गाली तव पाहीन खळी
जीवनातील सारी पोकळी जाण्यापूर्वी भरेन मी.

तुझा म्हणुनी मी, तू म्हणुनी मी सावलीत त्या तुझ्या सुखी
मी झेललीस तू उन्हे, जी मजसी सावली देण्या स्मरेन मी.

हात हाती तू धरतचि आली सांगितले ते करतची आली
अता सांग तू, करण्या काही सारे निश्चित करेन मी.

केल्या गोष्टी प्रेमापोटी त्यागही केला माझ्यासाठी ऋणी
तुझा मी, कृतज्ञभाव नित्य मनी ग धरेन मी.

प्रेम पंढरीची तू रखमा विठूकडूनी नकळत जखमा फुंकर
मायेची ती घालुन जखमा साऱ्या भरेन मी तुझाच म्हणुनि
उरेन मी...

**– सतीश मोघे,**
**निवृत्त सहसचिव, महाराष्ट्र शासन.**

# हा छंद जीवाला लावी पिसे...

**अश्विनी शिंदे-पवार**

***जगावे म्हणता जरा बैजवार, पुन्हा सोमवार आला देवा या वैभव जोशी यांच्या कवितेत म्हणल्याप्रमाणे आपल्या रोजच्या कामाच्या धावपळीत आणि घड्याळाच्या काट्यावर धावणाऱ्या आपल्या आयुष्याला थोडा 'ब्रेक' नेहमीच हवाहवासा वाटतो. जगण्याच्या रोजच्या धबाडग्यात दोन क्षणांची हिरवळी पाऊलवाट होतो...तो म्हणजे आपला 'छंद'!***

'व्यक्ती' एक केंद्रबिंदू मानला तर तिच्यापासून ते तिच्या परिघापर्यंत जाणारी एक रेषा म्हणजेच तिने जोपासलेला छंद ... जो व्यक्तीभोवती एक स्वतःचं वलय निर्माण करतो. 'वलय' अशासाठी म्हणलं की त्या परिघामध्ये असताना ती व्यक्ती स्वतःमध्ये मग्न असते. स्वतःच्या अंतरंगात डोकावत असते आणि ती त्या क्षणामध्ये फक्त स्वतःसाठी जगत असते...मग तो छंद कोणताही असेल. कुणाला रंगांशी खेळायला आवडते, तर कुणाला निसर्गाशी बोलायला! कुणी बागकामात गढून जातो, तर कुणी पुस्तकांनी वेढून घेतो! कुणाला माणसांशी बोलायला आवडते, तर कुणाला तालावर डोलायला आवडते.... कुणाला कविता आवडते, तर कुणी संगीतात हरवतो.... प्रत्येकाच्या मनामध्ये अशी एक तरी हळवी आणि आवडीची जागा असते, एक तरी अशी गोष्ट असते, ज्यात ती व्यक्ती मनापासून हरवते... स्वतःला हरवून नव्याने स्वतः ला सापडते... काही भाग्यवान लोकाना त्यांच्या आवडीचे, छंदाचे व्यावसायिकरण जमते तर काहीजण आपल्या छंदाला आयुष्यभर 'छंद' म्हणूनच जपतात.

'छंद' म्हणजेच नाद! या शब्दामध्येच इतकी लय आहे की, तिचा ताल पकडून आपणास अलगद स्वैर होता येते. आवडीच्या वाटांवर रेंगाळता येते.

शाळेत असल्यापासूनच मला हस्तकला आणि कागदकाम यामध्ये खूप रस होता. अगदी आजपर्यंतही मला त्यात तोच आनंद मिळतो, जो बालपणी निरागस चेहऱ्यावर फुलायचा. जरा मोठे होऊन कॉलेजच्या फुलपंखी वयात माझी पुस्तकांशी मैत्री झाली. कविता मला खुणवायला लागल्या, तेव्हा मला सुरेश भटांची गझल खूप आवडायची आणि कुसुमाग्रज हे माझे आवडते कवी होते. खूप कविता वाचता–वाचता माझ्याही कल्पनेला पंख फुटू लागले. थोडे–थोडे माझेही हात लिहिते झाले. कधी कविता, कधी प्रासंगिक, कधी अनुभव, तर कधी वाचलेल्या व्यक्ती कागदावर उतरू लागल्या. पुस्तकांशी मैत्री खरंच खूप अनोखी आहे .माझ्या आयुष्याच्या प्रत्येक वळणावर पुस्तके माझी सोबती झाली. शालेय वयात मला पुस्तकांनी बोट धरून जग दाखवले. कॉलेजच्या आडवयात कविता माझी सखी झाली. स्पर्धापरीक्षा अभ्यास करताना मला शिखरावरती नेऊन ठेवलं, तर आयुष्याच्या काही कठीण प्रसंगात जमिनीवर पाय ठेवण्याचं शहाणपणंही दिलं. पुस्तकांनी दिलेली हे शहाणपण आयुष्याची शिदोरी म्हणून नेहमी माझी सोबत करते.

माझा अजून एक प्रिय छंद म्हणजे रंगकाम आणि चित्र रेखाटन! फावल्या वेळेमध्ये कागदावर, कपड्यांवर, मातीच्या कुंड्यांवर अगदी भिंतीवरही माझे रंगाचे फुलपाखरू कुठेही अलगद विसावते! अलीकडे गणेशोत्सव काळात माझ्या चार वर्षांच्या मुलाच्या शर्टवर रेखाटलेले बालगणेशाचे चित्र आणि माझ्या मुलाच्या चेहऱ्यावर उमटलेला निरागस आनंदभाव याचे मोल अगदी शब्दातीत! कोरोनाकाळात, जग जेव्हा चार भिंतीत बंदिस्त झाले, तेव्हा माझ्या याच छंदांनी मला तारलं. मी आणि माझे कुटुंबीय यांचे मनोबल वाढवले. कोरोना काळात आम्ही, आमचे कुटुंबियांनी रोज नित्यनेमाने 'ज्ञानियांचा राजा ज्ञानेश्वर'(ले. प्रभाकर बागुल), 'राजर्षी शाहू' ग्रंथांचे प्रकटवाचन उपक्रम सुरू ठेवला होता. ज्यामुळे बाहेरील निराशेच्या जंतुसंसर्गापासून आम्ही बचावलो. वाचन छंदामुळे आम्ही खऱ्या अर्थाने 'वाचलो'.

फोटोग्राफी हा अजून एक माझा जिव्हाळ्याचा विषय! कॅमेऱ्यात टिपण्यासारखी कोणतीही वस्तू, व्यक्ती, ठिकाण, निसर्ग विशेषतः फुले यांनी माझ्या मोबाइलमधील जागा (space) नेहमीच व्यापलेली असते. माझ्या मैत्रिणींमध्ये तर 'सेल्फी स्टिक' म्हणून सेल्फी घेण्याचा मान नेहमीच माझ्या हातांना मिळतो. कागदापासून विविध कलाकृती करणे, क्विलिंग पेपर आर्ट, ग्रिटिंग कार्ड्स बनवणे, बागकाम, शिवणकाम अशा अनेक छंदांनी माझ्या आयुष्याला कधी एकटेपणाचा स्पर्श होऊ दिला नाही. कलेशी जमलेली मैत्री कधीच आपल्याला एकटेपणात सोडत नाही. 'आवड असली की सवड मिळते' असं म्हणतात. आपल्या छंदासाठी दिलेला वेळ, ही स्वतःच्या मानसिक आणि भावनिक आरोग्यासाठी Best Investment असते, असे माझे मत आहे.

छंद आपलं वय कमी करत असतो. आपल्याला तरुण ठेवत असतो. छंद जपत असताना जर आपण पूर्ण एकरूप होऊन समाधिस्थ असू, तर आपण लहान बालकासारखे अगदी निरागस आणि निर्विकार असतो. ही तल्लीनता मी रंगरेषांशी खेळताना खूपदा अनुभवली आहे. छंद हा स्व–संवाद असतो. आपल्या अंतर्मनाचा आवाज आपणच ऐकत असतो. त्यातून निर्माण होणारी कोणतीही कलाकृती असो, एखादे चित्र, गाणं, कविता, एखादी पाककृती ही स्वतःला तर आनंद देतेच, मात्र ती ज्या व्यक्तीसमोर सादर करतो, तिलाही ती मोहवून टाकते. 'देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहळे' या बा. भ. बोरकर यांच्या शब्दरचनेप्रमाणे कृतज्ञभाव उमटल्याशिवाय राहत नाही.

प्रत्येक आठवड्यात येणारा वीकेंड आपल्या आवडत्या छंदांनी जर जगला तर येणाऱ्या working days साठी लागणारी ऊर्जा आपण स्वतःमध्ये साठवून घेत असतो. छंद हा व्यक्तीच्या आयुष्यामध्ये असा 'charger' असतो, जो आपली battery full करतो, म्हणूनच प्रत्येकाने आयुष्यात असा एक तरी चार्जर, एक छंद नक्की जपावा आणि जोपासावा. जो जीवाला वेड लावेल...

**(राज्यकर अधिकारी, वस्तू व सेवाकर भवन, वांद्रे, मुंबई.)**

**रितेश भुयार**

भारतातील विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबतच देशाचे सांस्कृतिक वैभव अधोरेखित करणारे 'समृद्ध भारतीय वारसा स्थळे' हे पुरातत्त्व उत्खनन आणि वास्तुकला वारसा दर्शविणारे प्रदर्शन येथे भेट देणाऱ्या जिज्ञासूंचे खास आकर्षण ठरत आहे. या प्रदर्शनास उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे.

विद्यापीठ परिसरात प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती व पुरातत्त्व विभागात आणि केंद्र शासनाच्या भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या प्रागैतिहासिक शाखा आणि उत्खनन शाखेच्या संयुक्त विद्यमाने प्रदर्शन भरविण्यात आले आहे.



# सांस्कृतिक वैभव

वास्तुकला वारसा प्रदर्शनात नागपूरसह विदर्भातील महत्त्वाच्या वास्तूंची माहिती दर्शविण्यात आली आहे. यात काशीबाई का छत (वर्धा), नगरधन किल्ला, जागृतेश्वर मंदिर (भंडारा),विटांचे मंदिर (वर्धा) यासह नागपुरातील केपी ग्राउंड, जुने उच्च न्यायालय, जुने सचिवालय, विधान भवन, आरबीआय, आयपीओ या इमारतींचे वास्तुकला वारसा प्रदर्शनाच्या दर्शनी भागात ठळकपणे मांडण्यात आला आहे.

## गोंड वास्तुकलेचा सुबक वारसा

विदर्भात ठीक-ठिकाणी असलेले गोंड राजावटीतील वास्तुकलेचे सुंदर नमुने या प्रदर्शनात दर्शविण्यात आले आहेत. यात मुख्यत्वे गोंड राजाचे राज्य चिन्ह, गोंड राजाची समाधी (चंद्रपूर), जाटपुरा द्वार आणि विस्तीर्ण परिसरात स्थित असलेला बल्लारपूर किल्ला दर्शविण्यात आला आहे.

मराठी भाषेतील समृद्ध अशी झाडीबोली या ठिकाणी दर्शविण्यात आली आहे. भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये मुख्यत्वे झाडी बोलीचा वापर. तसेच या भाषेतील 'जागली', 'पोरका', 'वास्तुक विश्वंभर', 'लाडाची बाई' पुस्तके 'अजनाबाईंची कविता', 'आडवा कविता', 'झाडीची कानात सांग', 'घामाचा दाम', 'झाडीची माती' आदी काव्यसंग्रहांची नावे या ठिकाणी ठळकपणे प्रदर्शित करण्यात आली आहे. आड अर्थात माळी किंवा गच्ची उभार म्हणजेच जास्तीचा कौल म्हणजे कवेलू काऊन अर्थात का म्हणून असे झाले बोलतील शब्दही या ठिकाणी प्रदर्शित करण्यात आली आहेत. झाडी बोलीतील समृद्ध नाट्य परंपरा, कळसुत्री बाहुल्यांचे खेळ, कीर्तन, भारुड, वासुदेव, तमाशा, वग, दंडार, खडीगंमत, दशावतार या कलाप्रकारांचे या ठिकाणी सुबक प्रदर्शन लावण्यात आले आहे.

## पुरातत्त्व उत्खनन

पुरातत्त्व उत्खननात आढळून आलेल्या वस्तूंचे भारतीय संस्कृतीतील योगदान दर्शविणारे अडम, मनसर आणि पवनी येथील वैभव दर्शविण्यात आले होते.

## अडम (१९८८-१९९२)

नागपूर जिल्ह्यात (भंडारा नागपूर सीमेवर) असलेल्या अडम नावाचे ठिकाण डॉ. अमरेंद्र नाथ यांनी उत्खनन केले होते, तेथून प्रथमच ताम्रपाषाण-लोहयुग, निरंतर सातवाहनपूर्व आणि सातवाहन काळातील सांस्कृतिक ठेवी सापडल्या आहेत. तटबंदीच्या सातवाहन शहराच्या अवशेषांव्यतिरिक्त, येथून महत्त्वाच्या पुरातन वास्तू आणि मातीची नाणी सापडली आहेत. ज्यावर ब्राह्मी लिपीत 'असीक जनपद' कोरलेले आहेत.

## पवनी (१९६८-७० आणि १९९३-९४)

भंडारा जिल्ह्यात स्थित पवनी येथे प्रथमच जे.पी. जोशी आणि एस.बी. देव यांनी उत्खनन केले. उत्खननात मौर्य काळातील प्राचीन स्तूपावर बांधलेल्या शूंग स्तूपाचे पुरावे मिळाले. विदर्भात असलेल्या कोणत्याही उत्खननातून या जागेवरून प्रथमच प्राचीन स्तूपाचा पुरावा मिळाला आहे. सन १९९३-९४ मध्ये डॉ. अमरेंद्र नाथ यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या उत्खननात मौर्यपूर्व व मौर्य कालखंड, शूंग, सातवाहन व वाकाटक यांचे पुरावे मिळाले आहेत.

## मनसर (१९९४-९५)

नागपूर जिल्ह्यातील मनसर येथे डॉ. अमरेंद्र नाथ यांच्या मार्गदर्शनाखाली उत्खनन करण्यात आले. तेथून वाकाटक काळातील विटांनी बनवलेल्या मंदिराचे अवशेष मिळाले. संबंधित कलाकृती सापडल्या. पुरातन वास्तूंमध्ये उमा-महेश्वरा, लज्जागौरी, टेराकोटाच्या मूर्ती, लोखंडी चिलखत असलेल्या स्टुकोच्या मूर्ती, क्षत्रप आणि वाकाटक राज्यकर्त्यांची चांदी आणि तांब्याची नाणी आणि टेराकोटा साचे यांचा समावेश होतो. येथून मिळालेल्या मातीच्या भांड्यांच्या अभ्यासाच्या आधारे हे प्राचीन स्थळ इ.स.पूर्व दुसऱ्या शतकातील आहे. ६ ते ७ वी दरम्यानच्या कालावधीसाठी निर्धारित केले आहे.

**(माहिती अधिकारी, नागपूर.)**

# वाचन प्रेरणा दिन

**किरण शार्दुल**

वाचन प्रेरणा दिवस म्हटले तर काळाची गरज. वाचन करायला मुळातच लहानपणापासूनच सुरुवात होते. आपण मुलांना देतो काय? देत असतो इलेक्ट्रॉनिक साधने. कधी महागडी तर कधी स्वस्त आजच्या भाषेत चायनीज. मुलेही त्यातच गुरफटत कशी मोठी होऊन जातात. ना पालकांना समजते ना त्या लहान मुलांना.

वाटते आपल्या लहानपणी ही साधने नव्हती ते चांगलेच झाले. किमान त्यामुळे आपण चंपक, चांदोबा, इसापनीती, रामायण/महाभारत यातील निवडक कथा, किशोर अंक, बालकुंज, सकाळ पेपरमध्ये येणारी बालमैफल, कार्टूनमधून साकारलेली नल-दमयंती, राजा हरिश्चंद्र यांसारखे वाचन आपण सहज करू शकलो. शालेय जीवनातच, रामरक्षा, भीमरूपी, मनाचे श्लोक, गीता अध्याय पाठांतर, बाराखडी, पाढे, कविता पाठांतर आपण करू शकलो. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महाराणा प्रताप, महात्मा गांधी, शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपण वाचू शकलो. त्या काळात आपल्याला लाभलेले सर्व सन्माननीय व आदरणीय साहित्यिक, कवी हेही आपले भाग्यच. त्या भाग्याच्या जोरावरच आजही आपली वाचन प्रेरणा जागृत आहे. भले आता मोठ्या कथा कादंबऱ्या वाचणार नाहीत; पण रोजचा पेपर तरी चाळत आहे, ही काय कमी लेखायची गोष्ट आहे. नक्कीच नाही. किमान रोजचा मराठी पेपर किंवा आप आपल्या मातृभाषेतील पेपर वाचला तरी खूप झाले.




वाचन ही काय क्रिया आहे? डोळ्यांनी वाचतो. त्याचे ग्रहण मेंदूत होते, त्याचे स्मरण मेंदूत होते. काय वाचावे, काय टाळावे, कोणते वाचन केल्यास मेंदू थकतो. कोणते वाचन केल्यास मेंदू प्रफुल्लित होतो, हे आपणास चांगले ठाऊक असते. ज्याने थकवा येत असेल त्याकडे जाऊच नका. तुम्हाला जे आवडेल तेच वाचा कारण वाचत राहिल्यास वाचनाची कक्षा रुंदावेल. वाचण्याची कक्षा रुंदावल्यास व्यक्त होण्याची कक्षा रुंदावेल. जीवन कशासाठी? व्यक्त होण्यासाठी? तुम्ही व्यक्तच झाला नाही, तर तुम्ही आला काय आणि गेला काय? जगाचा रहाटगाडा तर चालूच राहणार आहे. कविवर्य भा. रा. तांबेंच्या शब्दात सांगायचे झाल्यास, राम-कृष्ण ही आले-गेले, त्या विना जग का ओसची पडले? त्यामुळे व्यक्त व्हा. कोणत्याही माध्यमातून. तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा खरा आरसा तुम्ही व्यक्त होणे हा आहे. तुम्ही काय वाचता त्यानुसार तुमचे व्यक्तिमत्त्व जडण-घडण घेत असते.

आज तरुण पिढीला दोष देऊन उपयोग नाही. लहान मुलांनाही दोष देऊन उपयोग नाही. जे खपते तेच पिकवले जाते. चोहो बाजूंनी जे नको आहे खपवले जाते. बाजारच त्याचा बसलाय. स्वस्तात आणि मस्त! चकचकीत आणि गळगुळीत! घे आणि फेक! त्याला आवर कोण घालणार? त्याचा आवर घालवायचा असेल, तर दुसरे कोणी पुढे येईल याची वाट न पाहता आपणच पुढाकार घेतला पाहिजे. आपल्या घरी काय न्यायचे हे आपणच ठरवले पाहिजे.

१) घरोघरी वर्तमानपत्र सुरू केलेच पाहिजे. अहो संपूर्ण जगात भारताइतके स्वस्तात वर्तमानपत्र कुठेच नाही. वर्तमानपत्रात जेवढा कागद वापरला जातो, तेवढा कोरा कागद घ्यायला गेला तरी सहजच २५/३० रुपये पडतील. आपल्याला तर रंगीत छपाईसह जास्तीत जास्त ५ रुपयाला वर्तमानपत्र मिळते.

२) महिन्यातून किमान १ तरी मासिक खरेदी करा. फार नको १०० रुपयाचे आत असले तरी चालेल. आपण कित्येक रुपयांची एसआयपी करतो, शेअर मार्केट हाताळतो, हॉटेलिंग करतो, तेथे १०० रुपयाची काय गोष्ट.

३) सर्व कर्मचारी संघटना यांनी कार्यालयाच्या आवारातच लंच मधे पेपर/साहित्य वाचता येईल, यासाठी सुसज्ज ग्रंथालय स्थापन करण्यासाठी पुढाकार घ्यावा.

४) आपल्या अनेक ग्रुपमध्ये कोणीतरी एखादा तरी पुस्तक वाचक असतोच. त्याने जे काही नवीन पुस्तक वाचले असेल, त्याचा त्याला जमेल, तसा पुस्तक सारांश आपल्या ओळखीच्या ग्रूपवर द्यावा.

५) किमान वर्षातून २ वेळेस तरी पुस्तकाचे प्रदर्शनास सहपरिवार भेट द्या. लहान मुलांनाही अवश्य न्या.

६) वर्षातून किमान एक साहित्य संमेलनास भेट द्या. एक दर्जेदार नाटक पहा.

७) वाढदिवसाला ५००/६०० चा केकपेक्षा त्याहून कमी किमतीचे पुस्तक दिल्यास खाणाऱ्याचे वजनात कमी तर ज्ञानात अधिक वाढ होईल.

८) प्रत्येक विभागाची एक लायब्ररी असावी. योगायोगाने मी कालच नाशिक येथे जलसंपदा विभागाचे सिंचन भवन येथे भव्य वारसा असलेले वाचनालय प्रत्यक्ष पाहिले. मंत्रालयात वित्त विभाग, विधि व न्याय विभाग यांची मी अनुभवलेली लायब्ररी इतिहासजमा झाली आहे.

९) पुस्तकांसाठी शासन अनुदान देतेच; पण त्याचा प्रचार प्रसिद्धी पुरेशी परिणामकारक होत नाही.

१०) लेखकांची कमतरता नाहीच, भले ते पूर्वी इतके दर्जेदार नसतील; पण जे काही आपणास योग्य वाटतील, त्याबद्दल त्यांचे लेखाबद्दल आपले मत सर्व ग्रुपमध्ये आवर्जून पाठवा.

वरील उपाय अत्यंत साधे, सोपे व सहज आचरणात आणता येतील. सहजतेत सुंदरता आहे. सुंदरता गौरव करण्यासाठी असते. वाचन प्रेरणा दिनाची फलश्रुती होण्यासाठी आपण वरीलपैकी एक तरी उपाय नक्कीच आचरणात आणण्यासाठी वचनबद्ध होऊ या! वाचन प्रेरणा दिनाच्या सर्वांना खूप खूप हार्दिक शुभेच्छा.

**(कार्यासन अधिकारी, सा. प्र. वि., मंत्रालय, मुंबई.)**

# मराठी वाचन संस्कृतीचा उत्सव

स्वायत्त संस्थांमध्ये वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी आणि मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, विकास, जतन व संवर्धन साधण्यासाठी या दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण लक्षात घेऊन या वर्षी वाचन प्रेरणा दिनाची मध्यवर्ती संकल्पना घेऊ या एकच वसा, मराठीला करू ज्ञानभाषा अशी निश्चित करण्यात आली आहे. या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन विभाग, अधिनस्थ संस्था, मंडळे, सार्वजनिक उपक्रम तसेच सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांकडून वेगवेगळे उपक्रम आयोजित केले जात आहेत.

- समाजमाध्यमे, ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष माध्यमांतून वाचन संस्कृती वाढविणारे कार्यक्रम व्याख्याने, चर्चासत्रे, अभिवाचन, सामूहिक वाचन, ग्रंथप्रदर्शन, परिसंवाद इत्यादी आयोजित करणे.
- सर्वांनी आपल्या परिचितांना किमान एक पुस्तक भेट देऊन वाचनाची प्रेरणा देणे.
- विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, पर्यावरण, आरोग्य, संगणक, अवकाश विज्ञान अशा विविध विषयांवरील वाचनास प्रोत्साहन देणे.
- तरुण पिढीला रोजगाराभिमुख उपक्रमांत सहभागी करून घेण्यासाठी अनुवाद लेखन, पुस्तक निर्मिती, ई-बुक, स्व-प्रकाशन, युनिकोडचा वापर, संहिता लेखन, विकिपीडिया लेखन यासंबंधी कार्यशाळा आयोजित करणे.
- सोशल मीडियावर मराठी वाचन कट्टा निर्मिती करून वाचनविषयक संदेश प्रसारित करणे.
- मराठी आभासी साहित्य संमेलन, व्याख्याने आणि तज्ज्ञांच्या कार्यशाळांचे आयोजन करणे.
- आकाशवाणी, दूरदर्शन, एफएम रेडिओ, सामाजिक माध्यमे इत्यादींमधून वाचन संस्कृतीवरील दृक्‌श्राव्य संदेश प्रसारित करणे.
- मातृभाषेचे वैयक्तिक, सामाजिक व शैक्षणिक महत्त्व यावर विचारमंथनात्मक कार्यक्रम आयोजित करणे.







- सकस मराठी साहित्य व आधुनिक विज्ञानविषयक पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्यभर उपक्रम राबविणे.
- मराठी भाषेचा वापर शासन, न्यायव्यवस्था, माध्यमे आणि इतर संस्थांमध्ये वाढविण्यासाठी जनजागृती करणे.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, भाषा संचालनालय आणि महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी वाचन संस्कृतीसंबंधी वर्षभराचे वेळापत्रक तयार करून तज्ज्ञांच्या कार्यशाळा आणि कार्यक्रमांचे आयोजन करणे; तसेच मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी अभिनव कल्पना राबवणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यात यावा.

महाराष्ट्र राजभाषा अधिनियमानुसार सर्व शासकीय कामकाज १०० टक्के मराठीतूनच करणे अनिवार्य असून, यासंबंधी आदेश सर्व संबंधितांनी पालन करावेत.

वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून वाचनाची आवड निर्माण करणे, मराठी भाषेचा गौरव वाढविणे आणि ज्ञानसंस्कृती समृद्ध करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.




# पुस्तकांचा बगिचा

**विकास नवाळे**

वनस्पतीचे गार्डन आपण पाहतो, फुलांचा बगिचा पाहिला असेल. मात्र एरंडोल नगरपरिषदेने तब्बल ३३ गुंठ्यांत पुस्तकाचा बगिचा साकारला आहे. वाचन संस्कृती वाढविण्याच्या दृष्टीने राज्यासाठी हा प्रयोग आदर्श ठरू शकणार आहे. राज्यातला अशा प्रकारचा पुस्तकांचा एकमेव बगिचा आहे हे विशेष!

आपण विविध प्रकारचे गार्डन पाहता, मात्र एरंडोल नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विकास नवाळे यांच्या संकल्पनेतून वाचन संस्कृती टिकून राहावी, त्यात वाढ व्हावी, या उद्देशाने शहरात पुस्तकांच्या बगिचाची निर्मिती केली आहे. हा बगिचा एरंडोल शहरात चर्चेचा विषय ठरला आहे.

## गुंठ्यांत साकारणार पुस्तक बगिचा

शहरातील आनंदनगर भागात ३३ गुंठे म्हणजेच बीघा भर जागेत पुस्तकांचा बगीचा साकारला जातो आहे. या नावीन्यपूर्ण गार्डनमध्ये विविध प्रकारचे पुस्तक उपलब्ध असणार आहेत. ठिकठिकाणी पुस्तकांचे बॉक्स आहेत. पुस्तक वाचनासाठी आठ वाचन कट्टे बांधले आहेत.

बगिच्यात पूर्णतः निसर्गरम्य वातावरणाची निर्मिती करण्यात आली आहे. गार्डनमध्ये प्रत्येक मोठ्या झाडाखाली पुस्तकाचा बॉक्स आहेत. तेथून पुस्तक काढून तुम्हाला ते झाडाखाली बांधण्यात आलेल्या ओट्यावर बसून पुस्तक वाचता येणार आहे.

## बगिच्यात सर्वकाही

या पुस्तकांच्या बगिच्यात ग्रीन लॉन व विविध सुगंधीत फुलझाड आहेत. त्यातून वातावरण सुगंधीमय होणार आहे. भिंतीवर विचारवंतांचे पुस्तकात व्यक्त केलेले विचार चित्रित करण्यात आले आहेत, तर ठिकठिकाणी कवितांचे पोर्ट्रेट करण्यात आले आहे. ग्रीन जीमचीही व्यवस्था करण्यात आली आहे. पुस्तक व वृक्ष यावर आधारित भित्तिचित्र रंगविण्यात आले आहे. कवयित्री बहिणाबाईंच्या कवितेसह पुस्तकांचे भव्य शिल्प उभारण्यात आले आहे. या बरोबरच पुस्तक प्रेमी वाचक प्रतीत करणारे पुतळे करण्यात आले आहे.

## राज्यातील पहिलाच प्रयोग

एरंडोल नगर परिषदेने साकारलेला पुस्तकांचा बगिचा हा राज्यातला पहिलाच प्रयोग आहे. हा नावीन्यपूर्ण बगिचा निश्चितच वाचन संस्कृती व संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी उपयोगी ठरणार आहे. या बागेची रचना ही सगळ्याच घटकांचा विचार करून करण्यात आली आहे. हा बगिचा राज्यासाठी आदर्श ठरणार आहे हे निश्चित! एरंडोलवासियांसाठी हे गार्डन पर्वणीच ठरणार आहे. या बगिचाचीच सर्वत्र चर्चा सध्या कानी पडत आहे. शहरातील नागरीकांमध्ये वाचन संस्कृती वृद्धिंगत व्हावी, या उद्देशाने या



पुस्तक बागेची निर्मिती करण्यात येत आहे. लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वजण पुस्तक वाचन करू शकतील, अशी पुस्तक व व्यवस्था करण्यात आली आहे. लवकरच हा बगिचा नागरिकांसाठी हे गार्डन खुले होणार आहे.

**(मुख्याधिकारी, एरंडोल नगरपरिषद.)**

**शब्दांकन : सुरेश पाटील,** माहिती अधिकारी, जळगाव.

# कृष्णविवर

**अजय भोसले**

कृष्णविवराबाबत माझी कल्पना अशी होती की, विवर म्हणजे अवकाशाला पडलेला एखादा प्रचंड खड्डा असावा; परंतु अवकाश तर अनंत आहे. अवकाश अनंत आहे की; सीमित आहे; याबद्दल वेगवेगळ्या थेअरी आहेत. आकर्षणाचे बल आहे, याचा अर्थ जग सीमित कक्षेत फिरत आहे, तर दुसरीकडे अवकाश प्रसरण पावत आहे, अशीही थेअरी आहे. जॉन मिशेल या शास्त्रज्ञाने कृष्णविवराची संकल्पना प्रथम मांडली. अशा ताऱ्यांचा प्रकाश आपल्यापर्यंत पोहोचणार नाही, कारण कृष्णविवरातून प्रकाशही बाहेर पडू शकत नाही. परिणामत: ते आपल्याला दिसू शकणार नाही. त्याच्या गुरुत्वाकर्षण बलाने होणाऱ्या परिणामाच्या आधारे तर्क करता येईल.

कृष्णविवराची संकल्पना समजून घेण्यासाठी खालील व्याख्या लक्षात घ्याव्या लागतील.

## चंद्रशेखर मर्यादा

The Chandrashekhar limit is the maximum mass of a stable white dwarf star . It is mass above which electron degeneracy pressure in the star's core is insufficient to balance star's own gravitational attraction .

## गुरुत्वाकर्षण नियम

Any two bodies in the universe attract each other with a force that is directly proportional to the product of thier masses and invrsly proportional to the square of distance between them.

## श्वेतबटू

A white dwarf is a stellar remnant composed mostly of electron-degenerate matter.

## वस्तुमान

The mass of an object is a measure of number of atoms in it . Unit of measurement is Kilogram. The property of matter that measures its resistance to acceleration.

कृष्णविवर हे वस्तुमानाशी संबंधित आहे. शाळेत शिकलेला गुरुत्वाकर्षणाचा नियम आठवा. दोन वस्तूंमधील आकर्षण वस्तुमानाच्या गुणाकाराच्या प्रमाणात व त्यांच्यामधील अंतरांच्या व्यस्त प्रमाणात बदलते. कृष्णविवर निर्माण होण्यासाठी ताऱ्यांचे आकुंचन होणे जरुरी आहे. ताऱ्यांना दोन बलांचा समतोल राखावा लागतो. स्वतःच्या वस्तुमानामुळे निर्माण होणारे बाह्य गुरुत्वाकर्षण बल. अंतर्गत ज्वलनामुळे निर्माण होणारे अंतर्गत बल. एक बल बाहेरून आत, तर दुसरे बल आतून बाहेर कार्य करत असते.

किती आकुंचन झाल्यावर त्याचे कृष्णविवरात रूपांतर होईल. एखादा तारा आकुंचन पावल्यानंतर त्याचे वस्तुमान जर सूर्याच्या वस्तुमानाच्या १. ४ इतके असेल, तर त्याचे कृष्णविवरात रूपांतर होते. यालाच चंद्रशेखर लिमिट म्हणतात.

कृष्णविवराच्या गुरुत्वाकर्षणाची जी सीमारेषा असते तिला Event Horizon म्हणतात. या गुरुत्वाकर्षण बलातून सुटण्यासाठी जो वेग आवश्यक असतो तो वेग म्हणजे escape velocity.

पृथ्वीवरून वर फेकलेली वस्तू खाली पडते, याचे कारण म्हणजे गुरुत्वाकर्षण बल. त्या वस्तूला पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणातून मुक्त होण्यासाठी त्याची escape velocity 11. 2 km /sec पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. पृथ्वीची escape velocity 11. 2 km /sec इतकी आहे, परंतु प्रकाशकिरणांचा वेग प्रतिसेकंद ३ लाख किमी



असताना ते कृष्णाविवारातून सुटू शकत नाहीत. म्हणजे विचार करा, जर आपल्याला कृष्णविवरात घुसून बाहेर पडायचे असेल, तर आपल्या यानाचा वेग प्रकाशाच्या वेगापेक्षा कितीतरी अधिक हवा. कृष्णविवराची escape velocity प्रकाशाच्या वेगापेक्षा जास्त असते. (एक प्रकाशवर्ष म्हणजे, निर्वात पोकळीत प्रकाश एका वर्षात जेवढे अंतर कापेल तेवढे अंतर.)

कृष्णविवराच्या आत मनुष्य प्रवेश करू शकतो काय? त्याचे आजचे उत्तर आहे नाही. आयइनस्टाईन यांच्या थेरीनुसार प्रकाशाच्या वेगापेक्षा जास्त वेगाने काही जाऊ शकत नाही. आपण प्रकाशाच्या वेगाने जरी जाण्याचा प्रयत्न केला, तर त्यात वस्तुमान प्रचंड वाढेल. कृष्णविवराच्या बलाचा वेग प्रकाशापेक्षा जास्त असतो. मनुष्याने जर आत प्रवेश केला, तर या बलाने त्याच्या ठिकऱ्या उडतील. हे बल प्रकाशाच्या वेगापेक्षा जास्त असल्यामुळे प्रकाशही त्यातून निसटू शकत नाही. त्यामुळे कृष्णविवराचे भौतिक चित्र स्पष्ट होत नसले, तरीही आजूबाजूच्या मॅटरवर होणाऱ्या परिणामामुळे त्याचे अस्तित्व जाणवते.

अलीकडे गुरुत्वतरंगाच्या अस्तित्वाचे पुरावे सापडले आहे. गुरुत्वलहरीच्या संशोधनाने अवकाश, कृष्णविवर यांच्या संशोधनाला नवीन दिशा सापडली आहे.

**(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.)**

# सुशासनाच्या नव्या पर्वाकडे वाटचाल

रणजितसिंह राजपूत

*हाई 'एआय' बड्ड काम करय माय!*

कालानुरूप समाज, राज्य आणि शासन व्यवस्थेतील आवश्यकतेनुसार तंत्रज्ञानाची भूमिका केवळ पूरक राहिली नाही, तर ती परिवर्तनाची सूत्रधार बनली आहे. एकेकाळी शासन म्हणजे फाईलींच्या ढिगाऱ्यात हरवलेली प्रक्रिया, कार्यालयांतील रांगा, संथ हालचाल आणि गुंतागुंतीचे नियम असा सर्वसामान्यांचा अनुभव होता; परंतु आता हा अनुभव झपाट्याने बदलतो आहे. तंत्रज्ञानातील विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (Artificial Intelligence - AI) वापरामुळे शासनाच्या कार्यपद्धतीला एक नवचैतन्य प्राप्त झाले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणकीय प्रणालीची अशी क्षमता जी मानवी बुद्धिप्रमाणे विचार करू शकते, शिकू शकते, अनुभवाच्या आधारे निर्णय घेऊ शकते आणि त्यावरून भविष्यातील उपाययोजना आखू शकते. ही प्रणाली शासन-प्रशासनासाठी एक अशी क्रांतिकारी संधी ठरते आहे, जी वेग, अचूकता आणि पारदर्शकतेच्या त्रिसूत्रावर आधारित प्रशासन शक्य करते.



## प्रशासनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता का गरजेची आहे?

भारतातील लोकसंख्येची वाढ, नागरीकरणाचा वेग, तांत्रिक साक्षरतेत आलेली प्रगती आणि जनतेच्या वाढत्या अपेक्षा या सर्वांमुळे शासनाच्या पारंपरिक कार्यपद्धतीवर ताण निर्माण झाला. शासनाकडे असंख्य अर्ज, समस्या, योजना, लाभार्थ्यांची माहिती, आर्थिक व्यवहार, सामाजिक अभिलेख इत्यादींचे दैनंदिन व्यवस्थापन करण्याची जबाबदारी असते. हे सर्व पारंपरिक पद्धतीने करणे केवळ वेळखाऊ नव्हे, तर त्रुटींचे प्रमाणही वाढवणारे ठरते. त्यामुळेच डेटा आधारित, शहाणपणाने शिकणारी आणि गतीने काम करणारी प्रणाली म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशासनात अनिवार्य झाली आहे.

## भारत व महाराष्ट्रातील महत्त्वाचे उपक्रम

भारत सरकारने 'इंडिया एआय' या धोरणात्मक आराखड्याच्या माध्यमातून आरोग्य, शिक्षण, शेती, महिला सुरक्षा, न्याय व्यवस्था आणि पर्यावरण अशा अनेक क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुरू केला आहे. पीएम-किसान PM-Kisan, फास्टॅग Fastag, आरोग्य सेतू Aarogya Setu, ई-कोर्ट्स, SUPACE, आणि पीएम गती-शक्ती अशा राष्ट्रीय योजना आणि प्रणाली एआयच्या साहाय्याने चालवल्या जात आहेत.

एआय फॉर ऑल (AI for All) उपक्रमातून भारतात एआय साक्षरतेवर विशेष भर दिला जात आहे. एआय फॉर युथ योजनेद्वारे विद्यार्थ्यांना एआयविषयी शिकवले जात आहे. न्याय प्रणालीमध्ये 'सुपेस' पोर्टलमुळे सर्वोच्च न्यायालयीन प्रकरणांमधील माहितीचे संक्षेप, मुद्दे, पुरावे यांचे वेगवान विश्लेषण सहज शक्य होत आहे.

महाराष्ट्रात महसूल खात्याच्या 'माझी जमीन माझा अधिकार' उपक्रमांतर्गत ड्रोन व एआयच्या साहाय्याने जमिनीच्या मोजणीपासून ते डिजिटल प्रमाणपत्रांपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह बनली आहे. गडचिरोली, नंदुरबार, गोंदिया यांसारख्या दुर्गम भागांतही हे काम प्रभावीपणे सुरू आहे.

## मुंबई पोलीस विभागात क्राईम-मॅपिंग

Crime Mapping व फेशियल रेकगनाईजेशन Facial Recognition प्रणाली वापरून गुन्ह्यांचा संभाव्य ठिकाणी पूर्वानुमान लावून बंदोबस्त वाढवला जात आहे. पुणे स्मार्ट सिटी अंतर्गत वाहतूक नियंत्रण, कचरा संकलन व पाणीपुरवठा व्यवस्थापनात एआयचा वापर प्रभावीपणे केला जात आहे. शिक्षण विभागात दिक्षा, मित्रा (DIKSHA, MITRA) प्लॅटफॉर्मवर विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे विश्लेषण, शिक्षक प्रशिक्षण व शिक्षण सुधारणा केली जात आहे. आरोग्य सेवा डिजिटल हेल्थ कार्ड्स, एआय डॉक्टर असिस्टंट (AI Doctor Assistant) प्रणाली आणि आरोग्य सेतू (Aarogya Setu) ॲपच्या माध्यमातून अधिक सक्षम बनली आहे.

## कृषी, आरोग्य, शिक्षण, न्याय आणि महसूल यंत्रणांतील प्रभाव

'एआय'च्या साहाय्याने कृषी क्षेत्रात हवामान माहिती संकलन व विश्लेषण प्रणाली वाईंड्स (WINDS) तयार करण्यात आली असून, ती शेतकऱ्यांना पेरणीचा योग्य काळ, हवामानाचा अंदाज, कीटक प्रकोप याबाबत अचूक सल्ला देते.

आरोग्य क्षेत्रात 'एआय'चा वापर रुग्णालयांतील निदान, वैद्यकीय इमेजिंग, औषध योजना आणि संभाव्य साथींच्या प्रसाराचा अंदाज

लावण्यासाठी केला जात आहे. जिल्हा रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमधून एआय आधारित सल्ला दिला जात आहे.



शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेनुसार अभ्यासक्रम आखणे, त्यांच्या अडचणींचा मागोवा घेणे आणि पालक–शिक्षक संवादाला डेटा–आधारित दिशा देणे या बाबतीत एआय कार्यरत आहे.

न्याय विभागात केसेस ट्रॅकिंग, तारखांचे व्यवस्थापन आणि निर्णय साहाय्य अशा बाबतींत एआय प्रभावी ठरतो आहे. ई–कोर्ट (e-Courts) प्रणाली न्यायाधीश व वकिलांना कामकाजात वेग आणि अचूकता देते.

महसूल यंत्रणेत भू–नकाशे, सीमेचे निर्धारण, मालकीची पडताळणी हे काम ड्रोन व एआयच्या मदतीने जलद आणि वादरहित पद्धतीने पूर्ण होत आहे.

## चित्रकला, प्रेझेंटेशन, बांधकाम, रस्तेविकास आणि दुर्गम भागांतील क्रांती

एआयचा वापर सृजनशील क्षेत्रांमध्येही होत आहे. माहिती व जनसंपर्क विभागातील पोस्टर, जनजागृती बॅनर, व्हिडिओ ग्राफिक्स, लोकशाही प्रचार मोहीम, निवडणुका व कोविडसारख्या आपत्कालीन कालखंडांमध्ये एआय आधारित सृजनशीलतेचा उपयोग मोठ्या प्रमाणावर झाला आहे.

बांधकाम क्षेत्रात भूगर्भीय तपशील, हवामान आकडे, पर्यावरणीय विश्लेषण आणि वाहतुकीची डेटा आधारित माहिती वापरून एआय सुरक्षित इमारत डिझाईन, थ्रीडी मॉडेलिंग व रचना सल्ला देते. सेन्सर–आधारित गुणवत्ता तपासणीमुळे काम वेळेत पूर्ण होते.

प्रेझेंटेशन आणि सादरीकरण यामध्ये अधिकारी सध्या एआय आधारित डॅशबोर्ड वापरतात. या डॅशबोर्डमधून विभागीय खर्च, लाभार्थी संख्येचे विश्लेषण, कार्यक्षमतेचे निदर्शन आणि धोरणात्मक कमतरतांची नोंद घेतली जाते.

रस्तेविकासात उपग्रह प्रतिमा, ड्रोन मोजणी, हवामान डेटा, पावसाळी धोके आणि वाहतुकीचा दाब यांचा एआय एकत्रित अभ्यास करून रस्त्यांच्या डिझाईन, मजबुतीकरण आणि देखभाल आराखडे तयार करतो.

दुर्गम भागांमध्ये एआय आधारित ऑफलाइन साधने वापरून आरोग्य तपासणी, शैक्षणिक व्हिडिओ, भाषांतर सेवा आणि सौर ऊर्जेच्या व्यवस्थापनासारख्या मूलभूत सुविधा पोहोचल्या आहेत. वनरक्षण, जलस्रोत व्यवस्थापन, आपत्तीची सूचना/ संकेत/अलकाचे या ठिकाणीही एआयचे योगदान मोठे आहे.

## फायदे आणि जबाबदाऱ्या

कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशासनाला गतिमान करते. ही प्रणाली मोठ्या प्रमाणात माहितीचा वेगाने अभ्यास करते, त्रुटी ओळखते, धोरण आखते आणि पुनरावृत्ती न करता निर्णय घेते. यामुळे शासन अधिक प्रभावी, लोकाभिमुख आणि पारदर्शक बनते.

तथापि ही यंत्रणा वापरताना डेटा गोपनीयता, नैतिकता आणि मानवी मूल्यांचा विचार गरजेचा असतो. नागरिकांच्या माहितीचा गैरवापर, पूर्वग्रह असलेली प्रणाली, सामाजिक भानाचा अभाव यामुळे एआयचा निर्णयही चुकीचा ठरू शकतो. त्यामुळे एआय ही एक साहाय्यक प्रणाली असली, तरी अंतिम निर्णय मानवी विवेकावर आधारित असायला हवा.

कृत्रिम बुद्धिमत्ता ही आज प्रशासनाचा अविभाज्य भाग बनली आहे. भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाने तिचा उपयोग प्रभावीपणे करून दाखवला आहे. महसूल, कृषी, आरोग्य, पोलीस, शिक्षण, बांधकाम, माहिती विभाग आणि दुर्गम भागांमध्ये ती क्रांती घडवत आहे.

एआय प्रशासनाला केवळ गती देते असे नाही. ती प्रशासनाला भविष्याकडे पाहण्याची दृष्टी देते. सुशासनाची व्याख्या बदलून आता प्रशासन डेटा–सक्षम, अचूक, गतिमान आणि जनतेच्या गरजेनुसार झपाट्याने बदलणारं यंत्र बनत आहे. या दृष्टिकोनातून पाहिलं, तर कृत्रिम बुद्धिमत्ता ही तांत्रिक क्रांती नसून जनहिताची नैतिक जबाबदारी बनते. कारण शेवटी शासनाची खरी ताकद ही त्याच्या लोकांमध्ये असते आणि त्या लोकांपर्यंत न्याय, सेवा आणि विश्वास अचूकपणे पोहोचवण्याचे सामर्थ्य आता एआयकडे आहे. थोडक्यात आमच्या बोली भाषेत सांगायचं झालं तर 'हाई एआय बड्ड काम करत माय!'

## शासनातील एआय आधारित महत्त्वाचे प्रयोग

- प्रधानमंत्री किसान सन्मान योजना (PM-Kisan) एआयद्वारे लाभार्थी तपासणी व स्क्रूटनी.
- फास्टॅग (FASTag) टोल वसुलीसाठी वाहन ओळख व ट्रॅफिक विश्लेषण.
- आरोग्य सेतू (Aarogya Setu) कोविड संदर्भात संपर्क ट्रेसिंग व धोका विश्लेषण.
- ई–कोर्ट्स (e-Courts) न्यायालयीन वेळबचतीसाठी केस मॅनेजमेंट.
- सुपेस (SUPACE) सर्वोच्च न्यायालयासाठी एआय साहाय्यक पोर्टल.
- पुणे स्मार्ट सिटी वाहतूक, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा क्षेत्रांमध्ये एआय वापर.
- माझी जमीन माझा अधिकार (महाराष्ट्र) डिजिटल नकाशे, सीमांकन, मालकीचे प्रमाणपत्र.
- मुंबई पोलीस फेशिअल रेकगनायझेशन व क्राईम मॅपिंग प्रणाली.
- दुर्गम आदिवासी भागांमध्ये सौर ऊर्जेचे नियमन, शिक्षण, आरोग्य सेवा एआयच्या साहाय्याने.

**(जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार.)**

# द फोक आख्यान

**ज्ञानेश पाटमासे**

महाराष्ट्राची लोककला काळाच्या ओघात लोप पावत चालली आहे. ही लोककला म्हणजे ती नेमकी कशी आहे, किती आहे आणि या लोककलेत काय-काय आहे. लोककला, लोकवाद्यं, लोकसाहित्य यांचा एकूणच आवाका काय आहे, तो कसा व किती आहे. या साऱ्या प्रश्नांची उत्तरं The Folk आख्यान या कार्यक्रमात मराठी रसिकांना, प्रेक्षकांना मिळतात. मराठी संस्कृतीचा अविभाज्य भाग असलेली या महाराष्ट्राची लोककला काळाच्या प्रत्येक टप्प्यावर समाजाच्या जडण-घडणीला पूरक ठरली. आजच्या तंत्रयुगातील समाजमाध्यमांचे दानवी आक्रमण होण्यापूर्वी याच लोककलेने, लोकसाहित्याने आणि लोकवाद्यांनी समाजमनावर साहित्यिक, सांस्कृतिक, सांगीतिक संस्कार केले आहेत. मानवी मन, लोकभावना यांची सहजसुंदर अभिव्यक्ती म्हणजे ही लोककला आहे. यातील लोकवाद्यांचा नाद हा मातीशी एकरूप झाला असल्याने तो आपल्याशी चटकून 'कनेक्ट होतो, आणि जणूही वाद्यच प्रेक्षकांशी थेट बोलू लागतात. पाठीवर बिऱ्हाड अन् गावोगावी वरात असा हा लोककलेचा 'भटका विमुक्त बाज' महाराष्ट्राची समाजवीण किती देखणी आहे, याची सुंदर प्रचिती हे आख्याम आपल्या प्रेक्षकांना देते.



नाव्यातल्या, मातीतल्या पारंपरिक संस्काराची नाळ जपणारी लोककला आज मरणासन्न अवस्थेला आहे. लोकवाद्यांचे वादक संपले तशी ती लोकवाद्यंही लोप पावताहेत. लोककला कलावंतांच्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन, अनास्था इ. बाबींमुळे लोककला काळाच्या पडद्याआड होताना दिसते आहे. परिणामी मराठी संस्कृतीचे मोठे दालन लुप्त होण्याच्या मार्गावर आहे.

लोककलेचे, लोककलावंतांचे, लोकवाद्याचे जतन व संवर्धन होऊन हे सांस्कृतिक वैभव जपले गेले पाहिजे. पुढच्या पिढीतही गेले पाहिजे. यासाठी लोकांनीच लोकसहभागातून, शासन स्तरावरून आवश्यक आणि नेमक्या स्वरूपाच्या उपाययोजनात्मक सर्वतोपरी प्रयत्न करणं ही काळाची गरज आहे.

The Folk आख्यानाची बांधणी, मांडणी, सांगीतिक आणि रंगमंचीय सादरीकरण या बाबी आख्यानास नितांतसुंदर बनवतात. आख्यानाचे नेपथ्य, प्रकाशयोजना, तंत्रज्ञ, सर्व वादक व 'गायक आणि सूत्रधार यांची मेहनत व त्यांचा अफलातून, अप्रतिम, अविस्मरणीय कलाविष्कार अनुभूतीच्या पातळीवर उत्कट असल्याने तो शब्दांच्याही पलीकडचा आहे आणि म्हणूनच आख्यानाच्या तंत्रज्ञ, सर्व कलावंतांना मराठी रसिकांच्या वतीने अगदी मनापासून 'मानाचा सलाम, अथपासून इतिपर्यंत The Folk आख्यान ही एक अक्षय ऊर्जा आहे. Energy neither be created nor be destroyed, it can be converted From a form to another form. किंबहुना जणू त्यामुळेच तिचा वावर कलावंतांकडून प्रेक्षकांकडे व प्रेक्षकांकडून कळलावंतांकडे होत राहतो. आख्यानातील लोकवाद्यांचा दणदणाट हा आपल्या कानांना कुठंही कर्णकर्कश वाटत नाही, उलटपक्षी डीजेपेक्षा १०० पटीने अधिक प्रभावी वाटतो. आख्यानाच्या सुरुवातीपासून शेवटच्या क्षणापर्यंत प्रेक्षक आख्यानाशी सतत कनेक्ट राहतो. प्रेक्षकांच्या डोळ्यांच्या कडा ओलावण्यापासून अगदी बेभानपणे नाचायला लावण्याइतपत ताकद या The Folk आख्यानात आहे. प्रेक्षकांचे रंजन करीत अंजन घालण्याचे लेखक-सूत्रधाराचे कसब अत्यंत कौतुकास्पद आहे.

मराठी भाषिक, मराठी माणूस किंबहुना महाराष्ट्रातील प्रत्येकाने हे आख्यान एकदा तरी अनुभवावेच असे आहे.

एक कार्यक्रम म्हणून नव्हे, तर महाराष्ट्राच्या लोककलेचे नितांत सुंदर रूप व तिचा असलेला प्रचंड आवाका सांप्रतच्या काळातील पिढीला कळावा, अनुभवता यावा, यासाठी ही विनवणी आहे.

■■

# अमरावतीची अभिजात भाषा परिषद एक समृद्ध करणारा अनुभव

**रेश्मा घाणेकर**

या वर्षी महाराष्ट्रातील सर्व विभागांनी १०० दिवसांचा कृती कार्यक्रम राबवला, त्याला मराठी भाषा विभागही अपवाद नव्हता. त्यांनी भाषाप्रेमींना विविध विषयांवर कल्पना मांडण्याची संधी दिली. वस्तू व सेवा कर विभागातील काम सांभाळत मीही या उपक्रमात सहभागी झाले आणि माझे विचार दृक्‌संवाद व ई–मेलद्वारे मांडले. नंतरच्या दिनक्रमात पुन्हा कामात गढून गेले असताना मराठी भाषा विभागाने भारतीय अभिजात भाषांची परिषद आयोजित केली. भाषा प्रेमी, अनुवादक व डीपीआर टीम सदस्य म्हणून निरीक्षकाच्या भूमिकेत या परिषदेत सहभागी होण्याची संधी मिळाली. ती गमवायची नाही, म्हणून वंदे भारतचे तिकीट काढले.

गाडीतून उतरल्यावर पंजाबराव देशमुख प्रशासकीय अकादमीला आम्ही पोहोचलो. राहण्याची आणि सर्व सोयींची उत्तम व्यवस्था होती.

या परिषदेचे स्थान अमरावती विद्यापीठ होते. सकाळीच स्थानिक कलाकारांचे नृत्य आणि ग्रंथ दिंडीने या दिमाखदार सोहळ्याला सुरुवात झाली. ग्रंथ दिंडीला माननीय उच्चशिक्षण मंत्र्यांच्या उपस्थितीने एक वेगळीच उंची दिली. सभागृहामध्ये ११ भाषा तज्ज्ञ निमंत्रित यांची अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने बैठक व्यवस्था होती. ११ भाषांतील तज्ज्ञ आपापल्या भाषेत विचार मांडणार, तर ते इतरांनाही लगेच कळावे यासाठी भाषिणी ॲपचा वापर केला होता. त्यामुळे ११ अभिजात भाषांच्या अभ्यासकांना आपले मत आपल्या भाषेत मांडण्याची पूर्ण मुभा होती. याचा फायदा काही अभ्यासकांनी पुरेपूर घेतला. काहींनी मात्र इंग्रजी भाषेत आपले सादरीकरण केले.

परिषदेत चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री हे पहिल्या सत्रात, तर डॉ. उदय सामंत, उद्योग व मराठी भाषा मंत्री हे दुसऱ्या सत्रात आवर्जून उपस्थित राहिले आणि अभिजात भाषाविषयीच्या योजना, त्याचप्रमाणे रिद्धपूरच्या मराठी भाषा विद्यापीठाच्या संवर्धनाबाबत त्यांनी उपयुक्त विचार मांडले. उद्घाटनप्रसंगी डॉ. मिलिंद बाराहाते, मा. कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि डॉ. अविनाश आवलगावकर मा. कुलगुरू, मराठीभाषा विद्यापीठ रिद्धपूर हेही उपस्थित होते.

याशिवाय डॉ. मनीष जोशी, मा. सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग त्यांनी नव्याने अभिजात भाषेचा दर्जा मिळालेल्या पाच भाषांसाठी centre of excellence सुरू करण्याचा आशावाद व्यक्त केला आणि डॉ. किरण कुलकर्णी, मा. सचिव, मराठी भाषा विभाग यांनीही अभिजात भाषा धोरण त्यामागील भूमिका आणि पुढच्या काळातील दूरगामी दृष्टिकोन मांडून खऱ्या अर्थाने विषयाला सुरुवात केली.



मराठीतून उद्योग वाढवणाऱ्या उद्योजकांचा मराठी भाषा परिसंवाद मराठी भाषा अधिकाऱ्यांचे राज्यस्तरीय संमेलन, युवा वर्गासाठी ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा, परिभाषा कोश अशा विविध उपक्रमांची माहिती मा. सचिव मराठी भाषा विभाग यांनी दिली.

सुरुवात तमिळ भाषेने झाली, कारण भारतात अभिजात भाषेचा दर्जा मिळवणारी ती पहिली मानकरी होती. अर्थात पहिल्यांदा अभिजात दर्जा मिळाल्याने त्यांनी आतापर्यंत पुष्कळ योजनाबद्ध विचार केला होता. तमिळ अभ्यासकांनी त्यांच्या भाषेला अभिजात दर्जा मिळण्यामागचा इतिहास सांगितला आणि चालू असलेले उपक्रम व भविष्यातील योजना याविषयीही सविस्तर माहिती दिली. त्यांनी अंध व मूकबधिर लोकांचाही या उपक्रमांमध्ये विचार केला होता हे विशेष. याशिवाय काळानुरूप यु-ट्यूब चॅनेल, ई-बुक, अँड्रॉइड अॅप, ऑडिओ बुक , डिजिटाईझेशन इ. विचार आणि अंमलबजावणी त्यांनी केली होती.



त्यानंतर संस्कृत अभिजात भाषा अभ्यासकांचे सादरीकरण झाले तसेच कन्नड आणि तेलुगू अभिजात भाषांचे सादरीकरण झाले. अभिजात भाषांना स्वायत्ततेबाबत विचार मांडण्यात आले. मल्याळम् भाषेला २०१३ साली अभिजात दर्जा मिळाला. त्यांनी समकालीन भाषेच्या दृष्टीने अभिजात भाषा कशी महत्त्वाची आहे, यावर विचार मांडले. अनुवाद समिती, प्रत्येक राज्यात भाषा भवन असेही विचारमंथन केले गेले. यानंतर उडिया भाषेचे सादरीकरण झाले. वेगवेगळ्या भाषा आणि संस्कृतींचा कोठे कोठे संगम झाला, याचेही ऐतिहासिक उल्लेख आणि पुराभिलेखांची त्यानिमित्ताने चर्चा झाली.

यानंतर मागील वर्षी म्हणजे २०२४ मध्ये ज्यांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, अशा पाली, असमिया, प्राकृत, बंगाली आणि मराठी या पाच भाषांचे सादरीकरण झाले. या पाच भाषांच्या सादरीकरणात व्युत्पत्तीशास्त्र कोश तयार व्हावे, त्याचप्रमाणे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर भाषा संवर्धनासाठी कसा व्हावा, यावर विचार झाला. काही भाषा त्रैमासिक काढून प्रचार करणार, तर काही जण संभाषणात त्या भाषा राहाव्या याचे प्रयत्न करणार आहेत. सर्व भारतीय भाषांची केंद्रे सर्व राज्यात व्हावी. प्रशासनात, शिक्षणात, माध्यमांमध्ये त्या भाषांचा जाणीवपूर्वक वापर वाढवला जावा. वय वर्ष पंचेचाळीसपर्यंतच्या गटासाठी या भाषांचा प्रसार केला जावा, ही जाणीव सर्वांनाच या निमित्ताने झाली हे विशेष. केंद्रीय भारतीय भाषा संस्था, म्हैसूर (Central Institute of Indian Languages Mysore) ने सर्वांचे केंद्रीय समन्वयक व्हावे, असा विचार पुढे आला. 'माझी भाषाच श्रेष्ठ आहे, जननी आहे' या भावनेपासून दूर राहून सर्व भारतीय अभिजात भाषातील साहित्य इतर भाषांत अनुवादित व्हावे. सर्व भाषांच्या संवर्धनासाठी एकत्रित प्रयत्न व्हावे, असा ऊहापोह झाला. १९५४ साली भारतीय भाषा परिषद झाली होती. त्यानंतर भाषाविषयक धोरण जन्माला आले. त्याप्रमाणे या परिषदेतून एका धोरण आराखड्याचा जन्म व्हावा, असे विचार मांडले गेले. भारतीय ज्ञान पद्धती व सर्व भाषातील समान मुद्यांचा विचार झाला, भारत सरकारने अभिजात भाषांची १६ उद्दिष्टे ठरवली आहेत. त्यांचा ओघाने उल्लेख झाला.

भाषांच्या अभ्यासात लोकपरंपरा, लोकसंगीत याचाही अभ्यास करणे आवश्यक हा पैलू सर्वांच्या समोर या निमित्ताने आला. भाषा ही अनेक भाषा भगिनींसोबत देवाण-घेवाणीतून वाढते, हे तत्त्व सर्वांनाच पटले. पुराभिलेख, जुन्या पोथ्या यांचे जतन व रक्षण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत जागृतीही झाली.

भारत हा खंडप्राय देश आहे. घटनेतील आठव्या परिशिष्टात २२ भाषांविषयी नोंद आहे. ११ भाषांना आतापर्यंत अभिजात दर्जा मिळाला आहे, परंतु त्या भाषेतील अभ्यासक सोडून इतरांना ती भाषा अभिजात कोणत्या निकषावर ठरवली आहे, याची फारशी कल्पना नव्हती. प्रत्येक भाषेचे अभिजातपण हे इतर भाषिकांना या निमित्ताने समजले. शिवाय प्रत्येकातील ऐतिहासिक पुरावे पुराभिलेख यामुळे इतर कोणती भाषा भगिनी या भाषेसोबत विकसित झाली, याचीही जाणीव झाली. मराठीतील आद्य, गद्य ग्रंथ लीळाचरित्र जेथे लिहिला गेला, त्या ठिकाणी भेट आणि रिद्धपूर मराठी विद्यापीठाला भेट व त्यांचे प्रस्तावित काम समजून घेण्यामुळे इतर अभिजात भाषा अभ्यासकांच्या माहितीत मोलाची भर पडली.

इतर भाषांच्या समृद्ध साहित्याची, त्यांच्या वैशिष्ट्यांची आणि त्यांच्या संवर्धनासाठी करत असलेल्या उपक्रमांची कल्पना एकमेकांना आल्याने हे विचारमंथन सर्वांसाठीच उपयुक्त आणि दिशादर्शक ठरले हे नक्कीच. याशिवाय अभिजात भाषा अभ्यासकांमध्ये विचारांच्या देवाण-घेवाणीतून एक सेतू तयार होईल, यामुळे भविष्यातही हे काम एकत्रित चालू राहण्याची खात्री पटली.

**(भाषा अभ्यासक आणि अपर राज्यकर आयुक्त, मुंबई.)**

# टपाल!

**अश्विनी पुजारी**

*संवाद ही मानवी जीवनाची प्राणशक्ती. ती फक्त माहिती देणं किंवा घेणं यापुरती मर्यादित गोष्ट नव्हे. संवाद माणसाला माणसाशी जोडतो, भावना पोहोचवतो, विचारांचा प्रवाह चालू ठेवतो. संवाद म्हणजे नात्यांचा धागा आणि त्या धाग्याची सर्वात जिवंत, सर्वात मानवी ओळख म्हणजे टपाल व्यवस्था. प्रत्येक वर्षी ९ ऑक्टोबर रोजी साजरा केला जाणारा 'जागतिक टपाल दिन' आपल्याला केवळ एका प्रशासकीय यंत्रणेची आठवण करून देत नाही, तर मानवी संवादाच्या इतिहासाचा एक भावनिक अध्याय उलगडतो.*

१८७४ साली स्वित्झर्लंडमधील बर्न येथे स्थापन झालेल्या युनिव्हर्सल पोस्टल युनियनने (UPU) जगभरातील टपाल व्यवस्थांना एका सूत्रात बांधले. संवादाच्या जागतिकीकरणाची ही पहिली पायरी होती. आज १९० हून अधिक देश या संघटनेचे सदस्य आहेत, म्हणजे जगातील अब्जावधी लोक एका सामायिक तंतूने जोडले गेले आहेत.

भारतातील टपाल व्यवस्थेचा इतिहासही तितकाच गौरवशाली आहे. १८५४ साली इंडियन पोस्ट ऑफिस ॲक्ट लागू झाला आणि आधुनिक भारतीय टपाल सेवेचा जन्म झाला. त्याआधी राजदरबारी दूत, घोडेस्वार संदेशवाहक यांच्या माध्यमातून आदेश, पत्रं आणि राजकीय माहिती पोहोचवली जात असे; पण ब्रिटिश काळात ही सेवा सर्वसामान्यांच्या दारी आली आणि संवाद लोकशाहीकडे वळला.



## पत्रसंस्कृती : भावनांचा सजीव दस्तऐवज

पत्र हे केवळ कागदावर लिहिलेलं वाक्य नव्हतं... ते भावना, ओढ, प्रेम, काळजी आणि आठवणींचं दस्तऐवजीकरण होतं.

प्रिय... या एका शब्दाने सुरू होणाऱ्या ओळींमध्ये मनातलं सगळं कागदावर उतरायचं... काही पत्रांत शाईसोबत अश्रू मिसळलेले असायचे, काहींमध्ये हसरे शब्द, काहींमध्ये निरोपाचा गहिवर होता.पोस्टमन काका त्या काळचे खरे भावनांचे दूत होते. सायकलची घंटी वाजली की, घराघरातून लोक बाहेर येऊन आमचं पत्र आलं का? विचारायचे. हा प्रश्न फक्त एका कागदाचा नव्हता; तो आशेचा, नात्याचा आणि जिव्हाळ्याचा होता. आजच्या वेगवान डिजिटल युगात हा अनुभव विरळा झाला आहे. संवादाच्या गतीत वाढ झाली; पण संवादातील गोडवा हरवला आहे.

## डिजिटल युग : वेगाच्या मागे हरवलेली ऊब

मोबाइल, ई-मेल, व्हॉट्सॲप, सोशल मीडिया या साधनांनी जग छोटं केलं आहे. काही क्षणांत आपण हजारो किलोमीटर दूर असलेल्या व्यक्तीशी बोलू शकतो; पण या सोयीसोबत संवेदनांचा धागा काहीसा विरघळला आहे. पूर्वी पत्र येण्यासाठी आठवडाभर वाट पाहणं, हेच प्रेमाचं लक्षण होतं; आज ब्ल्यू-टिक दिसली नाही की, अस्वस्थता वाढते. पूर्वी शब्द हाताने लिहिले जायचे; आता ते बोटांनी टाईप होतात. भावना पूर्वी शाईतून ओघळायच्या; आता त्या इमोजीतून झळकतात. तंत्रज्ञानानं संवाद सुलभ केला; पण त्याच वेळी भावनांची खोली उथळ केली आहे.

## आधुनिक भारतीय टपाल विभाग

आज भारतीय टपाल विभाग केवळ पत्रव्यवहारापुरता मर्यादित नाही. तो डिजिटल भारताच्या धमन्यांपैकी एक बनला आहे. इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक (IPPB) ग्रामीण भागात डिजिटल व्यवहारांना चालना देते. डिजिटल पार्सल ट्रॅकिंग आणि ई-कॉमर्स वितरण सेवा देशातील प्रत्येक कोपऱ्याला व्यापून गेल्या आहेत. आधार सेवा केंद्र, डाक जीवन विमा, सुकन्या समृद्धी योजना आणि सीनियर सिटिझन सेव्हिंग स्किम या उपक्रमांतून टपाल विभाग सामाजिक जबाबदारीही निभावत आहे. भारतात जवळपास १.५ लाख पोस्ट ऑफिसेस कार्यरत आहेत. जगातील सर्वात मोठं नेटवर्क म्हणजे टपाल व्यवस्था आहे. ही व्यवस्था अजूनही विश्वास, सातत्य आणि मानवी सेवेचं प्रतीक आहे.

## पोस्टमन : भावना पोहोचवणारा देवदूत

पोस्टमन हा केवळ पत्र पोचवणारा माणूस नव्हता; तो भावनांचा वाहक होता. त्याच्या हातातल्या लिफाफ्यात कधी प्रेम होतं, कधी वियोग, कधी अभिमान, कधी शोक. त्याच्या सायकलच्या घंटीत आशेचे सूर होते. ग्रामीण भारतात तो अजूनही घराघरांत आनंद आणि बातम्या पोहोचवतो. कारण त्याच्यासाठी प्रत्येक पत्र म्हणजे कागदाचा तुकडा नाही, तर माणसाच्या हृदयाचा अंश आहे. या हृदयीचे त्या हृदयी पोहोचवणं आहे.

## टपाल दिनाचं सार्थ महत्त्व

या दिवसाचं उद्दिष्ट आहे टपाल व्यवस्थेचं महत्त्व जनमानसात जिवंत ठेवणं आणि या सेवेतील कर्मचाऱ्यांचा सन्मान करणं.

अनेक देशांमध्ये या दिवशी प्रदर्शनं, पत्रलेखन स्पर्धा, आणि संवादविषयक कार्यक्रम आयोजित केले जातात. हा दिवस त्या सगळ्यांना अभिवादन करण्याचा आहे. ज्यांनी पत्रं लिहिली, ज्यांनी ती पोचवली, आणि ज्यांनी त्या पत्रांमधून माणुसकी जपली.

## भविष्यातील दिशा : डिजिटल स्पर्शात मानवी ऊब

आज ई-पोस्ट, ऑनलाइन मनिऑर्डर, डिजिटल पोस्ट ऑफिसेस या उपक्रमांनी टपाल व्यवस्थेला नवं रूप दिलं आहे; पण या सर्व बदलांच्या केंद्रस्थानी अजूनही माणूसच आहे. टपाल दिन आपल्याला आठवण करून देतो की, संदेश वेगाने पोहोचणं महत्त्वाचं आहे; पण भावनेनं पोहोचणं त्याहूनही महत्त्वाचं आहे. टपाल व्यवस्था ही केवळ एक सेवा नाही; ती माणुसकीचा वारसा आहे. तिने नात्यांची बीजे रुजवली, विश्वास वाढवला आणि भावनांचा पूल बांधला. आज जरी पत्रलेखन हरवलं असलं, तरी जुन्या कपाटात सापडणारं एखादं पत्र अजूनही मनाला स्पर्श करतं. जुन्या आठवणींना उजाळा देतं, म्हणूनच त्या फिकट झालेल्या शाईत, ओळखीच्या हस्ताक्षरात अजूनही जिवंत आहे आपुलकीचा सुगंध. टपाल दिन हा केवळ सेवेला नव्हे, तर त्या काळाला, त्या भावनांना आणि त्या माणुसकीप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे, कारण पत्र संपलं असलं तरी त्यातलं प्रेम अजूनही जिवंत आहे...आठवणींचं संचित बनून...

**(सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.)**

**अजय भोसले**

# बोल अनघाताईंचे

स्वयं टॉकमुळे माझा मलाच नव्याने शोध घेण्याची संधी मिळाली आणि माझाच प्रवास नव्याने उलगडता आला हे बोल आहेत, अनघा मोडक यांचे. या संदेशासोबत भ्रमणध्वनीवर एक दृकश्राव्य फीत फिरत होती. त्यापूर्वी अनघा मोडक हे नाव माहीत नव्हते आणि जे काही पाहिले आणि ऐकले त्याने मी सुन्न झालो होतो. अन् मी ठरवले त्यांना प्रत्यक्ष भेटण्याचे. तसा योग आला बोरीवलीला झालेल्या एका कार्यक्रमात. भेटलो नाही, परंतु बघितले, ऐकले, शब्द-न-शब्द अंतरंगात भरून घेतले. उठलो याच निश्चयाने अनघाताईंच्या कार्यक्रमाचा अनेकांना लाभ व्हावा, म्हणून एक कार्यक्रम आयोजित करायचा. तो योग मराठी भाषा संवर्धन पंधरवडा तथा पु.लं., गदिमा यांच्या जन्मशताब्दीनिमित्त लवकरच आला. या कार्यक्रमात मी अनघाताईंचा परिचय करून देणार होतो. कार्यक्रमाच्या रूपरेषेबाबत त्यांना कल्पना यावी, म्हणून त्यांच्याशी भ्रमणध्वनीवर बोललो. भ्रमणध्वनीवरही त्यांचे गद्यातले बोलही, पद्यातल्या लयीसारखे कानाला सुखावत होते. काय बोलावे, सुचत नव्हते.

भाषा म्हणजे केवळ शब्द नव्हे, भाषा म्हणजे भाव. हा भाव शब्दात ओतला तर समोरच्याच्या हृदयापर्यंत पोहोचता येतं, हे त्यांचेच बोल आहेत 'बोलु ऐसे बोल' या त्रिमूर्ती प्रांगण कार्यक्रमातील. गद्यातही नाद, ताल, लय असते हे या कार्यक्रमात पहिल्यांदा आम्हा सर्वांनीच अनुभवले. बोलायचं पण कसं, शब्दांना फुलवत. अनघाताई यांच्या निवेदनात एक वाक्य अनेकदा असतं, दु:खालाही चिमटीमध्ये धरता येतं आणि त्याचं फुलपाखरू करता येतं. मी निवदेन करताना त्यात थोडा बदल केला भाषेलाही चिमटीमध्ये धरता येतं, अन् त्याचे फुलपाखरू करता येते. मी ठरवलं या दु:खाला बाजूलाच ठेवायचं कारण अनघाताईंच्या म्हणण्याप्रमाणे दु:खाची तमा का बाळगावी, जे काही माझ्या वाट्याला येणार आहे, ते श्रीकृष्णाच्या स्पर्शाने पावन होणार आहे.

त्या दिवशी माझ्यात एवढी सकारात्मक ऊर्जा कोठून आली होती, याबद्दल मला यत्किंचितही शंका नाही. तो ताईच्या सकारात्मक ऊर्जेचा (Aura) चा परिणाम असावा, नाहीतर मंचावर बोलण्याचा मला फारसा सराव नाही. अनघाताईंचा स्वभाव प्रेमळ आणि लाघवी. तुम्ही एकदा त्यांच्याशी बोलायला सुरुवात केल्यानंतर चुंबकासारखे ओढले जाता. त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व, नव्याचा अनुभव घेण्याचा उत्साह, पहिल्याच भेटीत छाप पाडणे, हे सर्व मला वाटते. त्यांच्या राशीचा प्रभाव असावा.(Taurus) परंतु सर्व श्रेय राशीला दिल्यास त्यांनी घेतलेल्या परिश्रमाचा, आत्मशोधाचा अवमान ठरेल.

*हे कुठले रंग अवकाशी अवतरले*
*ते तर माझ्या अंतरंगी वसले...*
*काळसर्प रोज वाटेवरी...*
*निळस्पर्शाने पावन सारे...*

वरील काव्यपंक्तीत व्यक्त होणारा सकारात्मक दृष्टिकोन अनघाताईंच्या जगण्यात दिसून येतो. अनघाताई येणाऱ्या कोणत्याही क्षणाला सहजतेने सामोऱ्या जातात, कारण त्यांना पक्की खात्री आहे, सर्व श्रीकृष्णाच्या स्पर्शाने पावन होणार आहे. डॉ. उदय निडगुडकरांबरोबरची ती मुलाखत मी पाहिली होती. शब्द-न-शब्द टिपला होता. अशीच सकारात्मक ऊर्जा होती. हळूहळू जीवनाचा प्रवास त्या उलगडत होत्या. निसर्ग/देव जो कोणी असेल तो, त्याने डेंग्यूच्या आजाराचं निमित्त करून या चैतन्यदायी मुलीच्या जीवनातील प्रकाशाची वाट का अडवली? त्यातून सावरते न सावरते तर तिचा भक्कम आधार....पितृछत्र का हिरावून घेतले? याची उत्तरे कदाचित सापडणार नाहीत.

कृष्णविवराच्या या गर्तेत सामान्यांची जीवननौका दिशाहीन झाली असती, परंतु तिच्या गुरूंनी मंत्र दिला, बाहेर बरंच पाहिलंस, आता आत डोकावून बघ. ती ध्यानस्थ झाली. या अंधारातून तिला प्रकाशाची वाट सापडली आणि त्या वाटेवर तिचा प्रवास सुरू आहे. हा प्रवास त्यांनी उलगडला आहे, काही दृक्श्राव्य फितीत. तो त्यांच्याच शब्दात पाहणे आणि ऐकणे हा एक आनंददायी अनुभव आहे. तुम्ही आयुष्यात निराश झाला असाल आणि दिशा सापडत नसेल, तर हे व्हिडिओ जरूर पाहा. तुम्हाला एक नवी दिशा नक्की सापडेल. *(त्यांचे कार्यक्षेत्र इतके अचंबित करणारे आहे की त्याची स्वतंत्र माहिती खाली दिली आहे.)*

**नाव :** अनघा प्रदीप मोडक, **जन्म तारीख :** १७ मे,

**ठिकाण :** विलेपार्ले, **शिक्षण :** १) जनसंज्ञापन व वृत्तपत्र विद्या यात पदव्युत्तर पदवी (पुणे विद्यापीठ) २) मराठी साहित्य, कला शाखा पदवी (मुंबई विद्यापीठ) ३) गायनाच्या तीन परीक्षा उत्तीर्ण (गांधर्व महाविद्यालय) ४) नाट्यशास्त्र पदविका (अस्मिता चित्र ॲकॅडमी) ५) छायाचित्रण पदविका. **भाषा ज्ञान :** मराठी , हिंदी, इंग्रजी, गुजराती **कार्यक्षेत्रे :** १) 'माझा संघर्ष आणि मी' या कार्यक्रमाची मुलाखातकार (एबीपी माझा) २) रेडिओ जॉकी (आकाशवाणी मुंबई केंद्राच्या १००.१ एफ. एम. गोल्ड वाहिनी) ३) निवेदिका, श्राव्य मालिकांसाठी आवाज, अभिवाचन, सूत्रसंचालन (आकाशवाणी अस्मिता वाहिनी) ४) अनेकविध संस्थांसाठी त्यांच्या अपेक्षेनुसार संकल्पानांचे आरेखन, निर्मिती संहितालेखन ५) शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक संस्थांसाठी आवाज, कला व आवाजशास्त्र मार्गदर्शक. **व्याख्याने :** १) गुणांकित सावरकर (सावरकरांच्या चरित्राचा गुणात्मक आढावा) २) पाऊस गप्पा (पावसाचा विविध पात्रांशी संवाद) ३) बोलू ऐसे बोल (संवादाचे महत्त्व व वैशिष्ट्ये) ४) ज्ञानियांचा विज्ञानु (अध्यात्मातील विज्ञान) ५) जीना इसीका नाम है (विविध क्षेत्रातील ध्यासांचा उलगडा). **इतर अनुभव :** पुरस्कार विजेत्या माहितीपटासाठी संहितालेखन, पार्श्वनिवेदन, ज्ञानप्रबोधिनी छात्रप्रबोधन मासिकाच्या सहसंपादिका, व्हॉईस ओव्हर इत्यादी

**मुलाखतकार :** पं. हृदयनाथ मंगेशकर, पं. सुरेश वाडकर, डॉ. सलील कुलकर्णी, वैशाली सामंत इत्यादी मान्यवरांच्या मुलाखती

**निवेदक :** सुरेश खरे, कमलेश भडकमकर, प्रथमेश लघाटे, इत्यादी अनेक मान्यवर कलाकारांसोबत निवेदक.

**पुरस्कार :** १) जनगौरव पुरस्कार-२०१८ (जनसेवा समिती विलेपार्ले) २) राज्यस्तरीय कर्तृत्वान व्यावसायिक, गुणवत्ता, कलाक्षेत्र पुरस्कार-२०१८ (रोटरी क्लब, पुणे) ३) चेंजमेकर पुरस्कार - २०१६ (महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स) ४) व्हि. जी. कानिटकर राज्यस्तरीय संहितालेखन पुरस्कार ५) यंग अचिव्हर पुरस्कार - २०१६ (ऋतुजा फाऊंडेशन).

**(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.)**

# नाट्यप्रेम

**प्रफुल्ल कारेकर**

जगाच्या पाठीवर कुठेही गेलात, तर मराठी माणसाचे नाट्यप्रेम दिसून येते. त्याला मीही अपवाद नाही.

मी जून १९८९ मध्ये मंत्रालयीन सेवेत दाखल झालो. सन १९९४ ते सन २००४ या दहा वर्षांच्या कालावधीत मुख्यमंत्री सचिवालयात प्रतिनियुक्तीने कार्यरत होतो. या कालावधीत अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, बोरिवली शाखेचे अध्यक्ष कै. विनोद भाई शहा यांची काही कार्यालयीन कामामुळे ओळख झाली. ओळखीचे रूपांतर घट्ट मैत्रीत झाले. त्यांच्या पाठिंब्यामुळे मी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, बोरिवली शाखेचा आजीवन सदस्य झालो. कालांतराने बोरिवली नाट्य परिषदेचे विविध कार्यक्रम जसे 'कलाकार रजनी', 'दिवाळी पहाट' या कार्यक्रमांमध्ये रस घेऊ लागलो. तसेच या कार्यक्रमासाठी नाट्य परिषदेकरिता पुरस्कर्ते मिळवून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खारीचा वाटा उचलू लागलो.

या दरम्यान नाट्य परिषद बोरिवली शाखेच्या माध्यमातून मी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती यांचे मंत्रालयीन विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्ताव यांचा पाठपुरावा करत असे. तत्कालीन मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांनी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती यांच्या माटुंगा येथील पूर्णतः बंद अवस्थेत असलेल्या नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी शासनामार्फत चार कोटींची मदत जाहीर केली होती. सदर मदतीचा प्रस्तावाचा शासन स्तरावर पाठपुरावा करून नाट्य परिषद, मध्यवर्ती यांना चार कोटी रुपये उपलब्ध करून देण्यासाठी अत्यंत मोलाची कामगिरी केली. या कामगिरीची दखल घेऊन नाट्य परिषद, मध्यवर्तीचे तत्कालीन अध्यक्ष मोहन जोशी आणि कार्यकारी समितीने माझ्या अनमोल सहकार्याबद्दल १४ जून २००४ रोजी टिळक मंदिर, पुणे येथे झालेल्या गो.ब. देवल स्मृतीदिन कार्यक्रमात मला कृतज्ञता पुरस्कार देऊन सन्मानित केले, परंतु काही अपरिहार्य कारणास्तव मी कार्यक्रमाला उपस्थित राहू शकलो नाही, परंतु कालांतराने मला तो पुरस्कार नाट्य परिषद, मध्यवर्ती येथील कार्यालयात देण्यात आला.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्तीतर्फे दरवर्षी राज्याच्या विविध जिल्ह्यांच्या ठिकाणी नाट्य संमेलनाचे आयोजन करण्यात येत असते. या संमेलन काळात नाट्य संमेलनाचे अध्यक्ष यांचा राजशिष्टाचार सांभाळण्याच्या जोखमीच्या कामासाठी मला नियुक्त केले जात असे. मी अत्यंत मनोभावे करत असलेल्या कामाची दखल घेऊन सन २००७ मध्ये कणकवली येथे आयोजित नाट्य संमेलनाच्या समारोपाच्या अध्यक्षीय भाषणात नाट्य संमेलनाच्या अध्यक्षा सन्माननीय लालन सारंग व रत्नागिरी येथे सन २०११ मध्ये आयोजित नाट्य नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष सन्माननीय राम जाधव यांनी अध्यक्षीय समारोपाच्या भाषणात माझ्या नावाचा विशेष उल्लेख करून केलेल्या गौरवोद्गारामुळे उर अभिमानाने भरून आला. मी नाट्य परिषद, बोरिवली शाखेसाठी व नाट्य परिषद, मध्यवर्तीसाठी करत असलेल्या कार्याचा सन्मान नाट्य परिषद, बोरिवली शाखेचे तत्कालीन अध्यक्ष प्रदीपजी कबरे व कार्यकारिणी समितीने माझ्या नावाची शिफारस नाट्य परिषद कार्यकर्ता म्हणून नाट्य परिषद, मध्यवर्ती यांना केली. या शिफारशीची दखल घेऊन नाट्य परिषद, मध्यवर्तीने मला १४ जून २०१९ रोजी गो.ब. देवल स्मृतिदिन कार्यक्रमात मा. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती मृदुला भाटकर आणि सुप्रसिद्ध चित्रपट व नाट्य अभिनेत्री सुकन्या कुलकर्णी मोने यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्हे देऊन नाट्य परिषद कार्यकर्ता म्हणून गौरवण्यात आले. मी शासनसेवेतून माहे फेब्रुवारी २०२४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालो आहे. सेवानिवृत्तीनंतर नाट्य परिषद मध्यवर्तीचे सध्याचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळावर सदस्य म्हणून माझी नियुक्ती केली आहे. त्यामुळे आता मी नाट्य परिषदेच्या कार्यासाठी स्वतःला संपूर्णपणे वाहून घेतल्यामुळे निवृत्तीनंतरचा काळ मला मनस्वी आवडणाऱ्या क्षेत्रात व्यतीत करत आहे.

**(सेवानिवृत्त कक्ष अधिकारी)**

# मराठी मजकूर छपाईची मुहूर्तमेढ

सन १८३१ मध्ये गणपत कृष्णाजी पाटील या ३२ वर्षीय दूरदर्शी व राष्ट्राभिमानी तरुणाने मराठी मजकूर छपाईची मुहूर्तमेढ रोवून एक ऐतिहासिक कार्य केले. त्या काळात छपाई व्यवसायावर ब्रिटिश सरकारची पूर्ण मक्तेदारी होती. छापखान्यांची साधने, तंत्रज्ञान आणि आर्थिक संसाधने सर्वस्वी इंग्रजांच्या ताब्यात होती. अशा परिस्थितीत स्वतःच्या बुद्धिमत्ता, चिकाटी, संशोधनवृत्ती आणि राष्ट्रप्रेमाच्या बळावर मराठी भाषेत छपाई सुरू करण्याचे धाडस करणे, हे विलक्षण धैर्याचे उदाहरण ठरले.

गणपत कृष्णाजी पाटील यांचा जन्म इ.स. १७९९ मध्ये रायगड जिल्ह्यातील अलिबागजवळील थळ या गावात झाला. त्यांचे बालपण आणि प्रारंभीचे आयुष्य थळ बाजार परिसरात गेले. पुढे उपजीविकेसाठी त्यांनी मुंबई गाठली आणि तेथे एका ब्रिटिश छापखान्यात प्रेसमन म्हणून नोकरी पत्करली. नोकरीदरम्यान त्यांनी छपाई तंत्राचा सखोल अभ्यास केला. छपाई यंत्राची रचना, शाईची निर्मिती आणि छपाई प्रक्रियेतील तांत्रिक बाबी यांचे त्यांनी बारकाईने निरीक्षण करून ज्ञान प्राप्त केले. या काळात त्यांच्या मनात एक विचार ठाण मांडून बसला, आपल्या देशातील धार्मिक आणि सांस्कृतिक ग्रंथ आपल्या मातृभाषेत म्हणजेच मराठीत छापले गेले पाहिजेत. या भावनेतून त्यांनी मराठी छपाईचा पाया घालण्याचा निश्चय केला. सन १८२५ मध्ये त्यांनी या उदात्त ध्येयासाठी प्रयत्न सुरू केले; परंतु त्या काळात छपाईचे यंत्र मिळविणे अत्यंत कठीण होते, तसेच आर्थिक साधनांचाही अभाव होता. तरीसुद्धा त्यांनी हार न मानता लाकडाचा वापर करून स्वतःचे छपाई यंत्र, लाकडी शिळाप्रेस तयार केले. छपाईसाठी लागणारी शाईही त्यांनी विविध प्रयोगांद्वारे स्वतः तयार केली. सर्व तयारी पूर्ण झाल्यानंतर, इ.स. १८३१ मध्ये थळ गावात त्यांनी स्वतःचा छापखाना सुरू केला. मराठी माणसाच्या हाताने उभारलेला हा महाराष्ट्रातील पहिला स्वदेशी छापखाना ठरला. या घटनेने मराठी भाषेतील मुद्रण युगाची सुरुवात झाली आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व बौद्धिक इतिहासात या कार्याने एक सुवर्णपान लिहिले गेले.

गणपत कृष्णाजी पाटील यांच्या या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात स्वावलंबन, नवोन्मेष आणि भाषाभिमानाची नवी जागृती झाली. त्यांच्या कार्याचा गौरव आजही मराठी मुद्रण इतिहासातील पहिला दीपप्रज्वलक म्हणून केला जातो.

# मराठी मनाचा ठाव घेणाऱ्या कवयित्री बहिणाबाई चौधरी

**राहुल शोभाबाई लक्ष्मणराव भालेराव**

महाराष्ट्रातील अनेक कवींनी मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. ग्रामीण मराठी बोलीभाषेतील कविता अंतर्मनाला स्पर्श करून जातात. अशाच काही कविता बहिणाबाई चौधरी यांनी रचल्या आहेत. खानदेशातील एका शेतकरी कुटुंबात बहिणाबाईंचा जन्म झाला, पाटीपुस्तकाचा तर सोडाच; पण अक्षराचाही गंध



नसलेल्या बहिणाबाईंचा दिवस, उगवल्यापासून मावळेपर्यंत काळ्याभोर जमिनीच्या सान्निध्यात जात असे. या 'काळ्या आईच्या कुशीतच त्या वाढल्या, त्यांचे व्यक्तिमत्त्वही त्या काळ्या आईनेच घडविले. तिच्याजवळ त्या आपली सगळी सुख-दुःखे बोलत, सरस्वतीचा त्यांच्यावर जणू वरदहस्तच होता. त्यामुळे त्यांचे साधे बोलणेही गाणे होत असे. अशा अनेक गाण्यांच्या रचना त्यांनी केल्या आहेत, बोलीभाषेच्या लडिवाळपणामुळे बहिणाबाईंची गाणी अधिक मधुर वाटतात.

बहिणाबाईंच्या कविता खानदेशातील त्यांच्या मातृबोलीत, रचलेल्या आहेत. त्यांच्या कवितांचे विषय माहेर, संसार, शेतीची साधने, कापणी, मळणी इ. कृषिजीवनातील विविध प्रसंग, अक्षय तृतीया, पोळा, पाडवा इत्यादी सणसोहळे या आणि इतर त्यांच्या कवितांचे विषय असत.

बहिणाबाईंच्या रचलेल्या कवितांमध्ये जागोजागी जीव, जातींचा उल्लेख आलेला असून, यामध्ये खीरा, भीमफूल, गोंडबा, सागरगोटे, ढोर, इचू, साप, कपाशी, गाय, बोरी, वाभई, पळस, सुगरण या निसर्ग चित्रणाचा समावेश आहे.

बहिणाबाईंची गाणी ही त्यांच्या संसाराची गाणी आहेत. ही गाणी त्यांच्या पोटातून ओठांवर आली आहेत. निसर्गातील विविधतेचे निरीक्षण व बारकाव्यांचे त्यांनी केलेले वर्णन वाखाणण्यासारखे आहे.

*अरे खोप्यामधी खोपा, सुगरनीचा चांगला देखा पिलासाठी तिनं, झोका झाडाले टांगला;*

बहिणाबाईच्या अशाच कविता मराठी मनाला स्पर्शून जातात.

महाराष्ट्रातील कवी सोपानदेव चौधरी हे बहिणाबाईंचे पुत्र. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर बहिणाबाईंचे सुपुत्र कविवर्य सोपानदेव व त्यांचे मावसबंधू पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली बहिणाबाईंची गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. आपल्या आईच्या मृत्यूनंतर तिच्या चीजवस्तू पाहताना हे हस्तलिखित सोपानदेवांच्या हाती लागले. या कविता सोपानदेवांनी आचार्य अत्रे यांना दाखवल्या, अत्रे उद्गारले, अहो हे तर बावन्नकशी सोनं आहे. हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणं हा गुन्हा आहे आणि अत्रे यांनी त्या कविता प्रकाशित करण्यात पुढाकार घेतला. अत्रे यांच्या विस्तृत प्रस्तावनेसह बहिणाबाईंची गाणी १९५२ मध्ये (दुसरी आवृत्ती १९६९) प्रकाशित झाली आणि 'धरत्रीच्या आरशामधी सरग' (स्वर्ग) पाहणाऱ्या या कवयित्रीचा महाराष्ट्रास परिचय झाला. या काव्यसंग्रहात बहिणाबाईच्या फक्त ३५ कविता आहेत; परंतु कवित्वाची कोणतीच जाणीव मनात न ठेवता, केवळ सहज म्हणून रचलेल्या त्यांच्या बऱ्याच कविता वेळीच लेखननिविष्ट न झाल्याने त्यांच्याबरोबरच त्यांच्यासोबत गेलेल्या आहेत.

बहिणाबाई यांच्या काव्यरचनांवर आधारित खानदेशचा मळा आणि मराठवाड्याचा गळा सांस्कृतिक कार्यक्रम मराठवाड्यातील गायकांच्या आवाजात सादर केला जातो. या सांस्कृतिक कार्यक्रमाचे निर्माते, संगीत दिग्दर्शक, गायक प्रा. डॉ. अशोक जोंधळे आणि आशाताई जोंधळे आहेत.

**(जिल्हा माहिती अधिकारी, पालघर.)**

# सांस्कृतिक ठेवा...

**अजय भोसले**

कवि भूषण हे उत्तरेतील कवी. त्यांच्या काव्यप्रतिभेने महाराज प्रभावित झाले होते. कवि भूषण यांनी महाराजांवर जे काव्य रचले ते म्हणजे शिवभूषण. संपूर्ण काव्यरचना अलंकारमय असून ब्रज भाषेत आहे. ही भाषा उत्तरेकडील ग्रामीण भागात अजूनही बोलली जाते.

प्रत्येक कडव्याच्या अगोदर कवि भूषण त्या कडव्याच्या अलंकाराचे वर्णन करतात. कवी भूषण यांनी सांगितल्याप्रमाणे खालील ओळी लुप्तोपमा अलंकारात आहेत. या ओळीत शिवरायांचा नेमका स्वभावविशेष स्पष्ट होतो. ते शत्रूसाठी शत्रू तर मित्रांसाठी मित्र होते .

पावक – तूल अमित्रन के भयो
मित्रन के भयो धाम सुधा के
छत्रपती शिवाजी महाराज शत्रूंसाठी अग्नीसारखे तापदायक,
तर मित्रांसाठी अमृतासम होते.
पावक – अग्नी
अमित्रन – शत्रू
सुधा अमृत.

**(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.)**

# ज्ञानेश्वरी




# संस्कृत सुभाषित

न कश्चिदपि जानाति किं कस्य श्वो भविष्यति ।
अतः श्वः करणीयानि कुर्यादद्यैव बुद्धिमान् ।।

या श्लोकात एक अत्यंत महत्त्वाचा जीवनाचा संदेश दिला आहे. मनुष्य कितीही विद्वान, ज्ञानी किंवा सामर्थ्यवान असो, उद्या काय घडेल हे कोणालाही ठाऊक नसते. जीवन अनिश्चित आहे. आपल्याकडे वेळ अमर्याद नाही; क्षणाक्षणाला काळ पुढे सरकत असतो. उद्याचं भविष्य आपल्या हातात नसतं, पण आजचा वर्तमान आपल्या हातात असतो.

म्हणूनच शहाणा माणूस उद्यावर विसंबून राहत नाही. तो काम पुढे ढकलत बसत नाही, तर जे आवश्यक आहे ते आजच करून घेतो. कारण उद्या कदाचित ती संधी मिळेलच असं नाही. वेळ गेल्यावर पश्चात्ताप करून उपयोग नसतो.

हा श्लोक आपल्याला कर्मयोग आणि समयाचे महत्त्व शिकवतो.

तो सांगतो की –

विलंब आणि आळस हे यशाचे शत्रू आहेत.

जो आजचा दिवस योग्यरीत्या वापरतो, तोच खरा बुद्धिमान.

उद्या करू म्हणणारा अनेकदा आयुष्यात मागे राहतो; पण आजच करतो म्हणणारा पुढे जातो.

# म्हणजे काय?

## अभिजात भाषा



अभिजात भाषा हा केंद्र शासनातर्फे भाषेला दिला जाणारा एक विशीष्ट दर्जा आहे. केंद्र सरकारने अभिजात भाषेचे निकष खालीलप्रमाणे ठरवलेले आहेत.

भाषेची प्राचीनता

भाषेची मौलिकता आणि सलगता

भाषिक आणि वाङ्मयीन परंपरेचे स्वयंभूपण.

प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रूप यांचा गाभा कायम असावा.

वरील निकष पूर्ण करणाऱ्या भाषांना अभिजात दर्जा दिला जातो. आतापर्यंत तमिळ, संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्याळम, उडिया, बंगाली, पाली, प्राकृत आणि आसामी अशा भाषांना हा अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. ज्या भाषांना दिला जातो, त्या भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून त्या–त्या राज्याला भरीव अनुदान मिळते.

हरी नरके यांच्या अध्यतेखाली नेमलेल्या समितीने भाषेची प्राचीनता, भौतिकता आणि सलगता, भाषिक आणि वाङ्मयीन परंपरेचे स्वयंभूषण इ. निकष विचारात घेऊन तयार केलेल्या मराठी भाषा अहवालाची महाराष्ट्र शासनातर्फे केंद्र शासनाकडे शिफारस करण्यात आली. त्या अनुषंगाने केंद्रीय मंत्रिमंडळाच्या ०३ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय झाला आहे.

मराठी भाषेला अभिजात दर्जा देताना मराठी भाषेची गेल्या सुमारे २५०० वर्षांची परपंरा गृहीत धरण्यात आली आहे. प्राचीन ग्रंथांची विविध लिपीतील भाषा, व्यवहारातील व विविध कला प्रकारातील भाषेच्या उपयोगाची गौरवशाली परपंरा विविध समाजघटकांसमोर येण्यासाठी मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, भाषेचे संवर्धन होण्यासाठी, जनमानसामध्ये मराठी भाषेच्या अभिजाततेची ओळख व्हावी, अभिजात मराठी भाषेसंदर्भातील संशोधन, जनजागृती जास्तीत जास्त व्हावी, याकरिता प्रतिवर्षी दिनांक ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा दिवस व दिनांक ३ ते ९ ऑक्टोबर २०२५ हा कालावधी अभिजात मराठी भाषा सप्ताह म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनातर्फे घेण्यात आला आहे.



marathi.gov.in

## भाषा संचालनालय

directorate.marathi.gov.in

## मराठी विश्वकोशनिर्मिती मंडळ

marathivishwakosh.org


## साहित्य संस्कृती मंडळ

sahitya.marathi.gov.in


## राज्य मराठी विकास संस्था

rmvs.marathi.gov.in

# लिहिते व्हा... आपलं मंत्रालय





माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित 'आपलं मंत्रालय' (डिजिटल आवृत्ती) तयार करण्याचे नियोजित आहे. मंत्रालयातील विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांनी आपल्या कथा, कविता, स्वानुभव, पाककला, भ्रमंती, व्यंगचित्रे, विशेष छायाचित्रे; तसेच विभागातील पदोन्नती, निवृत्ती याबद्दल 'आपलं मंत्रालय' या गृहपत्रिकेसाठी लेखन साहित्य *(युनिकोड वर्ड फाईल स्वरूपात)* खालील दिलेल्या ई-मेलवर पाठवावेत.












## आपलं मंत्रालय

प्रकाशने शाखा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, १७ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई. ई-मेल : **aaplemantralay@gmail.com**

**Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR**

**Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR**